मासिक वार्तापत्र • अंक 12 • सप्टेंबर 2019 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


रेल्वे खाजगीकरणाच्या रुळावर बुलेट ट्रेनच्या वेगाने पळणारे मोदी सरकार 5

महान अय्यंकाली यांच्या वारशाला विसरू नका! 14

एखाद्या समुदायाला गुलाम करण्याचे समर्थन करून आपण स्वतंत्र राहू शकतो का? 16


## मंदीचे संकट पुन्हा एकदा कामगार वर्गाच्या जीवावर!

### अतिउत्पादनाचे किंवा मागणीच्या अभावाचे नाही तर नफ्याच्या घसरत्या दराचे संकट!

भारताची अर्थव्यवस्था पुन्हा एकदा मंदीकडे वाटचाल करत आहे हे आता लपून राहिलेले नाही. भांडवलशाही तर तसे नेहमीच कामगार वर्गाचे रक्त पिऊन चालते, पण **भांडवलशाहीमध्ये मंदी येत असते आणि कामगार वर्गाचा मोठ्या प्रमाणात बळी घेतच असते हे आम्ही बिगुल च्या माध्यमातून सतत सांगत आलो आहोत.** त्यामुळे गेले अनेक महिने जे कोंबडं झाकण्याचा प्रयत्न सरकारचे भाट, भांडवली अर्थतज्ञ करत होते, ते कोंबडं काही आरवायचं राहिलं नाही. आता जेव्हा अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमध्ये मंदी दिसून येऊ लागली आहे, तेव्हा मोठमोठे अर्थतज्ञ जणूकाही नव्याने शोध लागल्यासारखे मंदीची कबूली देऊ लागले आहेत. एका बाजूला भांडवली अर्थव्यवस्था हीच कशी सर्वोत्तम व्यवस्था आहे आणि 'नीट राबवली' तर सर्वांचे कल्याण करू शकते असे सांगणारे विद्वान, भांडवलशाही हीच 'अंतिम' व्यवस्था आहे, ती निरंतर चालू शकते आणि तिला पर्याय शक्य नाही असा सतत घोष करणारे विशेषज्ञ, मंदी आली की नजर चुकवू लागतात आणि मंदीचे खापर कोणाच्या डोक्यावर फोडायचे याचे डावपेच आखू लागतात. ते कधी मंदीचे खापर कोणा अर्थशास्त्रज्ञाच्या चुकीवर फोडतात, तर कधी कोणा बँकांच्या 'भ्रष्ट' अधिकाऱ्यांच्या माथी, तर कधी सरकारच्या चुकीच्या निर्णयांच्या माथी, तर कधी 'मागणी' कमी झाल्याचा ओरडा करतात. **आताही अनेक जण मंदीचे कारण सांगताना जीएसटी, नोटबंदी, जास्त कर आकारणी, तेजी-मंदी तर चालूच असते, वगैरे कारणे सांगत आहेत. यापैकी अनेक कारणांमुळे जनतेच्या हालापेष्ठा वाढलेल्या असल्या तरी मंदीचे मूळ कारण या गोष्टी नाहीत. हा सर्व खटाटोप कशासाठी, तर मंदीचे खरे कारण लपवण्यासाठी - ते म्हणजे भांडवलदारांचा नफ्याचा दर कमी होऊ लागतो आणि त्यामुळे ते अर्थव्यवस्थेला वाऱ्यावर सोडून देऊ लागतात!**

संपादक मंडळ

#### मंदीची लक्षणे

मंदीचे सर्वात ठळक लक्षण म्हणजे मालाचा खप कमी होणे. काही वेळी अर्थव्यवस्थेच्या एखाद्या क्षेत्रात मंदी येते, परंतु या वेळची मंदी ही बहुतांश क्षेत्रांना प्रभावित करत आहे हे आता स्पष्ट आहे. अर्थव्यवस्थेच्या जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये आता आकड्यांमधून तसे दिसून येत आहे. **देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग म्हणजे जीडीपीच्या वाढीचा दर, 5 टक्क्यांवर आला आहे, आणि हा आकडा सुद्धा फुगवलेला आहे असे मोदी सरकारचे एकेकाळचे प्रिय अर्थतज्ञ आणि आर्थिक सल्लागार असलेले अरविंद सुब्रमण्यम सांगून चुकले आहेत.** एकूण मॅन्युफॅक्चरींग पैकी 40 टक्के वाटा असलेले अत्यंत महत्वाचे क्षेत्र मोटारवाहन (ऑटो) क्षेत्रामध्ये प्रचंड मंदी आहे. दहा महिन्यांपासून विक्री खालावत आली आहे. विविध अंदाजांनुसार 10 ते 30 लाख कामगारांच्या नोकऱ्या धोक्यात आहेत. मारुती, होंडा, टीव्हीएस, हूंदाई, इत्यादी सर्वच कंपन्यांच्या विक्रीमध्ये प्रचंड घट झाली आहे. दुचाकी, कार, ट्रॅक्टर, ट्रक अशा सर्वच वाहनांच्या विक्रीमध्ये कपात दिसून येते आहे. ऑगस्ट 2018 च्या तुलनेत कारची विक्री 41 टक्के कमी, मोटारसायकलची विक्री 22 टक्के, व्यावसायिक वाहनांची विक्री 38 टक्क्यांनी कमी झाली आहे. मोटार वाहन उद्योगातील मंदी ही स्टील, रबर, इंधन, स्पेअर पार्ट्स, धातू अशा अनेक उद्योगांना प्रभावित करतच असते. यापैकी अनेक कंपन्यांनी काही दिवस कारखाने बंद ठेवणे किंवा काही शिफ्ट बंद करणे चालू केले आहे.

दुसरे मोठे क्षेत्र असलेल्या 'रिअल इस्टेट' म्हणजे बांधकाम क्षेत्रामध्ये सुद्धा स्थिती गंभीर आहे. विविध अंदाजांनुसार जवळपास साडेतीन

पान 6 वर

## हो प्रधानमंत्री महोदय! आम्ही संपदा निर्माण करणाऱ्यांचा सन्मान करतो! पण तुमचे भांडवलदार मित्र संपदा निर्माण करत नाहीत!

✍ अभिनव

**प्रधानमंत्री मोदी 15 ऑगस्ट 2019 रोजी 72 व्या स्वातंत्र्यदिनी (जो काही कारणांनी त्यांना 75 वा स्वातंत्र्यदिन वाटला!) लाल किल्ल्यावरून भाषण देताना अत्यंत भावविव्हळ झाले. त्यांनी जड अंतकरणाने देशातील कृतघ्न गरिब, कष्टकरी, कामगार, गरिब शेतकरी आणि निम्न मध्यमवर्गाला क्लेषदायक आवाहन केले की त्यांनी देशातील श्रीमंतांना संशयाच्या नजरेने पाहू नये!** श्रीमंतांप्रती आभाराच्या भावनेने भरून आलेल्या प्रधानमंत्री महोदयांनी आम्हा कामगार-कष्टकऱ्यांना सांगितले की श्रीमंत लोकच तर आहेत जे संपदा निर्माण करतात ! आणि जेव्हा संपदा निर्माण होईल तेव्हाच तर ती वाटली जाईल आणि आम्हा बेशरम कृतघ्न लोकांपर्यंत पोहोचेल! यावर पुन्हा एकदा मनातून आवाज आला, "वाह मोदी जी, वाह!"

आपल्या या भाषणामध्ये प्रधानमंत्री महोदय देशातील श्रीमंतांप्रती वाढणाऱ्या रागाबद्दल बरेच चिंतित दिसले. त्यांना वाटत होते की मंदीमुळे रोजगार गमवावा लागलेल्या कामगार आणि युवकांना याचे कारण श्रीमंत भांडवलदार आहेत असे तर वाटणार नाही ना! हे बिचारे भांडवलदार तर स्वत:च नफ्याच्या घसरत्या दरामुळे तडफडत आहेत आणि त्या मुंगळ्यांसारखे धावत पळत आहेत ज्यांच्यावर जणू गरम तेल पडले आहे. वरुन आमच्या सारखे बिनकामाचे आणि निर्लज्ज लोक! याच 'मेहनती' श्रीमंत भांडवलदारांवर, याच 'संपदा निर्माण करणाऱ्यां'वर रुबाब झाडत आहेत? किती निर्लज्ज प्रकारचे कृतघ्न लोक आहोत आम्ही !

चला बघूयात की आपले आवडते अंबानी, अडानी, टाटा, बिर्ला, हिंदुजा, गोयंका वगैरे किती हाड-तोड मेहनत करून समाजामध्ये संपदा निर्माण करतात, जी प्रधानमंत्री महोदयांच्या मते वाटण्या होऊन आम्हाला मिळत होती! **अहो, त्यामुळेच तर आम्ही गरिब लोक रोज सकाळ-संध्याकाळ अंडे-दूध, कोंबड्या, पनीर खातो, आपल्या मुलांना शिकायला विदेशात पाठवतो आणि आरामदायक घरांमध्ये राहतो!** बस्स, आम्ही हे सगळे नंतर विसरून जातो! असो! तर बघूयात की हे मालक आणि ठेकेदार कसे घाण्याच्या बैलासारखे मेहनत करून आमच्यासाठी संपदा निर्माण करतात.

सर्वात अगोदर तर एक मालक, ज्याला कोणताही माल बनवण्यासाठी कारखाना लावायचा आहे, तो मशिन विकत घेतो आणि कारखाना काढतो. यासाठी तो जमीन विकत घेतो, किंवा एखाद्या जमिनमालकाकडून भाड्याने घेतो. बाजारात मशिन विकणाऱ्या व्यापाऱ्याकडून तो मशिन विकत घेतो किंवा सरळ मशिन बनवणाऱ्या कंपनीच्या मालकाकडून. जेव्हा तो व्यापाऱ्याकडून घेतो, तेव्हा तो वास्तवामध्ये मशिन बनवणाऱ्या कंपनीकडूनच घेत असतो, ज्याला विकण्याचे काम व्यापाऱ्याला दिलेले असते; याच्या बदल्यात व्यापारी मशिन कंपनी मालकाच्या नफ्याचा एक छोटा हिस्सा घेत असतो. हे मालक, म्हणजे औद्योगिक भांडवलदार आणि व्यापारी भांडवलदार यांच्यामध्ये 'श्रम' विभागणी आहे, जिच्यामुळे मशिन कंपनी मालकाला आपल्या मशिनची किंमत लगेच मिळाते आणि पुन्हा उत्पादन करण्यासाठी त्याला मशिन विकण्याची वाट पहावी लागत नाही. असो. तर आपला हुशार मालक मशिन विकत घेतल्यावर, आणि कारखान्यात लावल्यावर कच्चा माल विकत घेतो जो माल बनवण्यासाठी आवश्यक आहे. मग काय होते? **मशिन काय स्वत:हून कच्च्या मालापासून पक्का माल तयार करतात का? नाही ! यासाठी आम्हा निराश कामगारांनाच कामाला लागावे लागते.** तसे तर आम्हाला 12-12 तास भार उचलणाऱ्या जनावरांसारखे राबावे लागते, पण आम्ही तरीही आभारी असले पाहिजे की आम्हाला आमच्या मेहनती, प्रामाणिक, नैतिक आणि सत्यनिष्ठ मालकांनीच तर नोकरी दिली ! नाहीतर आम्ही सडकेवर मेलो असतो. ही गोष्ट वेगळी की मालकाने कारखाना आम्हाला नोकरी देण्यासाठी नाही उघडलेला, तर नफ्यासाठी

पान 10 वर

## कविता
## 99 बार तुटतो पेन

उभा होतो आरोपीच्या पिंजऱ्यात
शिक्का होता माथी चोरीचा
जज न विचारलं कबुल का?
सांगितलं होतं हा म्हणायच !
मग रंगली कागदं
सावध झाले काळे लुटायला
खादीवाले बेड्या ठोकायला

खटला सुरू
गुन्हा माझा पोटासाठी
म्हणे, तू गॅस चोरला
वडे तळले, विकले
नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास,
कलम -- !
आरोपी नंबर – 99!

माझ्या जीवनाचा ऱ्हास, कोर्टाच्या बाहेर
पिढ्यांचा ऱ्हास इतिहासा बाहेर
माझं जगणं-मरणं संविधाना-बाहेर
शिक्षण नाही, हाताला काम नाही
जगण्याची वणवण, जीवाची तडफड
कायद्यात बसत नाही
माझं तोंड कैचीत
कुटुंबाच्या, उपासमारीच्या

कावळा, कावकाव
टोपड्या कोल्हा गोष्ट ऐकतो
खादी माकड दाराबाहेर
फैसला-फैसला, टाका आत
केस बंद, पेन तुटला
99 बार तुटतो पेन
99 च्या विरोधात
99 टक्के आत
उरलेले 1 टक्का फिर्यादी
जेलपण तुमचंच,
पोलिसपण तुमचेच
कायदा आणि जजपण तुमचाच
पण विसरू नका हे तुरुंग
आमच्याच हातानी बांधलेत !

✍ **संदीप सकट**

## महान अय्यंकाली यांच्या वारशाला विसरू नका!

पान 14 वरुन

मिळावे. **त्यांनी आपल्या संघटनेला सुद्धा गरिब कष्टकऱ्यांची संघटना म्हटले, ना की एखाद्या विशिष्ट जातीची. आज सुद्धा याच गोष्टीला समजावे लागेल की जर आपण दलित मुक्तीच्या संघर्षामध्ये दलित जातीय अस्मितेला आधार बनवला, तर लढाई सुरु होण्या अगोदरच हारून जाऊ, कारण या प्रकारे आपण ब्राह्मणवादी शक्तींना ही संधी देतो की त्यांनी गैर-दलित जातींमध्ये अस्मितावाद भडकवावा. जर जाती आपल्या अस्मितांच्या आधारावर आरुढ झाल्या तर काय आपण जाती अंताची लढाई जिंकू शकतो? कधीच नाही !**

ब्राह्मणवादी भांडवली शक्तींना पराजित करण्याचा मार्ग काय? हाच की आपण गैर-दलित जातींमधील गरिब कष्टकरी लोकांना सुद्धा जाती अंताच्या आंदोलनासोबत जोडावे आणि त्यांना दाखवावे की त्यांचा खरा शत्रू खुद्द त्यांच्या आणि इतर जातीतील कुलीन आणि श्रीमंत आहेत, जे सर्व संसाधनांवर कब्जा करून बसले आहेत. सर्व कष्टकरी लोकांच्या वर्ग एकतेच्या बळावरच दलित कष्टकरी लोकसंख्या कष्टकरी म्हणून आपल्या हक्कांना जिंकू शकते आणि सोबतच जाती अंताच्या द्वारे आपली मुक्ती प्राप्त करून घेऊ शकते. अस्मितांच्या टक्करीत आपण नेहमीच हारू. यामध्ये सर्व गरिब कष्टकरी हारतील, मग ते कोणत्याही जातीचे असोत. त्यामुळे आपल्या संघर्षांची जमीन असेच एक राजकारण असू शकते जे जातीअंताच्या प्रश्नाला ठोसपणे उचलत असेल. याच वर्ग आधारित समाईक संघर्षाच्या माध्यमातून सर्व गैर-दलित जातींमधील गरिब कष्टकरी जातीय पूर्वाग्रहांना सुद्धा एका दीर्घ प्रक्रियेत मित्रत्वपूर्ण संघर्षांनी समाप्त केले जाऊ शकते. जरा विचार करा साथींनो! आज अस्मितांच्या टक्करीच्या माध्यमातून सर्व कष्टकरी लोकसंख्येचे जातीय पूर्वाग्रह समाप्त झाले आहेत, की वाढले आहेत. ते सतत वाढले आहेत आणि याचा परिणाम सर्वात जास्त सामान्य कष्टकरी दलित लोकसंख्या आणि सर्व कष्टकरी लोकसंख्येला भोगावे लागत आहेत. अय्यंकालींचा वारसा आपल्याला दाखवतो की सत्तेच्या विरोधात मुलगामी संघर्ष आणि जाती अंताच्या लढाईमध्ये सर्व कष्टकरी जनतेला सोबत घेऊनच आपण जाती व्यवस्थेविरोधात योग्य पद्धतीने लढू शकतो.

**अनेक जाती विरोधी व्यक्तीत्वांना खुद्द भारत सरकारनेच स्वातंत्र्यानंतर प्रचारित-प्रसारित केले आहे, पण अय्यंकालींना नाही. का? कारण अय्यंकाली मुलगामी पद्धतीने आणि झुंझार पद्धतीने रस्त्यांवर उतरून संघर्षांचा रस्ता स्विकारत होते, कारण अय्यंकाली सरकारच्या सदिच्छेवर किंवा समजदारीवर भरवसा करत नव्हते, उलट जनतेच्या पुढाकारावर भरवसा करत होते.** सत्ताधारी वर्ग सुद्धा त्यांच्या मार्गाच्या आणि कार्याच्या या बाजूवर गप्प बसून असतो कारण जर कष्टकरी दलित आणि दडपलेली जनता त्यांच्याबद्दल जाणेल, तर त्यांच्या मार्गाबद्दलही जाणेल आणि हे सध्याच्या भांडवली आणि जातीयवादी सत्तेला कधीच मान्य नसेल की त्यांच्या विरोधात मुलगामी संघर्षांच्या रस्त्याने जनतेने जावे आणि स्वतःच्या पुढाकारावर भरवसा निर्माण करावा. हेच कारण आहे की अय्यंकालींच्या वारशाला जनतेच्या शक्तीने लक्षात ठेवले पाहिजे. त्यांच्या स्मृतींना प्रगतीशील शक्तींनी जिवंत ठेवले पाहिजे.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9145332849
- अहमदनगर - 9156323976, 9657590491
- पुणे - 9422308125

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

### बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**


## कामगार बिगुल

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | सोमनाथ केंजळे, सत्यनारायण |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 9156323976, 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |

# अहमदनगर मध्ये पावसामुळे झोपडपट्ट्यांची दैन्यावस्था

✍ **संदीप सकट**

दिनांक 20 जुलै रोजी अहमदनगर शहरात झालेल्या जोरदार पावसाने मनपा प्रशासनाचा पक्षपाती आणि गलथान कारभार पुन्हा जनतेसमोर आणला. शहरातील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी कुठलीही योग्य व्यवस्था नसल्याने जनतेला मोठा त्रास सहन करावा लागला आणि या गंभीर परिस्थितीला प्रामुख्याने बळी पडला तो शहरातील झोपडपट्ट्या आणि वस्त्यांमध्ये राहणारा कष्टकरी, कामगार वर्ग. शहरातील अनेक झोपडपट्ट्यांमध्ये पावसाचे पाणी शिरून मोठे नुकसान झाले. अनेक झोपडपट्ट्यांमधील घरांमध्ये 3 ते 4 फुटापर्यंत पाणी शिरले होते, अनेकांचे संसार उपयोगी साहित्य पावसात वाहून गेले, गॅस शेगडी, इलेक्ट्रॉनिक वस्तू, टीव्ही, फॅन, खाण्याच्या साहित्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

सिद्धार्थ नगर झोपडपट्टी मध्ये सुद्धा पूर दृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. झोपडपट्टीच्या सर्व बाजूंनी वाहून आलेले पाणी सरळ झोपडपट्टीमध्ये घुसले. अचानक आलेला पाण्याचा तीव्र प्रवाह घरामध्ये शिरल्याने महिला, लहान मुले, वृद्ध यांच्यामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. लोक घर सोडून कुटुंबातील सदस्यांना घेऊन आश्रयस्थान शोधत होती. अनेकांच्या घरांची पडझड झाली. घरातील गरोदर महिला,आजारी वृद्धांना या भयानक परिस्थितीला सामोरं जावं लागलं.

शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये ही परिस्थिती निर्माण होण्याचं कारण म्हणजे मनपा प्रशासनाचे झोपडपट्ट्यांच्या प्रश्नासंदर्भात असलेलं कायमस्वरूपी दुर्लक्ष. नगर शहरातील एकूण लोकसंख्येपैकी 70 टक्के लोकसंख्या ही झोपडपट्ट्या आणि वस्त्यांमध्ये राहते. या ठिकाणी राहणारा वर्ग हा कष्टाची कामे, मोलमजुरी करून, कुठेतरी ठेकेदारी पद्धतीने काम करून जगणारा वर्ग आहे. पावसाच्या पाण्याप्रमाणे या ठिकाणी राहणाऱ्या वर्गाला इतर अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. या ठिकाणी मनपा प्रशासनाच्या वतीने कुठल्याही प्राथमिक नागरी सुविधा पुरवल्या जात नाहीत. अस्वच्छ शौचालय, पिण्याचा पाण्याचा प्रश्न, उघड्या नाल्या, चेंबर्स, कचराकुंड्या, गटारे, लाईटचे असुरक्षित खांब आणि विद्युत तारा, पाण्याचे डबके, घरासमोरील मैला वाहून नेणाऱ्या मोठ्या नाल्या, गटारी, आरोग्याचे प्रश्न अशा अनेक प्रश्नांना घेऊन हा कामगार कष्टकरी वर्ग वर्षानुवर्ष अशा अवस्थेत जगत आहे.

गैरसोयींमुळे नागरिकांचे जीव सतत जात आलेत. वर्षभरापूर्वीच सिद्धार्थ नगर बौध्दवस्ती मध्ये राहणारा वीस वर्षीय रोहित क्षिरसागर हा तरुण विजेचा झटका बसून मरण पावला. या अपघाताला वीज महामंडळच जबाबदार असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. रोहितच्या वडिलांनी वारंवार मागणी करून, महामंडळाकडे तक्रार करून देखील रोहितच्या घरावर असलेली जॉईंट तार बदलून दिली गेली नव्हती आणि या महामंडळाच्या गलथान कारभारामुळे रोहितला जीव गमवावा लागला. त्याचप्रमाणे मागील महिन्यात पोलीस हेडक्वार्टर परिसरामध्ये घरासमोरील लाईटच्या खांबामध्ये विद्युत प्रवाह उतरून झालेल्या अपघातामध्ये पूजा कुरे या एमबीए पूर्ण केलेल्या तरुणीला आपला जीव गमवावा लागला. या अपघाताची जबाबदारी विद्युत महामंडळाने स्वीकारली होती.

एकीकडे पावसाचे पाणी घरात शिरून आपल्या संसाराची, संसार उपयोगी साहित्याची राखरांगोळी होताना झोपडपट्टीतील जनता स्वतःच्या डोळ्याने पहात होती व दुसरीकडे कॉलन्या अपार्टमेंट मधील श्रीमंत वर्ग पावसाचा मनमुराद आनंद लुटताना दिसला. पाऊस सुरू होण्या अगोदरच मनपा प्रशासनाकडून स्वच्छता मोहीम राबविली गेली. ही मोहीम राबवून मोठमोठे बंगले, श्रीमंतांच्या कॉलन्यांमधील नाले चेंबर्स, नद्या, गटारी साफ करण्यात आल्या. परंतु मनपा प्रशासन झोपडपट्टीकडे फिरकले सुद्धा नाही. आजही झोपडपट्ट्यातील नाल्या, गटारे, चेंबर्स तुंबलेल्या आणि तुटलेल्या अवस्थेत आहेत. सर्व नाल्या, पाईप गाळाने-कचऱ्याने पूर्णपणे भरलेले आहेत. अनेक ठिकाणी नाल्यांच्या वरून मैला व घाण पाणी वाहत आहे. सर्वत्र घाण आणि चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. ड्रेनेजचे पाईप फुटल्याने ते पाणी पिण्याच्या पाण्यामध्ये मिक्स होत आहे आणि अशा दूषित पाण्यामुळे झोपडपट्टी आणि वस्त्यांमध्ये गंभीर आजार पसरत आहेत.

अशा परिस्थितीमध्ये झोपडपट्ट्यांमध्ये राहणारा हा वर्ग जगतोय की मरतोय याचं मनपा प्रशासन वार्डातील नगरसेवक, पुढाऱ्यांना, दलाल भ्रष्ट नेत्यांना काहीच देणंघेणं नाही. तक्रार घेऊन गेल्यास उडवाउडवीची उत्तरे देऊन स्पष्ट सांगितलं जातंय की तुम्ही फुकट मतदान केलेलं नाही, पैसे घेतले आहेत, आता काम करायला आमच्याकडे पैसे नाहीत. अहमदनगर महानगरपालिकेचा दरवर्षी 800 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर होतो. दलित वस्ती सुधार योजनेसाठी झोपडपट्ट्या साठी केलेली तरतूद आधीच अर्थसंकल्पामध्ये कमी टक्केवारी मध्ये असते. अनेक वेळा झोपडपट्ट्या दलित वस्त्यांमध्ये योजना न राबविल्यामुळे पालिकेत पडून राहिलेला निधी शहरातील श्रीमंतांसाठी केल्या जाणाऱ्या कामांमध्ये वर्ग केला जातो. योजनेअंतर्गत केलेल्या कामांचे कमिशन, टक्केवारी मनपा अधिकारी, पदाधिकारी, महापौर, नगरसेवक, कॉन्ट्रॅक्टर, ठेकेदार वस्तीतील दलाल स्वयंघोषित पुढारी या सर्वांमध्ये वाटली जाते; नंतर उरलेल्या पैशात झोपडपट्टीमधील कामे केली जातात आणि म्हणून झोपडपट्ट्या आणि वस्त्यांमध्ये केलेल्या छोट्या-छोट्या कामांमधून मिळणारे कमिशन, दलाली चोरून मिळणारा पैसा कमी प्रमाणात असल्यामुळे या झोपडपट्ट्या आणि कामगार कष्टकऱ्यांच्या वस्त्यांकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले जाते.

अशा भांडवलावर आणि नफ्यावर आधारित व्यवस्थेत कष्टकरी कामगार वर्गाला जनावरासारखे जगणं भाग पाडलं जातं. निवडणुकीच्या काळात मोठ्या मोठ्या घोषणा केल्या जातात, मोठी मोठी आश्वासने दिली जातात, छोटी-मोठी कामे केली जातात आणि झोपडपट्टीतील कामगार कष्टकरी वर्ग या भूलथापांना बळी पडतो. जातीचं, धर्माचं, पैशाचं राजकारण करून समाजाच्या वाटण्या केल्या जातात. वर्षानुवर्ष मतदान करूनही जनावरासारखे भयंकर जगणे वाट्याला येणाऱ्या कामगार कष्टकरी वर्गाने समजून घेणे गरजेचे आहे की, आमच्या बाजूचे राजकारण आणि आमच्या हिताचे राजकारण हे श्रीमंत भांडवलदार व्यापारी वर्गाचे राजकारण कधीच असू शकत नाही. आमच्या जगण्या-मरण्याचे मुद्दे हे राजकीय मुद्दे बनले पाहिजेत आणि हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा कामगार कष्टकरी वर्गाच्या बाजूचं वर्गीय राजकारण करणाऱ्या पक्षाच्या बाजूने कष्टकरी जनता उभी राहिल.

# चांगले जीवन, स्वच्छ पाणी, शौचालय आणि परिसरातील स्वच्छतेच्या अधिकारासाठी भारताच्या क्रांतिकारी कामगार पक्षाने मुंबईच्या मानखुर्द विभागात चालवले जन-साफसफाई अभियान

✍ **बिगुल पत्रकार**

भारताच्या क्रांतिकारी कामगार पक्षाने ४ जुलै रोजी चांगले जीवन, पाणी, शौचालय व स्वच्छतेच्या मुद्द्याला घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम पूर्व विभाग (गोवंडी) येथे आयुक्तांना निवेदन दिले. या अगोदर या प्रश्नावर मानखुर्द गोवंडी विभागातील लल्लुभाई कंपाऊंड, साठेनगर, झाकीर हुसेन नगर मध्ये अभियान चालवण्यात आले. लोकांमध्ये अभियान चालवत असतांना समर्थनात हजारो स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या.

सोबतच पत्रके वाटून चौक सभा घेत सांगण्यात आले कि आपल्या या भारतात दोन चित्र पाहायला मिळत आहेत. पत्रकाद्वारे देशातील आर्थिक विषमतेचे चित्र मांडले गेले. एका बाजूला कुपोषणामुळे होणारे मृत्यू आणि दुसरीकडे धनदांडग्यांची ऐयाशी, एकीकडे महासत्तेच्या वल्गना आणि दुसरीकडे पाणी, साफ-सफाई, शौचालय व स्वच्छते सारखे मुलभूत प्रश्न सुद्धा वर्षानुवर्षे प्रलंबित असणे हा विरोधाभास यातून प्रकर्षाने मांडण्यात आला. मुंबई शहराची दोन चित्र, ज्यात एका बाजूला मोठ-मोठे रुंद रस्ते, हॉस्पिटल, स्वच्छ पाणी, चोवीस तास वीज यासारख्या अनेक सुविधा आणि दुसरीकडे याच सगळ्या सुविधा निर्माण करणाऱ्या, चालवणाऱ्या कामगार कष्टकऱ्यांच्या गोवंडी, मानखुर्द, शिवाजीनगर, मंडाला सारख्या गरिबांच्या वस्त्या जिथे सर्वत्र घाणीचे, प्रदुषणाचे, देवनार डम्पिंग ग्राउंड व दुसरीकडे बायोगॅस ट्रीटमेंट प्लांट (एस एम एस) चे साम्राज्य आणि नरकासमान जिंदगी या पत्रकातून जनतेसमोर मांडली गेली. 'सुंदर' मुंबईला सुंदर ठेवणाऱ्यांचे जीवन नरक बनवणाऱ्या नफेखोर, भांडवली व्यवस्थेचा यात पर्दाफाश करण्यात आला.

मानखुर्दच्या गरीब, कामगार, कष्टकरी जनतेने आपल्या मूलभूत अधिकारांसाठी खालील मागण्यांना घेऊन आयुक्तांना निवेदन दिले.

१) २४ तास ३६५ दिवस स्वच्छ पिण्याचे पाणी द्या. डब्ल्यू. एच .ओ (जागतिक आरोग्य संघटना) च्या म्हणण्यानुसार प्रत्येक व्यक्तीला १५० लिटर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला पाहिजे पण झोपडपट्ट्या,वस्त्या, चाळी व लल्लुभाई कंपाऊंड सारख्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना ५० ते २५० रुपये पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधांसाठी खर्च करावे लागतात. तेव्हा मुंबईच्या श्रीमंत भागांप्रमाणे मानखुर्द मध्ये 24 तास नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.




२) लोकसंख्येच्या प्रमाणात निशुल्क शौचालयाची व्यवस्था असावी व त्याची साफसफाई आणि देखरेखेची जबाबदारी सरकारने म्हणजे बीएमसीने घ्यावी. स्वच्छ भारत अभियानाच्या मते २५ महिला व ३० पुरुषावर एक शौचालये असायला पाहिजे. परंतु मानखुर्द मधील झोपडपट्यात परिस्थिती अशी आहे की १९० पेक्षा जास्त लोकसंख्येवर एक शौचालय आहे. त्यात देखील कुठे पाणी नाही, कुठे वीज नाही, तर बहुतेक ठिकाणी साफ-सफाई देखील केली जात नाही. बहुतेक ठिकाणी वेळच्यावेळी दुरुस्तीच्या अभावाने भिंत पडणे, छत कोसळणे, किंवा शौचालये कोसळल्याने कित्येक लोकांचे जीव देखील गेले आहेत. त्यामुळे शौचालयाचे बांधकाम देखील त्वरित पक्के करण्यात यावे.

३) साठणारे व तुंबणारे खराब सांडपाणी या समस्येला थांबण्यासाठी पक्के नाले व गटार बनविण्यात यावे. जुने गटार व नाले दुरुस्ती करून त्वरित पक्के बनविण्यात यावे. पावसाळ्यात साठणाऱ्या खराब पाण्याच्या प्रकाराला रोखण्यासाठी त्वरित कारवाई केली जावी. त्यामुळे डेंगू मलेरिया लेप्टोसायरोसीस सारखे आजार पसरणार नाहीत.

४) रस्त्यावर जागोजागी कचरा पेट्या लावण्यात याव्यात. विभागात कुठेही रस्त्यावर कचरा साठणार नाही याची गांभीर्याने काळजी घेण्यात यावी व तशी ठोस पावले उचलावीत. बीएमसीच्या दत्तक वस्ती योजने अंतर्गत झोपडपट्टी व रस्त्यांची साफसफाई नियमित करण्यात यावी. या जागेवर तात्काळ जबाबदारीने पावले उचलून किंतु-परंतु न करता काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

निवेदन दिल्यानंतर उपस्थित लोकांना या अभियानाला पुढे देखील सुरु ठेवण्याचे आव्हान करण्यात आले. हा या अभियानाचा पहिला टप्पा होता. आपल्या मागण्या जर पूर्ण केल्या नाही तर हा संघर्ष अजून तीव्र रूप धारण करेल असा इशारा देण्यात आला.

# भारतातील बीपीओ कामगारांची दुर्दशा

✍ रवी

जसा दिवस उजाडतो तशी २४ वर्षीय सुमन आपला लांब, कंटाळवाणा, थकवणारा प्रवास सुरु करते. तब्बल दीड तासाच्या ह्या रोजच्या प्रवासामध्ये पुण्यातील हिंजवडीला पोचण्यासाठी तिला दोन बस बदलाव्या लागतात. ऑफिसला पोचल्यावर सुमनचे रूपांतर अमेरिकन सुझीमध्ये होते. तिला पुढचे साडे आठ तास अमेरिकन पद्धतीने बोलून ग्राहकांना हे पटवून द्यावे लागते की ती ७००० मैल दूर भारतात बसलेली नसून त्यांच्या शेजारी असलेल्या परिसरातूनच त्यांची मदत करत आहे. सुमन/सुझी एका कॉल सेंटरमध्ये काम करते. एका बीपीओ कामगाराच्या दैनंदिन जीवनाचे हे एक जुजबी वर्णन.

भारत ही बीपीओ कंपन्यांची आवडती बाजारपेठ. १३००० अब्ज रुपयांच्या जागतिक सेवा देणाऱ्या बाजारपेठेचा ५५% वाटा भारताचा आहे. स्वस्त श्रम दर आणि कुशल, इंग्रजी बोलणारे कामगार हे या अफाट नफा कमावणाऱ्या उद्योगाचे कारक आहेत. परंतु अनेक सर्वेक्षणांमधून असे दिसून येते की आय.टी. क्षेत्रातील सर्वात जास्त शोषण याच कामगारांचे होते. सतत कॅमेऱ्यांतून नजर ठेवून आणि कामावर जास्त तास राबवून त्यांचे शोषण केले जाते ज्यातून आरोग्याच्या अनेक समस्याही उद्भवतात.

कॉल सेंटरमधील कामगारांवर कामाचा व्याप, स्पर्धेचा दबाव आणि मॅनेजमेंटच्या पाळतीमुळे सतत ताण असतो. कॉल्सची संख्या, सरासरी कॉलचा वेळ आणि कॉल्स मधला वेळ यांद्वारे कामगारांचे परीक्षण केले जाते. सी.सी.टी.व्ही. आणि इलेक्ट्रॉनिक टाइमर द्वारे डेस्कपासून दूर असण्याच्या वेळेसोबतच बाथरूममध्ये असण्याच्या वेळेवरसुद्धा लक्ष ठेवले जाते. कामाचे तास सुद्धा कडक आणि ठरलेले असतात. लघवीला जाण्यासाठी दिलेल्या वेळेची वाट बघावी लागते. ग्राहकसुद्धा बहुतेकवेळा दीर्घ प्रतीक्षेनंतर चिडून बोलतात. कॉल ऑपरेटरच्या बोलतानाच्या भावना, शब्द उच्चारण, दक्षता आणि व्याकरणाचे मूल्यमापन करण्यासाठी टीमचे लीडर अनियतपणे कॉल्स ऐकतात. चुका झाल्यावर त्याची नोंद होऊन त्वरित चेतावणी दिली जाते. नोंदींच्या एका मर्यादेनंतर कॉउंसेलिंगसाठी जावे लागते किंवा नोकरीला मुकावे लागते.

वी. वी. गिरी राष्ट्रीय श्रम संस्थानाने सादर केलेल्या बीपीओ कामगारांच्या अहवालानुसार कॉल्स घेण्याचा दर मॅनेजमेंट असा ठेवते की कामगाराने दिवसाअखेर शक्तिहीनतेच्या स्थितीत असावे. दररोज शेकडो कॉल्स घेण्याच्या किंवा करण्याच्या या परिस्थितीची तुलना या अहवालामध्ये असेम्बली लाईन उत्पादन प्रक्रियेसोबत केली आहे. सर्वात जास्त तणाव वाढवणारा पैलू म्हणजे कॉल ऑपरेटरच्या भावना. कामगारांना नेहमीच प्रसन्न आणि दक्ष राहावे लागते. या सर्वांमुळे यांच्यातील एक मोठा भाग 'बर्न आऊट अँड स्ट्रेस सिन्ड्रोम'(अतिश्रमाने गळीतगात्र आणि तणावग्रस्त होणे) या रोगाने त्रस्त आहे. हा आजार कामगाराच्या अपेक्षा व आदर्श आणि सध्या काम करत असलेल्या पदाच्या गरजा यांच्या भेदामुळे निर्माण होतो. यात अजून भर म्हणून कामगारांच्या मूल्यांकनाच्या माध्यमातून मॅनेजमेंट स्पर्धेचे वातावरण तयार करते आणि कामगारांच्या श्रमाची घनता वाढवून अजून श्रम करवून घेते.

बीपीओ कंपन्या नेहमीच आज्ञाधारक कार्यबळाच्या शोधात असतात म्हणजेच असे कामगार ज्यांच्याकडे नोकरीची सुरक्षा नसते. त्यामुळे हे कामगार दबूनच राहतात आणि त्यांच्याकडून कितीही, कसेही काम करून घेता येते, हे गणित मालकांना आणि मॅनेजमेंटला चांगले माहित असते. बऱ्याच राज्यांनी बीपीओ कंपन्यांना इंडस्ट्रियल डिस्प्युट कायद्यामधून (औद्योगिक विवाद कायदा) मुक्त केले आहे. या कायद्यामध्ये कामगाराला अवाजवी पद्धतीने कामावरून काढण्यापासून संरक्षण आहे. पश्चिम बंगालमध्ये तर आय.टी./ बीपीओ कंपन्यांनी कामाचे तास ४० वरून ४८ केले आहेत.

कॉल सेंटरमधून सेवा देणारा कामगार ग्राहकांना त्यांच्याच देशाचा आहे असे भासवण्यासाठी कामगारांची खरी ओळख लपवली जाते. त्यासाठी बीपीओ कंपन्या अनेक प्रयत्न करतात. पाश्चात्त्य बोली येण्यासाठी अनेक कामगारांना अमेरिकेत पाठवले जाते. तिथे त्यांचे व्हॉईस मॉड्युलेशन आणि शब्द उच्चाराचे ट्रेनिंग होते. पाश्च्यात्य संस्कृतीचा परिचय होण्यासाठी बेसबॉल सारखे खेळ खेळवतात, बेवॉच सारखे सिनेमे दाखवले जातात. विदेशात जगण्याची स्वप्न बघणाऱ्या काहींना हे आकर्षक वाटत असेल, पण वास्तवात भारतात परत आल्यावरही हे नवीन व्यक्तित्व कामगारांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनते. कामाच्या वेळेनंतरसुद्धा ते या नवीन व्यक्तित्वानेच स्वतःला ओळखू लागतात आणि सामाजिक-सांस्कृतिक गोंधळलेपणाचे बळी होतात. संध्याकाळचा वेळ हा सर्वसामान्य माणसासाठी मित्रांसोबत, कुटुंबासोबत घालवण्याचा वेळ असतो. पण बीपीओ कामगारांसाठी मात्र हा सर्वाधिक व्यस्ततेचा वेळ आहे. कामाच्या विचित्र शिफ्टमुळे या कामगारांचे सामाजिक जीवन जवळपास शून्य होऊन जाते. रात्रीची शिफ्ट करणारा कामगार दिवसाचा वेळ झोपण्यात घालवतो, निद्रानाशाचा बळी होतो, शरीरही अशक्त होत जाती, आणि यामुळे त्याचे समाजासोबतचे नाते कमकुवत बनते. कित्येक असे कामगार आज एकटेपणाच्या दरीमध्ये अडकले आहेत जे शेवटी नशेच्या मार्गाला लागले आहेत. एवढेच नाही तर अनेकवेळा पाश्चात्य देशातील ग्राहकांकडून या कामगारांना वांशिक शिवीगाळ केली जाते. गुरुग्राममध्ये केलेल्या ३०० बीपीओ कामगारांच्या सर्व्हेमध्ये ९५% कामगारांना दररोज वांशिक शिवीगाळ ऐकावी लागते.

कॉल सेंटरमध्ये काम करणारा एक साधारण व्यक्ती १८ ते ३० या वयोगटातील आहे. या कामगारांना ८००० ते १५००० एवढा मासिक पगार मिळतो. कामगारांना 'कॉल सेंटर एक्झिक्युटीव्ह', 'कस्टमर केयर एक्झिक्युटीव्ह' असे गोंडस नाव असलेले पद देऊन मॅनजमेंट त्यांचे पद खूप उच्च दर्जाचे आणि अधिक अधिकार असलेले आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करते. पण हा मोठेपणा फक्त नावालाच आहे, पगार आणि करिअर वाढीमध्ये याचा काही एक उपयोग नाही. विचित्र कामाच्या वेळा आणि तणावामुळे या तरुणांमध्ये उदासीनता, दीर्घकालीन थकवा, अंगदुखी, निद्रानाश, चिंता, अस्वस्थता, चिडचिड आणि औदासीन्य या रोगांची लागण होताना दिसून येते. वैद्यकीय रजा मिळवणे सुद्धा कठीण असते. शिफ्टच्या चार ते सहा तास आधी टीम लीडर कडून रजेची संमती घ्यावी लागते. असे न केल्यास ती रजा 'अनियोजित' पकडली जाते आणि नोकरी गमावण्याची शक्यता सुद्धा उद्भवते.

या देशातील राज्यव्यवस्थाच मोठमोठ्या उद्योगपतींच्या खिशात असल्याने आज बीपीओ कामगारांच्या समस्यांना अधोरेखीत करायचे सोडून त्यांच्या 'सुखी आयुष्या'चे ढोल पिटले जात आहेत. वेळोवेळी त्यांच्या युनियन बांधणीच्या गरजेवर घाव घातला जातो. कामगारांना दिल्या जाणाऱ्या मोठमोठ्या नावाच्या पदांमुळे त्यांना 'कामगार' या शब्दापासून दूर ठेवले जाते आणि त्यांची कामगार वर्गीय चेतना विझवली जाते. नफ्यावर आधारलेली भांडवली व्यवस्था या तरुणांकडून कमीत कमी पगारातून जास्तीत जास्त श्रम कसे काढून घेता येईल हाच प्रयत्न करत असते, कारण नफ्याची निर्मिती श्रमाच्या लुटीतूनच होत असते.

# हरियाणाच्या वीट भट्ट्यांमध्ये गुलामांप्रमाणे काम करणारे बिहारी कामगार

✍ अनुपम

म्हणायला देशातून वेठबिगारी समाप्त झाली आहे, पण देशाच्या अनेक भागांमध्ये वीट-भट्ट्या, धनिक शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये आणि कारखान्यांमध्ये आजही हजारो कामगार वेठबिगार म्हणून काम करायला बाध्य आहेत. अनेक ठिकाणी तर संपूर्ण परिवारालाच वेठबिगार म्हणून ठेवले गेले आहे. मध्ये-मध्ये जेव्हा कामगार मालकांच्या तावडीतून सुटून जातात, तेव्हा त्यांची भयानक दशा लोकांसमोर येते. अशा मामल्यांमध्ये प्रशासनाचा दृष्टीकोण अनेकदा अत्यंत गलिच्छ असतो. वेठबिगार कामगारांना "मुक्त करण्याचे" समर्थन केले जाते, वर्तमानपत्रांमध्ये फोटो छापले जातात, आणि त्यानंतर या कामगारांना त्यांच्या स्थितीमध्ये सोडून दिले जाते. अनेक असे मामले समोर आले आहेत, ज्यामध्ये सोडवले गेलेले कामगार परत वेठबिगार बनायला बाध्य झाले. दुसरीकडे, वेठबिगार बनवणाऱ्यांविरोधात अनेकदा काहीच कारवाई होताना दिसत नाही.

अशाच एका मामल्यामध्ये बिहार मध्ये 70 वेठबिगार कामगार हरियाणाच्या कुरुक्षेत्र येथे स्वतंत्र करवले गेले. त्यांच्यामध्ये गर्भवती महिला आणि 12 वर्ष वयापर्यंतची मुले सुद्धा आहेत, जे जवळपास एक वर्षांपासून तिथे वीट भट्टीवर काम करत होते. त्यांना कामाची मजुरी दिली जात नव्हती, अत्यंत वाईट आणि कमी जेवण दिले जायचे, मारहाण केली जात होती आणि गुलामांप्रमाणे 12-13 तास काम करवले जात होते. ते त्या जागेला सोडून कुठे जाऊ शकत नव्हते.

गेल्या 28 जूना रोजी एका सामाजिक कार्यकर्त्याच्या प्रयत्नांतून कुरुक्षेत्राच्या दिवाना गावातून या कामगारांना सोडवले गेले, पण पोलिसांनी ना कोणती केस दाखल केली आणि ना अटक केली, जेव्हाकी वेठबिगारी समाप्तीच्या कायद्यानुसार वेठबिगार कामगार ठेवणे हा एक गंभीर गुन्हा आहे. कुरुक्षेत्र प्रशासनाने मालकांच्या तावडीतून सुटलेल्या कामगारांना कायद्यानुसार सोडवले जाण्याचे प्रमाणपत्र सुद्धा नाही दिले. या प्रमाणपत्राशिवाय हे लोक 'वेठबिगार पुनर्वसन योजने' अंतर्गत नुकसान भरपाईचा दावाही करू शकत नाहीत आणि ना वेठबिगार कामगारांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांचा लाभ त्यांना मिळू शकतो. योजनेअंतर्गत सोडवलेल्या पुरुष कामगारांना थकलेल्या मजुरी शिवाय एक-एक लाख रुपये आणि महिलांना तसेच मुलांना दोन-दोन लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचा नियम आहे.

कामगारांप्रती प्रशासनाचा दृष्टीकोण कसा असतो, याला समजण्यासाठी ही घटना पुरेशी आहे. कुरूक्षेत्राच्या पेहोवा तालुक्यातील परगणा मॅजिस्ट्रेटला जेव्हा सर्टीफिकेट आणि नुकसानभरपाई बद्दल विचारले गेले तेव्हा त्यांनी उत्तर दिले की ते प्रकरणात लक्ष घालतील. मग त्यांनी 21 कुटुंबांना एक-एक हजार रुपये मिळवून दिले आणि म्हटले की आता अजून काही होऊ शकत नाही, त्यामुळे त्यांनी या पैशातून तिकीट काढून आपल्या गावी परत गेले पाहिजे. बेशरमपणाची हद्द बघा की त्यांनी म्हटले की "खाऊ पण घातले आहे ना!".

या कुटुंबांमध्ये एकूण 23 पुरुष, 21 महिला आणि 40 मुलं होती ज्यांच्यामध्ये काही तान्ही बाळं सुद्धा होती. वीटभट्टीमध्ये काम करणाऱ्या कामगारांकडून आधार कार्ड किंवा इतर सर्व कागदपत्र घेतली जातात, जेणेकरून कुठेही जाणे शक्य होऊ नये. बाल-कामगार अजयने सांगितले की "आम्ही पूर्ण दिवस वीटा थापायचो आणि फारतर जेवायला खिचडी मिळायची. जर आम्ही अजून काही मागितले तर मारले जायचे. कधी-कधी तर विनाकारण मारले जायचे. मी छोटा होतो त्यामुळे मला हातानेच मारत, पण आई-वडिलांना लाठीने मारत.

वीटभट्टीवर काम करणाऱ्या अनेक महिला रातांधळेपणाने ग्रस्त झाल्या आहेत आणि मुलांना कुपोषणामुळे चर्मरोग झाले आहेत. गर्भवती महिलांना सुद्धा सोडले जात नव्हते आणि त्यांच्याकडूनही काम करवले जात होते. त्यांना धमकी दिली जात होती की जर त्यांनी काम केले नाही तर त्यांच्या पोटावर लाथ मारून बाळाला मारले जाईल. इतके कठिण काम करूनही त्यांना मजुरी मिळत नव्हती. त्यांच्याकडून रोज 1500 वीटा बनवल्या जात होत्या. मालक प्रत्येकी 1000 वीटांवर रु. 5000 नफा मिळवत होता, पण कामगारांना पोटभर जेवणही देत नव्हता. ठेकेदाराने या कामगार कुटुंबांना सुरूवातीला 10,000 ते 15,000 रुपये दिले पण त्यानंतर त्यांना पूर्ण वर्षभर काहीच मिळाले नाही. त्यांच्याकडचे पैसे, इतकेच नाही तर त्यांचे मोबाईल फोन सुद्धा हिसकावून घेतले. एका कामगार महिलेने लपवून ठेवलेल्या एका मोबाईलद्वारे कशीबशी बाहेर बातमी पोहोचवली आणि तेव्हा त्यांना सोडवणे शक्य झाले.

बिहार कदाचित असे राज्य आहे जिथले लोक नोकरीच्या शोधात सर्वात जास्त प्रवास करतात. ते पोटाची आग विझवण्यासाठी काश्मिर ते कन्याकुमारी जातात. ते खाणींमध्ये, कपड्याच्या कारखान्यांमध्ये, समुद्र किनाऱ्यावरील भागांमध्ये काम करतात. ते प्रत्येक प्रकारचे धोकादायक काम करतात. मोठ्या संख्येने तिथले गरिब कामगार देशाच्या वीटभट्ट्यांवर सुद्धा काम करतात. बिहारच्या बांका जिल्ह्यातील मुसहर जातीतील दलित कुटुंबांना एक ठेकेदार असे सांगून घेऊन आला होता की त्यांना प्रत्येकी 1000 वीटांमागे रु. 660 मिळतील, दररोज फक्त 8 तास काम करावे लागेल आणि रोज 500 वीटा प्रत्येकाला बनवाव्या लागतील. पण तिथे पोहोचल्यावर त्यांना वेठबिगार करण्यात आले.

**अनुवाद: अतुल**

# रेल्वे खाजगीकरणाच्या रुळावर बुलेट ट्रेनच्या वेगाने पळणारे मोदी सरकार

## हजारो रेल्वे कर्मचारी रस्त्यावर, परंतु केंद्रीय युनियन्स घोषणाबाजी च्या पुढे जाण्यास तयार नाहीत!

✍ सत्यम

मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात रेल्वेला खाजगीकरणाच्या रुळावर बुलेट ट्रेनच्या गतीने पळवले गेले आहे. **रेल्वेचे टप्प्या-टप्प्यांमधील खाजगीकरण तर अगोदरच सुरू झाले होते, परंतु मोदीच्या मागील कार्यकाळामध्ये त्याला वेगवान करण्यात आले आणि आता तर रेल्वेला भांडवलदारांच्या हातामध्ये देण्याची कवायत अंदाधुंद पद्धतीने सुरू करण्यात आली आहे.** रेल्वेमंत्री पियुष गोयल यांच्या पुढाकारामध्ये रेल्वे मंत्रालय शंभर दिवसाचा "ॲक्शन प्लॅन" व "कुकर्म योजना" घेऊन आला आहे ज्याला 31 ऑगस्ट 2019 पर्यंत लागू करण्यासाठी तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चुकूनही असा विचार करू नका की या "ॲक्शन प्लॅन" मध्ये गुरा-ढोरां सारखं प्रवास करणारे करण्यास बाध्य असलेल्या कोट्यवधी सामान्य प्रवाशांसाठी सुविधा वाढविणे, रेल्वेची सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे किंवा रेल्वेमध्ये रिकाम्या पडलेल्या 2.5 लाख पदांना भरण्याची मांडणी करण्यात आली आहे. नाही, बिलकुल नाही. या 'छोट्या-मोठ्या' कामासाठी का मोदीसरकार सत्तेवर आले आहे?

**या ॲक्शन प्लॅनमध्ये इतरही घातकी प्रस्तावांसोबतच खाजगी प्रवासी गाड्या चालविण्याचा प्रस्ताव आहे.** शंभर दिवसांच्या आत अशा दोन गाड्या चालू लागतील. लखनऊ ते दिल्ली मध्ये चालणारी सेमी हाय स्पीड एसी ट्रेन, तेजस एक्सप्रेस, देशातील पहिली खाजगी ट्रेन असेल. एवढेच नाही तर सरकार राजधानी आणि शताब्दी सारख्या प्रीमियम गाड्यांचे संचालन सुद्धा खाजगी ऑपरेटरांना सोपवू पाहत आहे, ज्यासाठी पुढील ४ महिन्यांमध्ये टेंडर काढले जाईल. हा प्रयोग जर यशस्वी झाला तर मग एकेक करून सर्व रेल्वे देशी-विदेशी कंपन्यांना चालविण्यास देण्याचा मार्ग मोकळा होईल.

**ॲक्शन प्लॅन मधे दुसरा मोठा प्रस्ताव आहे की रेल्वेच्या उत्पादन विभागांचे कंपनीकरण.** रेल्वे बोर्डाद्वारे तयार दस्तावेजानुसार रेल्वेचे ७ उत्पादन विभाग, पश्चिम बंगालमधील चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स, उत्तर प्रदेशाच्या वाराणसीमधील डिझेल इंजिन कारखाना आणि रायबरेली मधील मॉडर्न कोच फॅक्टरी, पंजाबच्या कपूरथला मधील रेल कोच फॅक्टरी, पटियाला मधील डिझेल आधुनिकीकरण कारखाना, चेन्नईमधील इंटिग्रल कोच फॅक्टरी आणि बंगलोर मधील व्हील अँड ॲक्सेल प्लांट आणि या ७ विभागाशी संबंधित सर्व कार्यशाळांना 'इंडियन रेल्वे रोलिंग स्टॉक कंपनी' नावाने एक कंपनी बनवून तिच्या स्वाधीन केले जाईल. हे आणखी काही नाही तर उत्पादनाला खाजगी कंपन्यांच्या हाती सोपविण्याच्या दिशेने पहिले पाऊल आहे. येणाऱ्या पुढील काळामध्ये या कंपनीचे शेअर खाजगी कंपन्यांना विकले जातील आणि कालांतराने पूर्ण कंपनीच त्यांच्या हवाली केली जाईल. महानगर टेलिफोन निगम लिमिटेड (एमटीएनएल) आणि भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) ला ज्या पद्धतीने बरबाद करून चवली-पावली च्या किमतीने विकण्याची तयारी चालू आहे, त्याच दुर्दशेच्या दिशेने रेल्वेला सुद्धा ढकलले जात आहे.

एवढेच नाही तर सरकारचा पाळीव अर्थशास्त्री विवेक देब्रॉयच्या नेतृत्वामध्ये बनवलेल्या **'रेल्वे पुनर्घटन कमिटी' आणि नीती आयोगाने जोरदार शिफारस केली आहे की सरकारने रेल्वेमध्ये खाजगी कंपन्यांच्या भागीदारीचा रस्ता मोकळा केला पाहिजे.** कमिटीचं म्हणणं आहे की रेल्वेच्या नॉन-कोर फंक्शन म्हणजे हॉस्पिटल, शाळा, कारखाने, वर्कशॉप, रेल्वे पोलीस इत्यादींना कमीत कमी पुढील दहा वर्षांसाठी खाजगी क्षेत्राच्या स्वाधीन केले गेले पाहिजे.

हे सांगण्याची गरज नाही की खाजगी हातांमध्ये जाण्यासोबतच रेल्वेच्या भाड्यामध्येही अतिशय वाढ होईल. रेल्वेवर स्वस्त भाड्याचा किती बोजा पडत आहे, याचे वातावरण बनविण्यासाठी 'गिव इट अप' नावाने प्रचार अभियान चालवून लोकांना रेल्वे तिकिटावरील सबसिडी सोडण्यास सांगितले जात आहे. परंतु रेल्वे प्रवाशांची मोठी बहुसंख्या गरीब आणि कमी उत्पन्नवाल्या लोकांची असते, त्यांना माफक दरात प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची आहे. देशातील सामान्य लोकांकडून अब्जावधी रूपयांचा टॅक्स यासाठी नाही वसूल केला जात की त्यातून धनिकांना सबसिडी दिली जावी आणि नेत्यांचा व अधिकाऱ्यांचा चैनीचा खर्च उचलला जावा.

### जनतेच्या पैशातून उभे केले गेलेल्या रेल्वे संसाधनांच्या जीवावर खाजगी भांडवलदार गोळा करतील नफा

रेल्वेगाड्यांना खाजगी चालकांच्या हातामध्ये सोपविण्याच्या मागे किती मोठा खेळ आहे हे समजूण घेणे गरजेचे आहे. रेल्वे सारख्या उद्योगाला खाजगी तत्वावर चालवण्याची लायकी भारतातील कोणत्याच भांडवलदाराकडे नाहीये. यासाठी जमीन घेणे, स्टेशन, सिग्नल आणि नियंत्रण व्यवस्थेसारख्या मूलभूत संसाधना मध्ये स्थिर भांडवलाचा अतिशय मोठा हिस्सा खर्च करावा लागेल ज्याच्या परताव्यासाठी वीस ते पंचवीस वर्ष सुद्धा लागतील. जेव्हा की फक्त एखाद्या रेल्वेचे परीचलन (म्हणजे रेल्वे चालवणे) हातामध्ये घेण्यात स्थिर भांडवलामध्ये खूपच कमी गुंतवणूक लागेल. सार्वजनिक भांडवलापासुन बनविलेल्या मूलभूत सुविधांचा लाभ त्याला मिळत राहील. खाजगी ऑपरेटर रेल्वेच्या फेऱ्यांच्या हिशोबात पैसे देईल अथवा एकूण कमाईचा एक हिस्सा रेल्वेला भरेल. तो तिकीट कापणे, चेक करणे, साफ-सफाई इत्यादी साठी काही कर्मचारी ठेवेल आणि भाडे वसूल करून आपला नफा काढून घेईल, म्हणजेच बिना गुंतवणूक प्रचंड कमाई! तोट्याची जवळजवळ सगळी जोखीम सार्वजनिक क्षेत्रांकडे राहील आणि नफ्याची मोठी रक्कम खाजगी मालकांच्या खिशामध्ये जाईल. याच प्रकारे सार्वजनिक भांडवलाच्या बळावर खाजगी उद्योगपती नफा कमावेल, त्याचे भांडवल वाढत जाईल आणि एक दिवस तो स्वतः रेल्वेच्या एका हिश्श्याला विकत घेण्याइतके भांडवल जमा करेल. अशाच पद्धतीने अगोदर सुद्धा भांडवलदारांनी सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उपक्रमांना चांगल्या प्रकारे पिळवटून आपले भांडवल वाढविले आणि मग त्याच भांडवलाच्या बळावर सार्वजनिक उपक्रमांना विकत घेतले. मागील तीन दशकांमध्ये केंद्रामध्ये सत्तेवर राहिलेल्या सर्वच पक्षांच्या सरकारांनी या कामांमध्ये त्यांची मदत केली परंतु भाजपाची सरकारं या खेळाला सर्वात खुल्लम खुल्ला खेळत आली आहेत. वाजपेयी सरकारने तर पहिल्यांदा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना विकण्यासाठी 'निर्गुंतवणूक मंत्रालय'च बनवून टाकले होते. आता मोदी सरकार या कामाला सर्वोच्च निर्लज्जतेसह करण्यास तयार आहे.

### रेल्वे गाड्या सोबतच स्टेशनांना सुद्धा खाजगी कंपन्यांना विकण्याचा काम सुरू

मोदी सरकारच्या शंभर दिवसाच्या ॲक्शन प्लॅन नुसार 50 रेल्वे स्टेशनांची निवड करून त्यांना खाजगी हातांमध्ये देण्याचा निर्णय घेतला गेला आहे. भोपाळच्या हबीबगंज स्टेशनला दोन वर्ष अगोदरच बंसल ग्रुपला दिले गेले आहे. ही कंपनी तिथे वीज, प्लेटफॉर्मची देखरेख, पार्किंग, फुड स्टॉल, वेटींग रूम इत्यादींमधून तर कमाई करेलच, सोबतच रेल्वे स्टेशनच्या जमिनीवर मॉल बनवून सुद्धा करोडोंची कमाई करेल. मोदीच्या मागील कार्य काळातच अजून 23 स्टेशनची बोली लावणे निश्चित केले गेले होते. यामध्ये कानपुर सेंट्रल, अलाहाबाद, लोकमान्य टिळक टर्मिनस, पुणे, ठाणे, विशाखापट्टणम, हावडा, कामाख्या, फरीदाबाद, जम्मू तावी, उदयपुर सिटी, सिकंदराबाद, विजयवाडा, रांची, चेन्नई सेंट्रल, कोळीकोड, यशवंतपुर, बेंगलोर कँटोनमेंट, भोपाळ, मुंबई सेंट्रल, बांद्रा टर्मिनस, बोरिवली आणि इंदोर सारखी अतिशय व्यस्त आणि कमाई करून देणारी स्टेशनं सामील आहेत. आता नव्या 'कुकर्म योजने'मध्ये एकूण ५० स्टेशनांना रक्तशोषकांच्या हवाली केले जाईल. विदेशी कंपन्यांना सुद्धा बोली लावता यावी यासाठी रेल्वेमध्ये एफडीआय म्हणजे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा मार्ग सुद्धा सोपा बनवला जात आहे. रेल्वेच्या सूत्रांचं म्हणणं आहे की येणाऱ्या काळामध्ये सरकारने 'पुनर्विकासाच्या' नावावर खाजगी हातांमध्ये सोपविण्यासाठी एकूण 400 स्टेशनची यादी तयार करून ठेवली आहे. रेल्वेच्या प्लेटफार्म वरून छोट्या फेरीवाल्यांना तर अगोदरच बाहेर हाकलून देण्यात आले आहे. आता कोट्यवधी गरीब लोक रेल्वेची वाट पाहण्यात दिवस किंवा रात्र घालवत होते ते सुद्धा बाहेर केले जातील, खिशात पैसे असतील तर वेटींग रूम अथवा लाउंजमध्ये जाऊन वाट पहा, नाहीतर निघा बाहेर.

### कंपनीकरणासोबतच मोठ्या प्रमाणावर कंत्राटीकरण निश्चित आहे.

सध्या रेल्वेच्या सर्व उत्पादन विभागातील कर्मचारी भारतीय रेल्वेचे कर्मचारी असतात आणि त्यांच्यावर रेल्वे सेवा अधिनियम लागू होतो. या कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारच्या सुविधा मिळतात. कंपनीकरणा नंतर ग्रुप सी आणि डी चे कोणतेच कर्मचारी भारतीय रेल्वेचा हिस्सा भाग राहणार नाहीत. ग्रुप सी आणि ग्रुप डी चे कर्मचारी कंपनीचे कर्मचारी बनतील ज्यांच्यावर रेल्वे सेवा अधिनियम लागू होणार नाही. याशिवाय कॉन्ट्रॅक्टवर सुद्धा कर्मचारी ठेवले जातील. कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या सवलती मिळणार नाहीत, सेवा शर्ती सुद्धा बदलल्या जातील. रेल्वे बोर्ड फक्त रबरी स्टँप बनेल आणि फक्त दिशानिर्देश बनविण्याचं काम करेल. सर्व ताकद जीएम आणि डीआरएम च्या हातामध्ये असेल. त्यांचे प्रमुख उद्दिष्ट लोकांना दर्जेदार सेवा देण्याऐवजी अधिकाधिक नफा कमावणे असेल.

कंपनीकरण्याच्या मागे मागचा सरकारचा तर्क आहे की कंपनीच्या संबंधात सरकारची जास्त जबाबदारी असणार नाही आणि त्यांना आपला खर्च स्वतः:च उभा करावा लागेल. गरज पडल्यावर सरकार भांडवलाची व्यवस्था करेल, परंतु नवी कंपनी आयात किंवा निर्यातीसाठी रेल्वे बोर्डावर अवलंबून राहणार नाही. बीएसएनएल, ओएनजीसी आणि एचएएल सारख्या विशालकाय कंपन्यांची या सरकारने जी हालत केली आहे ते पाहून अंदाज लावणे कठीण नाही की रेल्वेच्या या कंपनीची काय अवस्था होणार आहे. स्वायत्तता देण्याच्या नावावर कंपन्यांना तोट्यात पोहोचवले जाईल आणि मग त्यांच्या अयशस्वी पणाचे वातावरण तयार करून त्यांना खाजगी कंपनीला विकले जाईल.

**खाजगीकरणासोबतच रेल्वेमध्ये उरलेल्या जवळपास १४ लाख कर्मचाऱ्यांचेच नाही तर जवळजवळ एकूण तेवढ्याच पेन्शनरांचे भविष्य सुद्धा दावणीवर लागेल.**

### रेल्वेच्या 26 हजार नोकऱ्या संपविण्याचा कार्यक्रम सुरू झाला आहे

ज्या दिवशी ३० मे ला दिल्लीमध्ये मोदी सरकारचे शपथ ग्रहण होत होते, त्याच दिवशी उत्तर रेल्वेच्या 26,000 नोकऱ्या संपवण्याचं परिपत्रक सुद्धा निघत होते. ३०मे ला उत्तर रेल्वेच्या डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर, लखनऊ यांच्याकडून जाहीर अधिसूचनेमध्ये उत्तर रेल्वेच्या एकूण 13 विभागांमधील जवळपास 26,000 पदं रद्दबातल केल्याची घोषणा केली गेली. मोदी सरकारच्या मागील कार्यकाळाच्या शेवटच्या दिवसांमध्येच या विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करून १ टक्क्यापर्यंत आणण्याची घोषणा केली गेली होती, म्हणजेच २६,२६० च्या ऐवजी २६० पदंच शिल्लक राहतील. ३० मे ला जाहीर झालेले हे अधिसूचना पत्र लखनऊ डिव्हिजनच्या सर्व कार्यालयांना पाठविण्यात आले.

याअंतर्गत अकाऊंटमध्ये १९१ पदं, इंजीनियरिंग मध्ये ७३३८ पदं, मेकॅनिकल(ओएएफ) मध्ये २७८३ पदं, मेकॅनिकल (सीडब्ल्यूडी) मध्ये १९३८ पदं, मेकॅनिकल (डीएसएलमध्ये) 1014 पदं, एसएंडीटी मध्ये १५७३ पदं, इलेक्ट्रिकल (जी ) मध्ये १५४१ पदं, ईलेक्ट्रिकल (टीआरडी अँड टीआरएस )मध्ये ५५०, मेडिकलमध्ये ८७५ पदं, स्टोअरमध्ये १९ पदं, सिक्युरिटी मध्ये १२९२ पदं आणि कमर्शियल मध्ये २६०१ पदं रद्द होतील. म्हणजेच या विभागांतील ग्रुप सी मध्ये १८,६०२ आणि ग्रुप डी मध्ये ७,६५८ पदं रद्दबातल होण्याच्या मार्गावर आहेत. असं नाहीये की रेल्वेच्या या विभागांकडे कामच शिल्लक नाही. वास्तविक ही पदं याच साठी रद्द केली जात आहेत की खूप साऱ्या विभागांमध्ये रेल्वेने कामांना आऊटसोर्स (खाजगी कंपन्यांकडे देणे) करून टाकले आहे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांकडे काहीच काम शिल्लक राहिलेले नाही. कंत्राटी पद्धतीने अतिशय कमी वेतनावर काम करून घेतले जात आहे. सरकार अशाच कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून रेल्वेचे सर्व काम करवून घेऊ पाहत आहे, ज्यांना ना किमान वेतन द्यावे लागेल आणि ना त्या सर्व सुविधा द्याव्या लागतील, ज्या रेल्वे कर्मचाऱ्यांनी मोठ्या संघर्षानंतर मिळविल्या होत्या.

### सर्व थापा आहेत, थापांचं काय?

नरेंद्र मोदी २०१४मध्ये जेव्हा पहिल्यांदा प्रधानमंत्री झाले होते तेव्हा वाराणसीतील आपल्या विजय सभेमध्ये त्यांनी म्हटले होते की रेल्वेला विकण्याच्या अगोदर ते मरणं पसंत करतील. पण हे तर सगळे थापाड्यांच्या राजाचे वायदे आहेत. नोटबंदी नंतर त्यांनी म्हटले होते, की ज्या चौकात जनता शिक्षा देण्यासाठी मला बोलवेल त्या ठिकाणी येईल. नोटबंदी ची शिकार झालेले सर्व लोक देशातील सर्वच चौकांमध्ये त्यांची आजपर्यंत वाट पाहत आहेत.

खाजगीकरणाचा हा अंधाधुंध कार्यक्रम तर आत्ता समोर आला आहे,पण रेल्वेचे तुकड्या-तुकड्यांमधील खाजगीकरण तर मागील पाच वर्षांमध्ये अतिशय वेगवान झालेले आहे.

### खाजगीकरण मागील अडीच दशकांपासून सुरू आहे, आणि युनियन्सचे डिंग्या हाकणे सुद्धा

रेल्वे सह सर्वच सरकारी क्षेत्रांमध्ये खाजगीकरण आणि उदारीकरणाची धोरणं लागू करण्याचा संपूर्ण कार्यक्रम तर १९९५ मध्येच पाचव्या वेतन आयोगाच्या रिपोर्ट मध्येच ठरविण्यात आला होता. त्यावेळी ट्रेड युनियन्स नेत्यांनी सुद्धा कोणत्याही अटी-शर्तींशिवाय त्याच्यावर शिक्कामोर्तब केले होते. त्याच वेळी हि दिशा ठरवली गेली होती कि येणाऱ्या वर्षांमध्ये रेल्वेच्या मोठ-मोठ्या वर्कशॉपमध्ये वटवाघुळ लटकतील आणि कबुतरं घरटी बनवतील. तेव्हापासूनच वर्कशॉप आणि इंजीनियरिंग स्टाफच्या कामांना एकेक करून बाहेर कंत्राटावर देण्याचा वेग वाढला. मोठा घास मोठ्या मगरींसाठी आणि छोटा घास छोट्या सुसरींसाठी. तुकड्या-तुकड्यांमध्ये संपूर्ण

पान 13 वर

# मंदीचे संकट पुन्हा एकदा कामगार वर्गाच्या जीवावर!

पान 1 वरून

वर्षांमध्ये विकली जावीत एवढी घरे विक्री अभावी पडून आहेत. उपभोग्य वस्तूंच्या म्हणजे बिस्कीट, तेल, साबण अशा वस्तूंच्या क्षेत्रातही विकास मंदावला आहे. हिंदुस्थान लिव्हर, ब्रिटानिया, डाबर अशा कंपन्यांनी विक्रीवाढीमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत घट नोंदवली आहे. पारले बिस्किटाचा खप कमी झाल्यामुळे जवळपास 10,000 कामगारांचा रोजगार धोक्यात आला आहे. बीएसएनएल, जेट ऐअरवेज, टाटा डोकोमो, एअरसेल, रिलायन्स कम्युनिकेशन, आय. एल. एफ. एस., एअर इंडिया सारख्या मोठ्या कंपन्या बंद पडल्या आहेत किंवा त्यांचा धंदा कमी झाला आहे. ऑगस्ट महिन्यात मॅन्युफॅक्चरींग क्षेत्रामध्ये वाढीचा दर 2.5 टक्के इतका कमी नोंदवला गेला. सर्व राष्ट्रीयीकृत बँकांमधील थकित कर्जाचा आकडा एकूण 9 ते 10 लाख कोटींवर पोहोचला आहे. अर्थव्यवस्थेची स्थिती बघता आदित्य बिर्ला चालू केलेली खाजगी बँक 18 महिन्यातच बंद करत आहेत, तर टाटांनी लायसन्स मिळून सुद्धा अजून बँक चालू केलेली नाही.

काही जण म्हणत आहेत की ही मंदीची चाहूल नाही, तर फक्त 'स्लोडाऊन' आहे म्हणजे अर्थव्यवस्थेची गती हळू झाली आहे. असे म्हणून नफ्याचा दर वाढेल अशी भावना निर्माण करण्याचे ते कितीही प्रयत्न करोत, सत्य लपलेले नाही. निती आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार यांनाही कबूल करावे लागले की गेल्या 70 वर्षांमधील अभूतपूर्व अशी ही परिस्थिती आहे आणि सरकारला तातडीने गंभीर पावले उचलावी लागतील. आर्थिक स्थिती इतकी वाईट झालेली आहे की रिझर्व बँकेकडे असलेल्या राखीव निधीतून सरकारने नुकतेच 1.76 लाख कोटी रुपये काढून घेतले आहेत. रिझर्व बँकेतील भांडवली अर्थतज्ज्ञांचा विरोध डावलून हे पैसे सरकारने काढले आहेत आणि या पैशांचे काय करणार विचारल्यावर अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी उत्तर दिले की हे पैसे कसे वापरले जातील हे सध्या सांगू शकत नाही ! थोडक्यात संकटाचा आकार इतका मोठा आहे की सरकारी पातळीवर प्रचंड संभ्रम आहे.

इतके मात्र **निश्चित आहे की या तथाकथित 'स्लोडाऊन'चा सर्वात जास्त मार पडणार आहे तो कामगार कष्टकरी वर्गावरच. कारखाने बंद होऊन नोकऱ्या जातात, दुकानं बंद पडतात आणि बेरोजगारी प्रचंड वाढते तेव्हा कोट्यवधी पैशांच्या राशीवर बसलेल्या मालकवर्गाचे ऐयाश जीवन तर सुरळीत चालू राहते, पण अगोदरच दोन वेळचे खाण्याची ददात असलेल्या कामगार वर्गाच्या जीवनावर मात्र कुऱ्हाडच कोसळते.** या वेळी असलेल्या संकटाचे गांभीर्य पाहता हे संकट प्रचंड मोठे आहे आणि मंदी अधिक बळावण्याचीच चिन्हे आहेत.

## भांडवलशाही एकमेव पर्याय? नव्हे सर्वाधिक अपयशी पर्याय!

'समाजवादा'चा, मार्क्सवादाचा अंत झाला आहे आणि भांडवली अर्थव्यवस्थाच एकमेव पर्याय आहे असे मांडणाऱ्या 'अर्थतज्ज्ञां'ची बोलती बंद होते जेव्हा मंदीचे संकट समोर ठाकते. चोरून-लपून का होऊन ही मंडळी मार्क्सच्या 'भांडवल'ची पारायणे करू लागतात. भांडवली 'विकास' होत राहू द्या म्हणजे तो सर्वांपर्यंत पोहोचेल; काही जण श्रीमंत होतील तेव्हाच तर उद्योग आणि संपदा निर्माण होईल आणि सगळ्यांपर्यंत पोहोचेल असे म्हणणारे आता गप्प बसलेले आहेत; सर्वांचे हित ही व्यवस्था का करू शकत नाही हा प्रश्न जणू अस्तित्वातच नाही असे ते भासवत आहेत. एरव्ही 'मुक्त बाजार', 'ईज ऑफ बिझनेस' म्हणजे 'धंदा करणे सोयीस्कर झाले पाहिजे' आणि 'व्यवसाय स्वातंत्र्याचा' जयघोष करणारे हे तज्ज्ञ मंदीचे संकट दिसू लागले की सरकारी हस्तक्षेपाची मागणी करू लागतात. आत्ताही तुम्ही पाहू शकता की सर्व भांडवली धंदेबाज वर्तमानपत्रे आणि टीव्ही चॅनेल्स रोज सरकार काय करणार याकडे नजरा लावून बसलेली आहेत. त्यांच्यापैकी जे निगरगट्ट आहेत ते निर्लज्ज्जपणे सांगत आहेत की सरकारने अजून 'सुधार' केले पाहिजेत आणि भांडवलदारांना मुक्त वाव दिला पाहिजे; अर्थातच ते हे सांगत नाहीत की गेली अनेक दशके इतका मुक्त वाव देऊन सुद्धा मंदी का आली आहे ते! 'मार्क्सवाद' अपयशी झाला आहे अशी ओरड करणारे हे लोक मंदी आली के हे सांगतच नाहीत की भांडवलशाहीचे कायमचे अपयश दाखवणारी सार्वत्रिक मंदी सतत का येते आणि कष्टकरी जनतेच्याच जीवाचा घास ती का घेते! विसाव्या शतकातील रशियन आणि चिनी क्रांतीच्या प्रयोगांकडे अपयश म्हणून बोट दाखवणारी ही मंडळी भांडवलशाही व्यवस्थेच्या अशा प्रकारच्या असंख्य मंदी आणि महामंदींचे विश्लेषण करण्यात सपशेल अपयशी ठरली आहेत, कारण अपयश कोणा व्यक्तींचे नसून संपूर्ण व्यवस्थेचे आहे. कसे ते पाहूयात.

## मंदीचे खरे कारण

मंदीचे कारण आहे नफ्याचा घसरता दर. विकासाचा खोटा दावा करणारी ही व्यवस्था फक्त आणि फक्त मालक वर्गाच्या नफ्यासाठीच चालते. जोपर्यंत नफ्याचा दर वाढता आहे, तोपर्यंत भांडवलदार गुंतवणूक चालू ठेवतात आणि जेव्हा नफ्याचा दर घसरू लागतो तेव्हा त्यांचा स्वत:च्याच या 'पवित्र' व्यवस्थेवरचा त्यांचा विश्वास पाचोळ्यासारखा उडून जातो आणि ते धंदा बंद करून अर्थव्यवस्थेला मरायला सोडून काढता पाय घेऊ लागतात. कामगार वर्गाने हे समजून घेणे आवश्यक आहे की मंदी का येते, कारण तेजी असो वा मंदी कामगार वर्गाचे मरण तर दररोजचे ठरलेलेच आहे आणि मंदीमध्ये तर जीवन असह्य होत असते. मंदी का येते हे समजण्यासाठी आपण भांडवली अर्थव्यवस्थेला खोलामध्ये समजले पाहिजे.

काही नेहमी वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊयात. 'जीडीपी' म्हणजे इंग्रजीत 'ग्रॉस डोमेस्टीक प्रोडक्ट' ज्याला म्हणतात ती आहे देशामध्ये एका वर्षात निर्माण होणाऱ्या सर्व मालाची (वस्तू, सुविधा, इत्यादी) किंमत. मीडियामध्ये साधारणत: ज्याला चुकीने 'जीडीपीचा दर' म्हणतात तो आहे 'जीडीपी वाढीचा दर' म्हणजे देशात निर्माण होणाऱ्या सर्व मालाच्या वाढीचा दर. जर देशात गेल्यावर्षी 150 लाख कोटी रुपयांचा माल निर्माण झाला आणि यावर्षी 165 लाख कोटींचा माल निर्माण झाला तर वाढीचा दर आहे 10 टक्के. सध्याच्या मंदीच्या वातावरणात हा दर 5 टक्क्यांवर आल्याचे तुम्ही ऐकले असेल. म्हणजे संपत्ती निर्मितीचा दर वाढतोय पण पूर्वीच्या 7 किंवा 8 टक्क्यांच्या तुलनेत हा दर 5 टक्क्यांवर आल्यामुळे चिंतेचे वातावरण आहे. हा दर कमी होण्याचा अर्थ थोडक्यात हा आहे की संपदा निर्मितीचा दर आणि पर्यायाने मालकांच्या नफ्याचा दर कमी होत आहे.

आता हे समजणे आवश्यक आहे की नफा कुठून येतो. सर्वसाधारण भ्रम हा आहे की मालक वस्तू बाजारात विकतात (अर्थातच ते स्वत: विकत नाहीत, तर विक्री करणारे कामगार, सेल्समन माल विकतात!) आणि जास्त भाव मिळाला किंवा जास्त वस्तू विकल्या की जास्त नफा मिळतो. वरवर दिसायला आणि अनेकदा जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवात हे खरे वाटत असले, तरी वास्तवापासून मात्र दूर आहे. का? सर्व माल आणि संपत्ती निर्माण होते तेव्हा काम तर कामगारच करतात, मालक तर उत्पादक कामांमध्ये सहभागी होतच नाहीत (छोटे मालक होतात, पण जसे ते मोठे होतात ते स्वत: उत्पादक श्रम करणे बंद करतात. छोटे मालकही सामील होतात तेव्हा ते श्रम तर इतर कामगारांपेक्षा जास्त करत नाहीत), त्यामुळे निर्माण झालेली संपदाच जर मालकांनी बनवली नाही, तर त्यांना नफा का जावा? यावर मालकांचे म्हणणे असते की भांडवल त्यांचे होते, त्यांनी गुंतवले आणि जोखीम पत्करली, जोखीम आहे कारण जास्त भाव मिळणे हे बाजारावर अवलंबून असते, माल विकला जाईलच की नाही याची खात्री नसते आणि मागणी-पुरवठ्यानुसार भाव बदलतात त्यामुळे नफा-तोट्याची अनिश्चितता निर्माण होते. या अनिश्चिततेलाच पुढे करून मालक असेही म्हणतात की जर तोटा आम्ही सहन करतो तर नफा आम्ही का घेऊ नये? यामध्ये अनेक खोट्या गोष्टी आहेत ज्यांना कामगार वर्गाने नीट समजले पाहिजे. पहिले हे की भांडवलाची खाजगी मालकी भांडवलदार-मालकांकडे आहे म्हणूनच ते गुंतवणूक करतात, जर भांडवल संचय कामगार वर्गाच्या सामूहिक मालकीचा असेल तरीही गुंतवणूक तर होऊच शकते. दुसरे हे की नफ्या-तोट्याची जोखीम बाजारामुळे निर्माण होते तर बाजार कशाला पाहिजे? सर्व उत्पादन साधनांची सामुहिक मालकी करून गरजेनुसार उत्पादन केले तर बाजाराची जोखीम रहातच नाही. तिसरे हे की जेव्हा तोटा होतो (किंवा नफ्याचा दर कमी झाला तरी), तेव्हा व्यवहारात तर मालक धंदा बंद करून पळ काढतात आणि कामगारांना मरायला सोडतात. तेव्हा वरचे सर्व तर्क खोटे आहेत, खरे वास्तव हे आहे की पुढे समजावल्याप्रमाणे कामगारांचे श्रम लुटून अधिक श्रीमंत होण्यासाठीच गुंतवणूक केली जाते. मालक गुंतवणूक करतात कारण त्यांना चढ्या दराने नफा हवा असतो, आणि जोवर तो मिळतो तोपर्यंतच ते गुंतवणूक करतात. याच अंकामध्ये 'प्रधानमंत्री महोदय..." या लेखात तुम्हाला याबद्दल अजून तर्क मिळतील.

पुन्हा मूळ प्रश्नाकडे येऊयात. नफा कुठून येतो? **जर बाजारातील जोखमीतून कोणाचा नफा आणि तोटा होत असेल, म्हणजेच एकाचा नफा हा दुसऱ्याचा तोटा आहे तर सर्व नफ्या तोट्यांची बेरीज शून्य असली पाहिजे. जर ती शून्य असेल तर देशाचा जीडीपी कुठून वाढला?** वाढलेली संपत्ती कुठून आली? निश्चितच नफ्याचा स्त्रोत बाजार नाही. याच अंकातील 'प्रधानमंत्री महोदय ..." या लेखातील सविस्तर मांडणीत सांगितल्याप्रमाणे प्रत्येक वस्तूचे एक 'मूल्य' असते. मूल्य म्हणजे किंमत नाही तर मूल्य म्हणजे वस्तू बनवण्यासाठी लागणारा सामाजिक दृष्ट्या आवश्यक श्रमकाळ. वस्तूच्या मुल्याभोवती बाजारातील मागणी पुरवठ्यामुळे किमंती फिरत असतात. एखाद्या वस्तूच्या मुल्यामध्ये ती वस्तू बनवण्यासाठी लागलेल्या इतर सर्व वस्तूंचे मूल्य आणि कामगाराचे श्रम सामील असते.

**कामगाराची श्रमशक्ती, म्हणजे काम करण्याची क्षमता, एकमेव अशी गोष्ट आहे जी स्वत:च्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करते.** म्हणजे काय? माणसाच्या श्रमशक्तीचे मूल्य म्हणजे दिवसभर काम केल्यानंतर श्रम करण्याची शक्ती परत यावी म्हणून जे अन्न-वस्त्र-निवारा-इत्यादी लागेल त्याला निर्माण करण्यासाठी लागणारा श्रम-काळ. **आज विज्ञान तंत्रज्ञानाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; त्यामुळे जर एखाद्या व्यक्तीला स्वत:ची श्रमशक्ती परत मिळवण्यासाठी अन्न-वस्त्र-निवारा इत्यादी गरजांसाठी स्वत:च मेहनत करायची असेल तर आज 8 तास काम करण्याची गरज नाही, उलट 8 तासांपेक्षा कमी म्हणजे समजा 2 तास किंवा कमी मेहनत सुद्धा पुरेशी आहे. मालक कामगाराला श्रमाच्या 8 तासांची मजुरी देत नाहीत तर त्याच्या जगण्याइतपत म्हणजे श्रमशक्तीच्या मुल्याला धरून मजुरी देतात, म्हणजे 2 तास किंवा तत्सम वेळेची किंमत बाजारभावाने देतात.** थोडक्यात मजूर 8 तासांपैकी जवळपास 2 तास स्वत:ची मजुरी निर्माण करतो (ज्याला म्हणतात आवश्यक श्रमकाळ) आणि राहिलेले 6 तास (ज्याला म्हणतात अतिरिक्त श्रमकाळ) मालकाचा नफा तयार करतो! अतिरिक्त श्रमकाळ हाच नफा देणाऱ्या मालाचा, म्हणजेच नफ्याचा स्त्रोत आहे! थोडक्यात मजूर जितका जास्त वेळ काम करेल, तितका मालकाचा नफा नक्कीच जास्त होईल. जेव्हा माल बाजारात विकला जातो तेव्हा नफा हातात येतो, पण नफा देणारा माल विकण्यासाठी लागलेले श्रम मात्र कामगाराने करून, मालकाकडे माल केव्हाच सुपूर्द केला आहे! तेव्हा नफ्याचा दर वाढवायचा असेल तर मालकापुढे **पहिला पर्याय आहे तो कामाचे तास वाढवणे**, 8 ऐवजी 10 किंवा 12 करणे. पण हे तर सहज शक्य नाही कारण मजूर विरोध करतात ! यामुळे अनेकदा **मालक श्रमाची सघनता वाढवण्याचा प्रयत्न करतात, म्हणजे कमी वेळेत जास्त काम करून घेण्याचा** प्रयत्न - त्यासाठी वेगाने काम करवणे किंवा यांत्रिकीकरण कामी येते.

सोबतच बाजारातील स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी प्रत्येक मालक प्रयत्न करतो की आपल्या मालाचा बाजारभाव कमी व्हावा. त्यासाठी आवश्यक आहे की तेवढ्याच वेळेत (म्हणजे तेवढेच श्रम वापरून) जास्त उत्पादन व्हावे आणि स्पर्धकांच्या तुलनेत आपल्या मालाचा भाव कमी व्हावा. यासाठी प्रत्येक मालक यांत्रिकीकरण करतो. परंतु मशिन लावल्यामुळे खर्च वाढतो आणि त्यामुळे नफ्याचा दर कमी होण्याची शक्यता निर्माण होते. वास्तवात मशिनमुळे तेवढ्याच वेळात जास्त उत्पादन होते आणि त्या मालकासाठी प्रती माल मूल्य कमी होते (कारण मूल्य म्हणजे बनवण्यासाठी लागलेला श्रमकाळ), जे बाजारातील सरासरी मूल्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे बाजार भावाला, किंवा सरासरी मूल्याला जरी वस्तू विकल्या, तरी जास्त माल विकून मालकाला नफा मात्र इतरांपेक्षा जास्त होतो. यात इतर स्पर्धकांनी सुद्धा वेगाने यांत्रिकीकरण केले तर मशिनमुळे झालेला तात्कालिक फायदा लवकर संपून, नफ्याचा दर कमी होण्याची प्रवृत्ती पुन्हा वर येते. परंतु इतर अनेक घटक आहेत की जे या प्रवृत्तीला थोपवण्याचे काम करतात. यामध्ये मशिन स्वस्त होणे, मजूरांना श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षाही कमी वेतन देणे, जीवनावश्यक वस्तू स्वस्त होऊन श्रमशक्तीचे मूल्यच कमी होणे, कामाचे तास वाढवणे, इत्यादी कारणांमुळे नफ्याचा दर टिकवणे अनेकदा शक्य होते. अर्थात दीर्घकाळामध्ये ही स्थिती येतेच की नफ्याचा दर कमी होईल. यांत्रिकीकरण बहुतांश क्षेत्रांमध्ये सतत होत असते आणि जेव्हा सर्वच क्षेत्रांमध्ये नफ्याचा दर घसरू लागतो (जे होणे अपरिहार्य आहे!) तेव्हा मंदी येणे अटळ बनते. या सर्व प्रक्रियेमध्ये उत्पादन वाढत जाते, सापेक्ष अतिउत्पादन होऊ शकते आणि नफ्याचा दर कमी होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे **नफ्याचा दर कमी होण्याचे संकट अनेकदा अतिउत्पादनाच्या रुपात जरी समोर येत असले तरी मालकांनी धंदा कमी करण्याचे मूळ कारण मात्र नफ्याचा दर कमी होणे हेच आहे.**

## मंदीची चुकीची विश्लेषणं

आज अनेक उदारमतवादी, सामाजिक-जनवादी अर्थतज्ज्ञ ओरडा करत आहेत की अतिउत्पादनामुळे किंवा मागणी नसल्यामुळे मंदी आली आहे. त्यांचे म्हणणे आहे की जितका माल निर्माण झाला आहे तेवढा विकला जात नाही आणि त्यामुळे धंद्याचे नुकसान होत आहे आणि मालकांना कंपन्या बंद कराव्या लागत आहेत. वर वर दिसायला त्यांचे म्हणणे खरे वाटते. परंतु हे आर्थिक संकटाचे फक्त एक लक्षण आहे, मूळ कारण नाही. भांडवली उत्पादन व्यवस्थेतील 'अति'उत्पादन नेहमीच सापेक्ष अतिउत्पादन असते; कारण उत्पादन त्यांच्यासाठी केले जाते जे विकत घेऊ शकतात, त्यांच्यासाठी नाही ज्यांची गरज आहे. उदाहरणार्थ चांगल्या बुटांची गरज तर सर्वच जनतेला आहे, पण उत्पादन त्यांच्यासाठीच केले जाते जे घेऊ शकतात, आणि त्यामुळेच बूट दुकानात पडून आहेत पण गरज असूनही जनता घेऊ शकत नाही कारण ती गरिब आहे.

मागणीचा अर्थ आहे लोकांची विकत घेण्याची

पान 7 वर

# लुधियाना मधील वर्धमान निशंभू गारमेंट कारखान्यातील महिला कामगारांची भयानक अवस्था

✍ **कृष्णा**

भांडवलशाही रचनेमध्ये सर्व कामगारांची भयंकर अवस्था आहे. फोकल पॉइंट, फेज–८, लुधियाना येधील वर्धमान निशंभु गारमेंट कंपनी लिमिटेड या कारखान्यामध्ये पण कामगारांची परिस्थिती वाईटाहून वाईट आहे. ही कंपनी भारतामध्ये लुई फिलीप, सिसिले, बेनेल्तन इत्यादी सारख्या आंतरराष्ट्रीय ब्रँडचे कपडे तयार करते. इथे शर्टची शिलाई, इस्तरी आणि पॅकींगचे काम केले जाते . इथे काम करणाऱ्या महिला कामगाराची संख्या जवळपास ८०० आहे . या कामगार महिलांचे वय ३० वर्षांपेक्षा कमी आहे तर काहींचे वय ३० वर्षांपर्यंत असू शकते. यापैकी बहुतेक महिला दुसऱ्या शहर व राज्यांमधील आहेत आणि काही स्थानिक सुद्धा आहेत. ज्या दुसऱ्या शहर आणि राज्यांमधून आहेत, त्या तिथेच हॉस्टेल मध्ये राहतात. त्यांना सकाळी ४ वाजता उठविले जाते आणि उठून आवरून सावरून त्या काही न खाता पिता सकाळी ७ वाजता काम करू लागतात. त्यांना सकाळी ८ वाजता चहा आणि ११ वाजता जेवण दिले जाते. ज्या महिला स्थानिक आहेत त्या पण बहुतेक उपाशीच असतात. त्या दुपारीच जेवण करतात आणि त्या नंतर पूर्ण दिवस भर काम करत असतात. त्यांना रात्रीचे जेवण ८ वाजता मिळते. त्यानंतर रात्री ११ किवा १२ वाजेपर्यंत काम करून घेतले जाते.

या कारखान्यांमध्ये कामगार कायद्या नुसार त्यांचे अधिकार त्यांना दिले जात नाहीत. या कारखान्यातील ज्या महिला कामगारांशी बोलणे झाले त्यांनी सांगितले कि एकतर त्यांना पगार कमी दिला जातो आणि ईपीएफ, ईएसआई, बोनस, सुट्टी आणि ग्रेज्युईटी इत्यादीचा लाभ पण सर्व महिला कामगारांना नाही मिळत. ओव्हरटाईम करून कसा तरी त्या आपला घर खर्च चालवतात. तिने सांगितले कि स्थानिक आणि दुसऱ्या शहर व राज्यांमधील शिलाई सेंटर मध्ये मोफत शिलाई शिकत असलेल्या मुली किंवा महिला यांची भर्ती या सारख्या कारखान्यांमध्ये होत असते. हे शिलाई सेंटर सरकारी आहेत की खाजगी हे तिला माहित नाही. ज्या महिला कामगारांनी हे सांगितले तिची भर्ती पण कॉलनी मधील शिलाई सेंटर मधील शिलाई-ट्रेनिंग दरम्यान झाली होती. कामाच्या दरम्यान जर एखाद्याची डोळ्याची दृष्टी कमी झाली किंवा आजारी पडले तर त्यांना कामावरून काढून टाकले जाते.

या महिला कामगारांकडे लुटमार आणि अन्यायाच्या विरोधात एकत्र येण्याशिवाय काही पर्याय नाहीये. आज लुधियाना असो किंवा इतर कोणतेही शहर, बघितले तर संपूर्ण भारतातच भांडवलदार ज्यांच्याकडे उत्पनाचे साधन आहे, ते पुरुष आणि महिला दोघांची पण श्रम शक्ती लुटत आहेत. आज कामगारांना हे समजून घ्यावे लागेल, मग तो पुरुष कामगार असो किंवा महिला कामगार, की त्यांची हि अवस्था बदलायला कोणी अवतार येणार नाही. त्यांना आपल्या हक्कांसाठी आपल्या संघटना बनवून, एकजूट होऊन, संघर्ष करावा लागेल.

**अनुवाद: अविनाश साठे**

## बोलणारे आकडे, किंचाळणारे सत्य

### फक्त एक टक्का श्रीमंतांनी देशाच्या अर्ध्या संपत्तीवर कब्जा केला आहे


कौन्सिल फॉर सोशल डेव्हलपमेंट ने तयार केलेल्या बातमीनुसार भारतात 2000 ते 2017 दरम्यान आर्थिक असमानता सहा पटीने वाढली आहे. आज देशातल्या 1% श्रीमंत धनदांडग्यांकडे देशातील संपूर्ण संपत्तीच्या 58.4 टक्के संपत्ती एकवटली आहे. या बातमीला ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केले आणि हे प्रसिद्ध केले माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांनी, ज्यांच्या सरकारने सुद्धा असमानता वाढण्यात कोणतीही कसर सोडली नाही.

ही बातमी सांगते देशातील 10 टक्के श्रीमंत देशातील संपूर्ण संपत्तीच्या 80.07 टक्के संपत्तीचे मालक आहेत. देशाच्या उत्पन्नामध्ये वरच्या 1 टक्के श्रीमंतांचा वाटा हा 22 टक्के झाला आहे, जो 1981-82 ला 6 टक्के होता. यावरून हे स्पष्ट होते की मागील 3 दशका दरम्यान लागू केलेल्या उदारीकरण खाजगीकरण सारख्या धोरणांमुळे वरच्या मूठ भर लोकांना आणखी श्रीमंत बनवायचे काम केले आहे आणि ही श्रीमंतीची वाढ गरीब आणि कष्टकरी वर्गाच्या कष्टाच्या लुटीतूनच झाली आहे.

### फक्त शंभर श्रीमंतांनी दाबून ठेवले आहेत बँकांचे 4.5 लाख कोटी रुपये

भारताच्या रिझर्व बँकेने (आर.बी.आय.) सांगितले आहे की 31 डिसेंबर 2018 पर्यंत बँकांमधील 100 मोठ्या कर्जदारांकडे बँकांचे 4 लाख 46 हजार 158 कोटी रुपये अडकून पडले आहेत . म्हणजे शंभर मोठ्या कर्जदारांनी बँकांचे जवळपास 4.5 लाख रुपये दाबून ठेवलेत. हा भारतातील एकूण अकार्यक्षम (एन.पी.ए.) कर्जाच्या पन्नास टक्के पेक्षा जास्त हिस्सा आहे. बँका आणि कर्ज देणाऱ्या संस्था यांची अडकलेली ही रक्कम भारताच्या अर्थव्यवस्थेवर ओझं बनत चालली आहे . बातम्या देणारी वेबसाईट 'द वायर' ने माहिती अधिकाराखाली मिळालेल्या माहितीनुसार ही बातमी प्रकाशित केली आहे.

रिझर्व बँकेने आरटीआय द्वारे दिलेल्या या बातमीमध्ये हे सांगण्यास नकार दिला आहे की हे 100 सर्वात मोठे चोर कोण आहेत. 'द वायर' च्या या बातमीनुसार 5 फेब्रुवारी 2019 ला अर्थमंत्र्यांनी संसदेमध्ये सांगितले की 31 डिसेंबर 2018 पर्यंत व्यावसायिक बँकांचा एकत्रित एनपीए 10.09 लाख कोटी इतका होता. यात सरकारी बँकांचा एनपीए 8. 64 लाख कोटी होता. ही रक्कम किती मोठी आहे याचा अंदाज यावरून लावता येईल की आत्ताच जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा एकूण आकार 27.86 लाख कोटी आहे. म्हणजे या बँक चोर भांडवलदारांनी एकूण बजेटच्या आर्थिक रकमेच्या 36 टक्के एवढे रुपये दाबून ठेवले आहे.




26 एप्रिल रोजी सुप्रीम कोर्टाने आर.बी.आय.ने जाहीर न केलेल्या कर्जदारांच्या यादीसंदर्भात सुनावणी दरम्यान म्हटले की तिच्याकडे ही शेवटची संधी आहे. त्यांनी आपली प्रक्रिया पारदर्शक ठेवली पाहिजे आणि ही माहिती जनता ला पण दिली पाहिजे पण त्यानंतर सुद्धा आर.बी. आय. ने ती माहिती देण्यास नकार दिला.

रिझर्व बँक चोरांना का वाचवते याचा अंदाज लावणे कठीण नाही. मालकाच्या (म्हणजे मोदीसरकार ) मालकांची खोड काढून कोण सरकारी नोकर गळा फासात अडकवेल?

### तुमच्याकडून शिक्षणाच्या नावावर वसूल केलेल्या करापैकी 1 लाख 16 हजार 897 कोटी रुपये गायब

जनतेकडून सगळ्या करांच्या वर, शिक्षणाच्या सुधारणेच्या नावावर, दोन टक्के उपकर सरकार वसूल करते. पण तुम्हाला हे जाणून कसे वाटेल की शिक्षणाच्या प्रगतीसाठी जे पैसे आपल्या खिशातून घेतले त्याचा मोठा हिस्सा शिक्षणावर खर्च तर झालाच नाही, उलट त्याचा हिशोब ही मिळत नाहिये? 2009-10 ते 2019-20 दरम्यान दहा वर्षात शिक्षण उपकराच्या स्वरूपात सरकारने 3.38 लाख कोटी रुपये जनतेकडून वसूल केले आहेत. पण त्यापैकी प्राथमिक शिक्षण कोषामध्ये आत्तापर्यंत 2.21 लाख कोटीच जमा केले गेले आहेत; बाकी 1,16,897.81 कोटी रुपये हे कुठे गेले?

सरकार अगोदरच ढिगभर कर जनतेकडून वसूल करते, त्यातून शिक्षणावर तितकाही पैसा खर्च होत नाही जितका पैसा मंत्री आणि आणि अधिकाऱ्यांच्या ऐयाशीवर उडवला जातो. मग शिक्षणाच्या प्रगतीच्या नावावर उपकर लावत सरकार अजून कर लावू लागली . आता कळते त्यामधील एवढी मोठी रक्कम गायब आहे. दुसरीकडे देशाच्या हजारो प्राथमिक शाळांमध्ये शौचालय आणि पिण्याचे पाणी सुद्धा नाहिये.

हा खेळ 2009-10 मध्ये सुरू झाला ज्यामध्ये काँग्रेस आणि भाजप दोन्ही सरकारं भागीदार आहेत.

# मंदीचे संकट पुन्हा एकदा कामगार वर्गाच्या जीवावर!

**पान 6 वरून**

क्षमता. लोकांमध्ये कामगार वर्ग आणि मालक वर्ग दोघेही येतात. कामगारांना कमी मजुरी देऊनच मालकांचा नफा येतो त्यामुळे कामगार वर्गाची खरेदी क्षमता कमी असते. परंतु मालक वर्गाला माल विकण्याशी नाही तर नफ्याशी मतलब असतो. कमी लोकांना जास्त माल विकून किंवा कमी माल जास्त दराने विकूनही जर नफ्याचा दर चढा असेल तर मालकांना फरक पडत नाही. 10 वस्तू कमी दराने विकण्यापेक्षा 9 वस्तू जास्त दराने विकल्या जात असतील आणि नफा वाढत असेल, तरीही चालू शकते. परंतु जेव्हा मंदीचे विश्लेषण अतिउत्पादनाशी जोडले जाते, तेव्हा मालकांच्या नफ्याच्या हावेपेक्षा बाजाराच्या व्यवस्थेत माल खपणे जास्त प्राधान्याचे मानले जाते. अशामध्ये प्रश्नाचे मूळ कारण म्हणजे वाढत्या नफ्याची हाव बाजूला राहते. अशा विश्लेषणामुळे मूळ प्रश्न भांडवलशाही आणि बाजाराची व्यवस्था नसून बाजारात मागणीचा अभाव आहे असे वाटू लागते. त्यामुळे भांडवलशाही व्यवस्थेला आव्हान देणारा खरा उपाय म्हणजे कामगार वर्गाचे राज्य मागे पडून माल जास्त कसा खपेल याच्याच योजना आखल्या जाऊ लागतात - जसे, सरकारने थोडा अजून खर्च करावा आणि जनतेची क्रयशक्ती वाढवावी, इत्यादी. अर्थातच या योजना तकलादू असतात आणि थोड्याच काळात मूळ प्रश्न, म्हणजे नफ्याचा घसरता दर समोर येतोच.

आज गरज आहे की या अल्पउपभोगवादी, मंदीच्या काळात मागणी वाढवा अशी आर्जवं करणारी विश्लेषणं सोडून नफेखोर व्यवस्थेला आह्वान देणारे, कामगार वर्गीय क्रांतिकारी विश्लेषण स्विकारावे आणि भांडवलशाही विरोधात, बाजाराच्या व्यवस्थेच्या विरोधात लढा उभारावा.

**‘कामगार बिगुल’ ची वेबसाइट**
**www.marathi.mazdoorbigul.net**
**फेसबुक पेज**
**www.facebook.com/kamgarbigul**

# अहमदनगर मध्ये फी वाढी विरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन

✍ **बिगुल पत्रकार**

कॉलेज सुरू होत नाही तेच, अहमदनगर येथील जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथील मास कम्युनिकेशन व बायोटेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांना फी वाढीचा चांगलाच मोठा फटका बसल्याचे दिसून आले. या फी वाढी विरोधात दिशा विद्यार्थी संघटनेच्या साथीने आंदोलन छेडले आहे.

मास कम्युनिकेशन विभागाची पूर्वीची प्रथम वर्षाची खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची फी 31225 रुपये होती, तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी (एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., एन. टी.) 5175 रुपये होती, द्वितीय वर्षाची खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची फी 27225 रुपये होती, तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी 625 रुपये होती. फी वाढीनंतर प्रथम वर्षाची खुल्या प्रवर्गाची फी 31425 रुपये, मागासवर्गीय प्रवर्गाची फी 5175 रुपयां वरून 19085 रुपये झाली आणि द्वितीय वर्षाची खुल्या प्रवर्गाची फी 27475 रुपये, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी 625 रुपयां वरून 14035 रुपये झाली. बायोटेक्नॉलॉजी विभागाची एम.एस्सी प्रथम वर्षाची फी 5135 रुपयां वरून 27800 झाली आणि एम.एस्सी द्वितीय वर्षाची फी 680 रुपयां वरून 22,735 रुपये झाली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे फी मध्ये वाढ झाल्याची बातमी ही विद्यार्थ्यांना एंट्रन्स झाल्यानंतर माहीत झाली. एवढी फी भरण्यासाठी पैसेच नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांसमोर प्रवेश घ्यावा की नाही, कर्ज काढून पैसे गोळा करावे लागणार असे अनेक प्रश्न उभे राहिले.

मास कम्युनिकेशन आणि बायोटेक्नॉलॉजी या दोन्ही विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत या अन्यायाविरुद्ध एकजूट होऊन आवाज उठवायचे ठरवले. बायोटेक्नॉलॉजी च्या विद्यार्थ्यांनी फी का वाढली याची चौकशी करण्यासाठी कॉलेज कडे फी स्ट्रक्चर मागितले परंतु प्राचार्यांनी फी स्ट्रक्चर देण्यासाठी नकार दिला. यानंतर मास कम्युनिकेशन च्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला व त्यांनी विद्यार्थ्यांना एकत्र करायला सुरुवात केली. या आंदोलनाला साथ देत दिशा विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत मिळून दोन्ही विषयांच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना एकत्र केले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी मिळून विद्यार्थ्यांच्या वतीने महाविद्यालय, पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र, आणि शासनाचा समाज कल्याण विभाग या तिन्हींना फी वाढीबाबत 21 जुलै रोजी निवेदन दिले. विद्यार्थ्यांनी निवेदनामध्ये फी पूर्ववत करा नाहीतर विद्यार्थी 29 जुलैला पुणे उपकेंद्राला टाळे ठोकतील असा इशारा दिला. निवेदन द्यायला गेल्यानंतर *महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले की यामध्ये महाविद्यालयाचा काही संबंध नाही आणि चूक समाज कल्याण व विद्यापीठ यांची आहे; पुणे विद्यापीठाच्या उपकेंद्रावर निवेदन द्यायला गेल्यानंतर तेथील संचालकांनी सांगितले की कॉलेज कडून जेवढी माहिती मिळाली त्यानुसार फी चे मॅपिंग झाले त्यामुळे यामध्ये विद्यापीठाचा काही संबंध नाही, हा सर्व समाज कल्याण व महाविद्यालयाचा घोटाळा आहे; त्यानंतर विद्यार्थ्यांनी समाज कल्याण विभागाला निवेदन दिले समाज कल्याण विभागाचे आयुक्तांनी सांगितले की आम्हाला मॅपिंग नुसार जेवढे पैसे येतात तेव्हा आम्ही कॉलेजला वर्ग करत असतो त्यामुळे समाज कल्याणचा यामध्ये काही संबंध नाही. अशा प्रकारे महाविद्यालय, पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र आणि समाज कल्याण विभाग हे तिघेही एकमेकांवर ढकलाढकली करण्याचे काम करत होते.

यानंतर दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांनी मिळून एक बैठक घेतली, एक समन्वयक कमिटी तयार केली ज्यामध्ये बायोटेक्नॉलॉजी, मास कम्युनिकेशन व दिशा विद्यार्थी संघटनेचे प्रत्येकी कार्यकर्ते सहभागी होते. बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला की आपल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून आपल्या कॉलेजमधील इतर शाखातील विद्यार्थ्यांनाही आंदोलनामध्ये सहभागी करून घ्यावे व त्यानंतर दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन घडलेला प्रकार सांगितला व आंदोलनामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

दोन दिवसांनंतर विद्यापीठ केंद्राद्वारे उडवाउडवीची उत्तरे दिली गेली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान चालूच होते. 27 जुलैला दिशा विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी महाविद्यालय, पुणे विद्यापीठ उपकेंद्र व समाज कल्याण विभाग यांना यांच्याकडे या प्रश्नावर लेखी उत्तराची मागणी केली व लेखी दिले नाही तर विद्यार्थी तीव्र स्वरूपात आंदोलन करतील असा इशारा देण्यात आला.विद्यार्थ्यांनी ठरवले की लेखी उत्तर मिळेपर्यंत आंदोलन चालू ठेवायचे. विद्यापीठ उपकेंद्राने दिशा विद्यार्थी संघटनेसोबत बोलणी केली, परंतु लेखी उत्तर काही दिले नाही. परिणामी विद्यार्थ्यांनी अगोदर ठरवल्याप्रमाणे 29 जुलै रोजीचे आंदोलन करण्याचे नक्की ठरवले.

सोमवार दिनांक 29 जुलै ठीक सकाळी दहा वाजता ठरलेल्या वेळेत सर्व मास कम्युनिकेशनचे व बायोटेक्नॉलॉजीचे विद्यार्थी व दिशा विद्यार्थी संघटनेचे कार्यकर्ते, विद्यार्थी ठरलेल्या रूट प्रमाणे




कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळ जमले. तिथून रॅलीला सुरुवात करून कॉलेज लायब्ररी,प्रिन्सिपल ऑफिस, रेसिडेन्शिअल हायस्कूल आणि मग उपकेंद्रावर असा मार्ग आखलेला होता. प्रवेशद्वारावर सर्वजण जमल्यानंतर घोषणा देण्यात आल्या. *"शिक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या मालकीचं" "फी वाढ रद्द करा" "आवाज दो, हम एक है!"* अशा प्रकारे घोषणा देण्यात आल्या. नंतर विद्यार्थ्यांना आवाहन करणारे *"आरे नौजवान"* हे क्रांतिकारक गाणे दिशा विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गायले. यानंतर घोषणा देत रॅली कॉलेज लायब्ररी जवळ आली, तेथेही घोषणा व गाणे झाले. त्यानंतर रॅली घोषणा देत प्रिन्सिपल ऑफिस समोरून उपकेंद्रा जवळ गेली. प्रवेशद्वारा पासून ते उपकेंद्राजवळ जाईपर्यंत अनेक विभागांमधील विद्यार्थी रॅलीमध्ये सामील होत गेले. उपकेंद्रा जवळ खूप मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

पुणे उपकेंद्रा जवळ घोषणा व पुन्हा क्रांतिकारक् गीत प्रस्तुत झाले. त्यानंतर आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या इतर विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त केला व पाठिंबा दिला. यानंतर दिशा विद्यार्थी संघटनेच्या वतीने साथी अतुल यांनी मांडणी केली की जोपर्यंत प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आंदोलन चालू राहिल. समन्वयक समिती मधील समाधान, क्रांती, भरत, अविनाश, अपेक्षा यांनीही निषेध व्यक्त केला व जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत माघार घेणार नाही असे सर्व जण एक मतावर ठाम राहिले. हे निषेध आंदोलन सुरू असतानाच महाविद्यालयाचे प्राचार्य बी. एच. झावरे, पुणे विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक श्री. सोमवंशी, तसेच विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा.सागडे हे आंदोलनांमध्ये आले व विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना आश्वासन दिले की पूर्वी जेवढी फी होती तेवढ्याच फी मध्ये तुम्हाला प्रवेश देऊ. श्री सोमवंशींनी सांगितले की आम्ही विद्यापीठात तुमचा प्रस्ताव मांडू, परंतु विद्यार्थ्यांना त्यांच्या तोंडी बोलण्यावर विश्वास नव्हता. आज जर पूर्वीच्या फी मध्ये प्रवेश दिला व नंतर परीक्षेच्या ऐन वेळेस फी मागितली तर काय करणार हे सर्व प्रश्न विद्यार्थ्यांनी मांडले. विद्यार्थ्यांनी लेखी आश्वासनाची मागणी केली. त्यावेळेस श्री.सोमवंशी यांचे म्हणणे आले की हा आमचा अधिकार नाही. कोणीही लेखी आश्वासन न दिल्यामुळे विद्यार्थी संतप्त झाले व लेखी देई पर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा पवित्रा घेतला. पाऊस चालू असताना देखील विद्यार्थी जागचे हलले नाहीत. काही वेळातच उपकेंद्र संचालक सोमवंशी यांनी समन्वय कमिटी मधील विद्यार्थ्यांना आत मध्ये चर्चेसाठी बोलावून घेतले, चर्चा केली की आपण पुण्याला विद्यापीठात जाऊन कुलगुरूं सोबत या विषयावर बैठक घेऊ आणि नंतर समितीने सर्व विद्यार्थ्यांपुढे हा प्रस्ताव मांडला. त्यावेळेस विद्यार्थी आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यासाठी तयार झाले. सदर यानंतर ठरवण्यात आले की समितीतील दोन मुलं व दोन मुली पुण्याला कुलगुरूं सोबत होणाऱ्या बैठकीसाठी जातील. विद्यार्थ्यांनी त्यांना इशारा दिला की आम्ही आमचे आंदोलन दोन दिवसांसाठी स्थगित करीत आहोत व आमच्या फीचा मुद्दा पूर्णपणे सुटला नाही तर आम्ही पुन्हा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू.

आंदोलन स्थगित झाल्यानंतर सिनेट सदस्य प्रा. सागडे यांनी दिशा विद्यार्थी संघटने सोबत संवाद साधला की पुणे विद्यापीठामध्ये जाण्याची तसदी न घेता, कॉलेजस्तरावरच प्रयत्न करून हा प्रश्न सोडवू. त्यानुसार 30 जुलै रोजी प्राचार्य बी. एच. झावरे यांच्यासोबत बैठकीत त्यांनी सांगितले की आम्ही पूर्ण दिवसभर मॅपिंग चेक केलं आणि विद्यापीठा सोबतही संपर्क केला आहे व त्यामध्ये दुरुस्ती करून घेणार आहोत, त्यासाठी दोन दिवस वेळ लागेल व तोपर्यंत विद्यार्थ्यांनी पूर्वीच्या फी मध्येच प्रवेश घ्यावा आणि ज्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी जास्त फी भरून प्रवेश घेतला होता त्यांची फी मागे दिली जाईल. यावर विद्यार्थ्यांनी लेखी आश्वासनाची मागणी केली.प्राचार्यांनी लेखी नोटीस काढून सदर आश्वासन विद्यार्थ्यांना दिले आहे.

विद्यापीठ, कॉलेज आणि समाज कल्याण विभागाच्या अशा अनुभवानंतर विद्यार्थी अजूनही मॅपिंग झाले का नाही याचा सातत्याने पाठपुरावा करत आहेत आणि विद्यार्थ्यांनी अजून प्रवेशही घेतलेला नाही. जर लवकर मॅपिंग झालं नाही तर पुन्हा आंदोलन करू असा इशारा दिला आहे आणि आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या एकजुटीने सध्यातरी शिक्षण व्यवस्थेला माघार घ्यायला भाग पाडले आहे. येत्या काळामध्ये विद्यार्थ्यांची एकता, आणि सतर्कता या आंदोलनाची पुढची दिशा ठरवेल.

# देशभक्तीच्या बॉम्बवर्षक विमानापासून ते आयुष्याच्या कठोर वास्तवापर्यंत : एका युवकासोबत संवाद

काही महिन्यांपूर्वी चंद्रशेखर आझादांच्या शहीद दिनानिमित्त (27 फेब्रुवारी) लखनऊ मध्ये चौक सभांमध्ये नौजवान भारत सभेच्या जत्थ्यासोबत झालेला एका तरुणाचा संवाद.

**तरुण :** चंद्रशेखर आझाद जर आज असते तर पाकिस्तान्यांना झोडून काढलं असतं, जसे मोदीजी आज करत आहेत.

**नौ.भा.स. चे साथीदार** : चंद्रशेखर आझाद सारखे क्रांतिकारी जर आज असते तर या देशाचे चित्र आणि भाग्य काही वेगळंच असतं.

**तरुण :** पण काहीही असो, मोदी ने दुनियेला दाखवून दिलं. लीडर असावा तर असा. आता आर-पार होऊन जायला पाहिजे.

काही वेळ ही चर्चा चालत राहिली की शासक वर्गाच्या आपापसातल्या लढाईमध्ये दोन्ही बाजूंच्या सामान्य जनतेवरच मृत्यू आणि आपत्तीचे संकट ओढवते, सत्ता आणि भांडवलाच्या मालकांच्या तिजोऱ्या तर युद्धाने सुद्धा भरल्याच जातात. पण भाऊ ऐकायला तयारच नव्हता.

तेव्हा एका साथीदाराने विचारलं : तसं आपण काय करता?

**तरुण :** ...मॉलमध्ये हाऊसकिपींगच्या कामाला आहे.

**नौभास :** पैसे किती मिळतात?

**तरुण :** महिन्याला 8000 मिळतात.

**नौभास ::** फक्त 8000? तुम्हाला माहित आहे का, हे तर यु.पी. च्या किमान मजुरीपेक्षाही कमी आहे?

**तरुण :** हे तर माहित नाही, पण साला ठेकेदार यातून सुद्धा कापून घेतो. वेळेवर देत सुद्धा नाही. काही ना काही ठेवूनच घेतो.

**नौभास :** मग तुम्ही त्याच्याविरुद्ध लढत नाही?

**तरुण :** अरे काय घंटा लढणार? महिन्याच्या चार सुट्ट्यासोडून एक दिवससुद्धा हो-नाही केलं तर नोकरीवरून काढायची धमकी देतो.

**नौभास :** किती तास काम करता?

**तरुण :** डेली १०-११ तास. पूर्ण वेळ सुपरवायझर डोक्यावर बसून असतो.

**नौभास :** अरे मग अशी नोकरी सोडून का नाही देत? पैसे सुद्धा एवढे कमी आहेत.

**तरुण :** भाऊ, डिग्र्या मिळालेले चांगले चुंगले लोक तर भटकत आहेत. जी नोकरी मिळाली तिला पकडून बसा, यातच भलं आहे.

**नौभास :** पण मोदीजी तर म्हणत होते कि कोट्यवधी नोकऱ्या देणार?

**तरुण :** अरे सगळं बोलाची कढी आणि बोलाचा भात असतं.

**नौभास :** आपल्याला वाटत नाही का कि युद्ध-युद्ध या गोंगाटात रोजगार, महागाई, भ्रष्टाचार, गरिबी वगैरे या गोष्टी हवेत गायब झाल्या? पाच वर्ष काहीच नाही केलं म्हणून आता फिरून- फिरून नकली देशभक्तीच्या नावावर लाज विकून वोट मागत आहेत?

**तरुण :** हे बघा, मला जास्त पॉलिटिक्स माहित नाही. जे टिव्हीवर पाहिलं तेच तुम्हाला बोललो.

**नौभास :** चंद्रशेखर आजाद, भगतसिंह सारख्या क्रांतिकारकांनी यासाठीच आपले प्राण दिले ज्यामुळे देशातल्या प्रत्येक मुलाला शिक्षण मिळेल, प्रत्येक तरुणाला हक्काचं काम मिळेल, समाजामध्ये सर्वांना बरोबरी आणि आदरानं जगण्याचा हक्क मिळेल. पण आपण त्यांना आठवत नाही तर मोदीसारख्यांच्या नादाला लागतो जे गरिबांबद्दल बोलतात आणि फक्त अंबानी-अडाणी सारख्यांच्या तिजोऱ्या भरण्यात लागले आहेत.

थोडं अजून बोलणं होत-होत तो तरुण देशभक्तीच्या बॉम्बवर्षक विमानावरून आपल्या आयुष्याच्या वास्तवातील कठीण जमिनीवर उतरला होता. अभियानाचा जत्था तिथून निघता-निघता तो हळवा झाला आणि त्याच्या डोळ्यांमध्ये अश्रू आले. नोकरी जाण्याची भीती नसती तर मीसुद्धा सुट्टी घेऊन आपल्या सोबत आलो असतो, असे म्हणून त्याने निरोप घेतला.

# मोदी सरकारचा जनतेच्या नागरी अधिकारांवरील हल्ला अजून तीव्र

✍ *अभिजित*

भारतातील भांडवली लोकशाहीने काही नागरी अधिकार कागदावर तरी जनतेला दिले होते. बिना खटला तुरुंगात न ठेवण्याचा अधिकार, स्वत:विरुद्ध साक्ष द्यावी न लागण्याचा अधिकार, न्यायालयासमोर तत्काळ दाद मागण्याचा अधिकार, गुन्हा साबीत होईपर्यंत निर्दोष मानणे, इत्यादी अधिकार आहेत असे अनेकदा बोलले जाते. वास्तवात या सर्व अधिकारांना मनात येईल तेव्हा खुंटीवर टांगणारे कायदे सतत सरकारे बनवत आली आहेत आणि न्यायालयांनी सुद्धा अशा कायद्यांना मान्यता दिली आहे. नुकतेच मोदी सरकारने यु.ए.पी.ए. कायदा आणि एन.आय.ए. कायद्यात केलेले बदल यात श्रेणीतले पुढचे पाऊल म्हणता येईल.

भारतात असे काळे कायदे सतत बनत आलेत. यामध्ये 1950 चा प्रिव्हेंटीव्ह डिटेंशन ऍक्ट, 1958 चा आर्म्ड फोर्सेस (स्पेशल पावर्स) ऍक्ट (आफ़्स्पा), 1967 चा अनलॉफुल ऍक्टीव्हीटीज प्रिव्हेंशन ऍक्ट(यु.ए.पी.ए.), 1971 चा मेंटेनंस ऑफ इंटरनल सिक्युरिटी ऍक्ट (अंतर्गत सुरक्षा कायदा, मीसा), 1980 चा नॅशनल सिक्युरीटीज ऍक्ट (राष्ट्रीय सुरक्षा कायदा, रासुका), 1985 चा टेररिस्ट ऍंड डिसरप्टीव्ह ऍक्टीव्हिटीज ऍक्ट (टाडा), 2001 चा प्रिव्हेंशन ऑफ टेररिझम ऍक्ट (दहशतवाद प्रतिबंधक कायदा, पोटा), इत्यादी कायदे सामील आहेत. राज्य सरकारांच्या स्तरावर सुद्धा असे कायदे बनत आले आहेत. इंदिरा गांधींच्या आणीबाणीच्या काळात राज्यघटनेतील तरतुदींचा आणि अशा कायद्यांचा वापर करुनच सर्व विरोधी पक्षांना, राजकीय कार्यकर्त्यांना, नागरिकांना मनमर्जीपणे तुरुंगात टाकण्याचे काम झाले होते. खरे तर स्वातंत्र्याचा 70 वर्षांचा काळ अशा कायद्यांनी आणि तरतुदींनी भरलेला आहे. नेहरु सत्तेत असताना राज्यघटनेत केलेला पहिला बदल अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधन आणणारा होता.

असे कायदे बनवण्याचे कारण नेहमीच हे सांगितले जाते की कायदा सुव्यवस्था आणि शांतता टिकवण्यासाठी अशा 'कडक' कायद्यांची गरज आहे. वास्तव हे आहे की शासक वर्गाला असे कायदे आपल्याविरोधात उठणारा सर्व शोषित जनतेचा आवाज दाबून टाकण्यासाठी असे कायदे हवे असतात. राजकीय विरोधकांविरोधात, सामान्य नागरिकांविरोधात, खरे गुन्हेगार सापडत नसल्यास कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी निर्दोषांना अडकवण्यासाठी अशा कायद्यांच्या गैरवापराचा इतिहास मोठा आहे. 'टाडा' सारखा कायदा रद्द यामुळे करावा लागला होता की दहशतवादाच्या नावाखाली अटक केलेल्या आरोपींपैकी फक्त 2 टक्के आरोपींना शिक्षा झाल्या आणि 98 टक्के आरोपी निर्दोष सुटले. हे विसरायला नको की देशामध्ये सरकार वर टीका करणाऱ्या कार्टूनिस्ट पासून ते तामिळनाडू मधील अणुऊर्जा प्रकल्पा विरोधात लढणाऱ्या हजारो मच्छीमारांवर सुद्धा राजद्रोहाचा (सीडीशन) खटला भरण्यात आला होता, आणि अशा खटल्यांची मोजदाद असंख्य आहे.

काँग्रेस सरकारांनी असे कायदे बनवण्यात कसर सोडली नाही. आता तर फॅसिस्ट मोदी-शाह सरकारने मोठी उडी घेतली आहे. 2004 साली वाजपेयी सरकारने दहशतवाद विरोधातील 'पोटा' कायदा रद्द करण्याचे भासवून खरेतर त्यातील अनेक जनविरोधी तरतुदी यु.ए.पी.ए. कायद्यामध्ये वळवल्या आणि अवैध कृत्यांच्या यादीमध्ये 'दहशतवादी कृत्य' आणि 'दहशतवादी संघटना' सुद्धा जोडले. यानंतर 2008 आणि 2012 मध्ये यु.ए.पी.ए. मध्ये काँग्रेस सरकारने अजून 'सुधारणा' केल्या आणि पोलिसांच्या ताब्यातील अवधी, आरोपपत्र दाखल न करता अटक करण्याचा अधिकार, आणि जामीन न देण्याची तरतूद अशा अनेक जुलमी तरतुदी यात सामील केल्या. मोदी सरकारने 'एन.आय.ए.' कायद्यामध्ये सुद्धा बदल केले आहेत, त्यानुसार राष्ट्रीय तपास संस्था आता कोणत्याही राज्यामध्ये, तेथील राज्य सरकारच्या परवानगी शिवाय जाऊन धाड टाकणे, जप्तीसारख्या कारवाया करू शकेल. यातून देशाच्या संघराज्यात्मक रचनेवरच हल्ला करण्यात आला आहे आणि फॅसिस्ट विचारधारेचे सत्तेच्या केंद्रीकरणाचे जे एक तत्व ते पुढे नेल्याचे दिसून येते. यामध्ये आज इतर सर्व पक्ष गप्प आहेत, कारण त्याचे मालक असलेल्या भांडवलदारांच्या हितासाठीच हे होत आहे.

मोदी सरकारने अनेक पावले पुढे जात आता यु.ए.पी.ए. कायद्यामध्ये तरतुदी केल्या आहेत की एखाद्या संघटनेलाच नाही तर एखाद्या व्यक्तीलाही दहशतवादी घोषित केले जाऊ शकते. खरंतर अगोदरच्या यु.ए.पी.ए. कायद्याच्या कलम 4 मध्येच तरतुदी होत्या की दहशतवादी कृत्यामध्ये सामील असलेल्या व्यक्तींविरोधात खटले चालवता यावेत. जर सरकार पुरावे देऊ शकली की एखाद्या व्यक्तीने दहशतवादी कृत्यांमध्ये सहभाग घेतला आहे, तर कोर्ट अशा व्यक्तीला यु.ए.पी.ए. अंतर्गतच शिक्षाही सुनावू शकत होती. तरीही सरकारने व्यक्तीला दहशतवादी घोषित करण्याचे नवीन कलम यामध्ये जोडले आहे. एखाद्या व्यक्तीला दहशतवादी घोषित करण्यासाठी अगोदर त्या व्यक्तीला दहशतवादी कृत्याबद्दल एखाद्या कोर्टाने शिक्षा सुनावली असण्याची काहीच गरज नाही, उलट सरकार फक्त एका आदेशाने कोणत्याही व्यक्तीला दहशतवादी घोषित करू शकते! गुन्हा, खटला आणि न्यायालयीन निकालाचा मार्ग तर सोडाच, त्या व्यक्तीला सरकार समोर सुद्धा अगोदर काही म्हणणे मांडण्याची गरज किंवा संधी हा कायदा मांडत नाही. या कायद्यामध्ये एखाद्या व्यक्तीला दहशतवादी का आणि कसे ठरवले जाईल हा मुद्दाच गायब आहे.

गृह मंत्री अमित शाह यांनी दुरुस्ती विधेयक प्रस्तुत करताना लोकसभेत मांडले की "दहशतवादी साहित्याला आणि तत्वज्ञानाला जे युवकांच्या मनात उतरवण्याचा प्रयत्न करतात, मान्यवर, माझे त्यांच्याबद्दल मत आहे की दहशतवादाला पसरवण्यामध्ये जो अपप्रचार होतो, जो उन्माद पसरवला जातो, ते दहशतवादाचे मूळ आहे. जर या सगळ्यांना दहशतवादी घोषित केले तर मला वाटत नाही की सदनाला काही आक्षेप असेल." ऐकून तर कोणालाही वाटेल की जे बोलले जाते आहे, त्यात चुकीचे काही नाही कारण दहशतवादी संघटना अशा प्रकारच्या साहित्याचा आधार तर नक्कीच घेतात. अमित शाह यांनी असाही तर्क दिला की एखाद्या दहशतवादी संघटनेवर बंदी आणली तरी ती चालवणारे व्यक्ती दुसऱ्या नावाने संघटन चालू करतात, त्यामुळे व्यक्तीलाच दहशतवादी घोषित करण्याची तरतूद गरजेची आहे. परंतु लक्षात घेण्याची बाब ही की या कायद्यात कुठेही व्याख्या केलेली नाहीये की "दहशतवादी साहित्य" किंवा "दहशतवादी तत्वज्ञान" म्हणजे नेमके काय!

याचा अर्थ हा की हे कलम आता यासाठी वापरले जाईल की सरकार अशा व्यक्तींना दहशतवादी घोषित करू शकेल, ज्यांच्याविरोधात पुरावे तर नाहीयेत, पण दहशतवादी घोषित करुन त्यांना बदनाम करण्याची सरकारची इच्छा आहे. आपल्याला माहित आहे की एखाद्या व्यक्तीवर दहशतवादी असल्याचा खोटा आरोप जरी केला गेला, तरी त्या व्यक्तीला किती मोठ्या प्रमाणात सामाजिक अपमान सहन करावा लागेल, कोणतेही काम मिळणे अशक्य होईल, रहायला घर मिळणार नाही आणि त्याच्या कुटुंबियांना सुद्धा त्रास सहन करावा लागेल, इतके की मुलांना शाळेत प्रवेश मिळणे आणि मिळालाच तर तिथे अपमान सहन करणे अशक्य होईल.


सरकारने स्वत:च्याच निर्णयाविरोधात 'अपिल' करण्याची जी तरतूद बनवली आहे, ते 'अपिल' करेपर्यंत आणि त्याचा निकाल येईपर्यंत सरकारचा आणि भांडवलदारांचा भाट मीडिया आपले काम करुन घेईल. इतिहासाकडे पाहिले तर लक्षात येईल की जे कोणी सरकारच्या धोरणांना, निर्णयांना विरोध करतात, घोटाळ्यांना बाहेर आणतात अशा लोकांना सुद्धा निशाणा बनवायचा अधिकार आता सरकारला असेल!

या सरकारच्या निशाण्यावर कोण असेल, याचा उल्लेख काही प्रमाणात अमित शाह यांनी बोलताना केला. त्यांनी म्हटले की "त्या लोकांना सोडणार नाही, जे शहरी माओवादांचे (अर्बन नक्सल) काम करतात.". आता हे समजून घेतले पाहिजे की हे "अर्बन नक्सल" कोण आहेत. गेल्या काही वर्षांपासून समाजात हा शब्द आर.एस.एस. आणि तिच्या अनेक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी पसरवण्याचे काम केले आहे. यापैकी कोणीही या शब्दाचा नेमका अर्थ काय, व्याख्या काय हे सांगण्याची, ठरवण्याची तसदी घेत नाही, आणि त्यांच्याकडून तशी अपेक्षा करणे पण चुकीचे आहे, कारण जबाबदारीने वागणे हा त्यांचा विचारच नाही. पण त्यांचा इरादा काय आहे हे समजून घ्यायचे असेल तर आर.एस.एस. शी जोडलेल्या "विश्व संवाद केंद्र" या संस्थेने एक पत्रक काढले आहे, ज्याचे नाव आहे, "कोण आहेत अर्बन नक्सल?", ते पाहिले पाहिजे. या पत्रकामध्ये संघाच्या एका कार्यकर्त्याने कोणतेही पुरावे न देता, नेपाळमध्ये भेटलेल्या एका व्यक्तीच्या हवाल्याने म्हटले आहे की देशातील अनेक लोक सत्ता उलथवून टाकण्याच्या प्रयत्नात आहेत. यामध्ये त्यांनी मेधा पाटकर, विनायक सेन, सोनी सोरी, अरुंधती रॉय यांची नावे घेतली आहेत. यामध्ये ते वर्वरा राव, सुधीर ढवळे, सुधा भारद्वाज, सुरेंद्र गडलींग, महेश राऊत या सध्या नक्षलवादी असल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या कार्यकर्त्यांसोबतच स्वामी अग्निवेशांचेही नाव घेतात असे म्हणत की ते अजून पकडले का नाही गेले. पुढे या पुस्तिकेत असेही म्हटले आहे की देशातील डाव्या विचारांकडे झुकलेले सर्व प्राध्यापक आणि पत्रकार हे नक्षल समर्थक आहेत. याशिवायही अनेक नावे यामध्ये आहेत. यामध्ये एक लेखक असेही लिहितात की ही चीनची योजना आहे आणि त्यांना भारताला एक वसाहत बनवायचे आहे. यामध्ये असाही दावा आहे की स्वामी अग्निवेश जे हिंदू धर्माचे समर्थक आहेत, आणि भगवे कपडे घालतात, ते खरंतर ख्रिश्चन आहेत !

कोणताही विचारी, थोडाही अभ्यास करणारा व्यक्ती, समाजात काय चालू आहे आणि विविध संघटना, व्यक्ती आणि त्यांच्या भुमिका आणि कार्य याबद्दल माहित असलेला व्यक्ती हे पुस्तक वाचून पोट धरून हसेल आणि नंतर यामध्ये केलेल्या अति गंभीर दाव्यांबद्दल चिंतित नक्कीच होईल. ज्यांची नावे आली आहेत, त्यांचे विचार, आणि त्याहीपेक्षा या सर्वांचे विविध प्रश्नांबद्दल असलेले एकमेकांशी मतभेद, देशातील समस्यांबाबत त्यांचे मतभेद, इतकेच नाही तर नक्षलवाद्यांवर टीका करणारी त्यांच्यापैकी काहींची मतं जगजाहीर आहेत. जर थोडं मागं गेलं तर जेव्हा आम आदमी पक्ष (जो भाजप, काँग्रेस प्रमाणे अजून एक भांडवलदारांचीच सेवा करणारा पक्ष आहे) जेव्हा उदयाला येत होता, आणि गरिबांची-कामगारांची भाषा बोलण्याचे नाटक करत होता, तेव्हा त्यांनाही भाजपाईंनी आणि संघींनी अर्बन नक्सल म्हटले होते. महाराष्ट्रामध्ये जेव्हा कम्युनिस्ट पक्षाने शेतकऱ्यांचा लॉंग मार्च काढला होता (ज्याच्या मागण्या श्रीमंत शेतकरी धार्जिण्या होत्या), त्या मोर्चाबद्दल भाजपच्या पूनम महाजन म्हटल्या होत्या की हा मोर्चा सुद्धा अर्बन नक्सलांचा आहे. तामिळनाडू मध्ये स्टरलाईट च्या विषारी प्रकल्पाविरुद्ध लढणाऱ्या एका वकिलाला, बॅंगलोर मध्ये एका ब्लॉगरला सुद्धा अर्बन नक्सल म्हणत अटक केली गेली. जेव्हा खोट्या गोष्टींचा प्रचार वाढतो, तेव्हा त्या अनेकदा हाताबाहेरही जातात; संघाच्या अशा विखारी प्रचाराची खोली इतकी आहे की एका व्यक्तीने तर भारतातील मोठ्या उदयोगपती (!) किरण मजुमदार शॉ यांनाही अर्बन नक्सल म्हणून टाकले! नोंद घेण्याजोगी गोष्ट अशी की ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रतिभावान लेखक गिरीश कर्नाड, ज्यांना भाजपने त्यांच्या मृत्यूवर अनिच्छेने का होईना श्रद्धांजली वाहिली, त्यांनी या सर्व नकली प्रचाराविरोधात "मी सुद्धा अर्बन नक्सल" अशी गळ्यात पाटी लावून निषेध केला होता!

विवेक अग्निहोत्री या संघी विचाराच्या व्यक्तीने 'अर्बन नक्सल' नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने व्याख्या केली आहे की "ते बहुदा अदृश्य असतात आणि गर्दित मिसळतात. कुणीही अर्बन नक्सल असू शकते. तुम्हाला वाटत असेल की तुमचे मुलं एखाद्या प्राध्यापकाकडे ट्युशन घेताना सुरक्षित आहे, पण तो अर्बन नक्शलवाद शिकत असेल. ते शंकेला हत्यार म्हणून वापरतात आणि गोंधळ व विभ्रम आणि गोंधळ निर्माण करतात." या व्याख्येनुसार तर जगातील प्रत्येक शिक्षक आणि व्यक्ती जो वैज्ञानिक दृष्टिकोण शिकवत आहे, तो अर्बन नक्षल म्हटला जाईल कारण शंका आणि गोंधळ हे वैज्ञानिक प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहेत! जर नीट पाहिले तर लक्षात येईल की जे कोणी गरिबांबद्दल, कामगारांबद्दल, शोषणाबद्दल, सरकारच्या धोरणांबद्दल बोलतील त्यांना 'अर्बन नक्सल' म्हणून बदनामी करण्याचा पूर्ण प्रयत्न करायचा जेणेकरून त्यांच्या कामांमध्ये अडचणी निर्माण होतील हेच संघाचे आणि भाजपचे हत्यार आहे. तेव्हा येत्या काळात या सर्वांना निशाणा करून दडपशाही करायची असाच या सरकारने इरादा जाहीर केला आहे.

जनतेच्या नागरी अधिकारांना कमी करणाऱ्या या सर्व काळ्या कायद्यांना आत्ता कडक करण्यामागचे खरे कारण आहे ते देशाची ढासळती अर्थव्यवस्था आणि मंदीचे संकट. आता लपून राहिलेले नाही की मंदी आहे, आणि ती वाढत आहे. अशा काळात जेव्हा जनतेमध्ये असंतोष पसरतो, त्याला काबूमध्ये आणण्यासाठी भांडवलदारांना "लोहपुरुष" हवे असतात, आणि त्यांच्या हातात "पोलादी" कायदे असावे लागतात. जर मोदीच म्हणतात की त्यांच्या कार्यकाळात दहशतवाद कमी झालेला आहे, तर जास्त कडक कायद्यांची गरज काय होती या प्रश्नाचे उत्तर दहशतवादामध्ये नाही, तर भांडवलदारांच्या आर्थिक हितसंबंधांच्या रक्षणामध्ये आहे !




**भारतीय फॅसिस्टांचे म्हणजे संघी लोकांचे खरे गुरु हिटलर आणि मुसोलिनी आहेत आणि त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत आज ते जनतेच्या लोकशाही अधिकारांवर नियंत्रण आणणारे कायदे बनवत आहेत.**

**कार्टून साभार - तन्मय त्यागी**

# हो प्रधानमंत्री महोदय! आम्ही संपदा निर्माण करणाऱ्यांचा सन्मान करतो! पण तुमचे भांडवलदार मित्र संपदा निर्माण करत नाहीत!

पान 1 वरून

उघडला आहे. ही गोष्ट वेगळी की आम्ही 12 तास खपून आणि नंतर 5 ते 10 हजार पगार घेऊन सुद्धा ते आमच्याकडून एका कागदावर सही घेतात, ज्यावर लिहिलेले असते की आम्ही 8 तास काम केले आहे आणि त्याबदल्यात आम्हाला किमान मजुरी मिळाली आहे. तरीही आमचा मालक राजा हरिश्चंद्रासारखा सत्यनिष्ठ आणि कर्णासारखा दानशूर तर मानलाच जाईल! आठवत नाही? प्रत्येक मंगळवारी आणि शनिवारी मंदिराच्या बाहेर आम्हा उघड्या-नागड्यांना जो भंडारा लागतो ? आणि यावरही जर त्याने लेबर इन्सपेक्टर, फॅक्टरी इन्स्पेक्टरला विकत घेतले, किंवा त्याला खोटे कागद दाखवून आमच्याकडून 12 तास काम करवले आणि **आम्हाला कायद्याने ठरवलेली किमान मजुरी सुद्धा दिली नाही, तर आम्ही त्याच्या इराद्यावर आणि सत्यनिष्ठेवर संशय घेऊ? किती कृतघ्न आहोत आम्ही !**

असो ! तर आम्ही लोक त्याच्या कारखान्यामध्ये त्याच्या मशिनवर त्याचा कच्चा माल वापरून त्याच्यासाठी माल तयार करतो, त्यासाठी 12-12 तास खपतो, आणि मग मालक त्या मालाला बाजारात विकतो आणि गुंतवणुकीवर नफा कमावतो. नफ्याच्या एका हिश्श्यातून त्याने जर 10-12 कोटींची गाडी घेतली, 30-35 कोटींचा बंगला घेतला आणि आपल्या मुलांवर लाखो खर्च करून विदेशात शिकायला पाठवले, आणि ऐयाशी करण्यासाठी आपल्या बायका-पोरांच्या कपडे, दागिन्यांवर खर्च केला तर त्याला बिचाऱ्याला इतकाही अधिकार नाही? त्याला इतकाही अधिकार नाही की तो आपल्या उबवणाऱ्या जीवनाला कंटाळून डुकरांसारखे खाईल आणि मग त्याची ढेर फुग्यासारखी फुगेल आणि मग त्याला साखर, अधिक वजन, कोलेस्टेरॉल आणि हृदयाचे विकार होतील? तुम्हाला दिसत नाही का की श्रीमंत असल्याची किती मोठी किंमत तो देत आहे? किती निर्लज्ज आहोत आम्ही कामगार !

असो. उत्पादनसाठी त्याला स्वत:चे भांडवल लावावे लागले, ज्यातून त्याने कारखान्याची जमीन घेतली, मशिन आणि कच्चा माल विकत घेतला आणि मजुरांची श्रमशक्ती विकत घेतली. हे भांडवल त्याच्याकडे कुठून आले? त्याच्या बापाकडून, किंवा बँकेकडून लोन घेऊन, किंवा कंपनीला शेअर मध्ये तोडून आणि त्यांना विकून हे भांडवल जमा केले. चला आता त्या लाडक्या उद्योगपतींबद्दल बोलूयात ज्यांना त्यांच्या बापाकडून भांडवल वारशाने मिळाले. (अनुवादक: म्हणजे हे भांडवल काही काम न करता फक्त त्यांच्या ताब्यात आले!) त्यांच्या बापाकडे हे भांडवल कसे आले? त्यांच्या बापाच्या बापाने, म्हणजे आज्याने त्यांना दिले. पण या बापांच्या साखळीत जो पहिला बाप होता, त्याच्याकडे **भांडवल कुठून आले? त्याने ते भांडवल बऱ्याच कष्टकऱ्यांना लुटून, बरबाद करून, उध्वस्त करून गोळा केले. कसे? हे समजण्यासाठी अगोदर आपल्याला या विषयाला थोडा वेळ बाजूला ठेवून हे समजून घ्यावे लागेल की रुपये-पैसे म्हणजे चलन काय आहे.**

**जगाच्या इतिहासामध्ये मालाची देवाणघेवाण विकसित होत गेली. या प्रक्रियेत निर्माण झालं ते चलन.** आज ज्याला आपण रुपये-पैसे, नोटा-नाणी म्हणून बघतो, ते 500 किंवा 3,000 वर्षांपूर्वी तर नक्कीच अस्तित्वात नव्हते. मग लोक देवाणघेवाण कशी करत होते? तर अगोदर पशुधनाच्या रुपात, नंतर तांबे-सोने-चांदी इत्यादी धातूंच्या रुपात आणि विकसित होत आता कागदी नोटांच्या रुपात. थोडे खोलात जाऊयात. **देवाणघेवाण करायला कोणतीही दोन माणसं पाहिली तर एकमेकांच्या वस्तूंची गरज असणे हा योगायोगच असे**ल. कुऱ्हाड विकून धान्य घ्यायचे असेल तर कुऱ्हाड विक्रेत्याला असा धान्य विक्रेता शोधावा लागेल ज्याला कुऱ्हाड हवी आहे. जर दोन जणांमध्ये देवाणघेवाण हा योगायोगाचा मामला आहे, तर अनेक उत्पादकांमध्ये मालाची देवाणघेवाण गुंतागुंतीची असणारच. **अशामध्ये हजारो वर्षांच्या इतिहासामध्ये देवाणघेवाणीची प्रक्रिया गुंतागुंतीची होत असताना चलन म्हणजेच मुद्रा, पैसा-रुपये, इत्यादी अस्तित्वात आले.** चलन वापरून कोणीही माल विकत घेऊ शकते आणि विकू शकते. चलनामुळे देवाणघेवाण सोपी झाली कारण चलन हे सोबत न्यायला सोपे, टिकाऊ आहे आणि सर्वांनी मान्य केलेले आहे. **त्यामुळे मला जर कुऱ्हाड विकून धान्य घ्यायचे असेल तर कुऱ्हाडीची गरज असलेल्या धान्य विक्रेत्याला शोधत बसावे लागत नाही!** दुसरे हे समजले पाहिजे की **चलनाला स्वत:ला काही किंमत नसते, पण चलन असा माल आहे ज्याचा वापर इतर मालांसोबत समानतादर्शक म्हणून वापर होतो (आणि म्हणूनच चलन सुद्धा एक माल आहे. सोबतच चलनाला मूल्य आहे, ज्याबद्दल आपण पुढे बोलूयात**). चलन म्हणून प्राचीन काळात अगोदर पशूधन होते, नंतर तांबे, कांसे, इत्यादी होते आणि नंतर त्याची जागा सोन्या-चांदीने घेतली; आता जास्त माल घ्यायचा असेल तर सोने-चांदी बैलगाडी वर लादून नेणे नेहमीच शक्य नाही त्यामुळे शेकडो वर्षांच्या काळात सोन्याच्या जागी कागदी नोटा आल्या ज्या सोन्या-चांदीचे प्रतिक होत्या. **आता समजण्याची गोष्ट ही की जर समाजात विविध वस्तूंचे उत्पादन होत नसते, तर चलनला अस्तित्वच नसते!** तुम्ही ना नोटांना-नाण्यांना खाऊ शकता, ना अंगावर घालू शकता, आणि ना अंथरूण-पांघरूण करु शकता, ना त्याचे घर बनवू शकता, त्यामुळे चलनाला स्वत:ला काहीच किंमत नसते, त्याचा माल म्हणून वापर फक्त देवाणघेवाणीसाठी आहे. त्यामुळे मुळ गोष्ट ही की समाजात खरी संपदा आहे निर्माण होणाऱ्या वस्तू, ज्या नसतील तर चलनाला काहीच किंमत रहात नाही. म्हणजे चलनाच्या रुपातील भांडवल हे समाजातील खऱ्या वस्तुरुपातील भौतिक संपदेचेच प्रतिनिधित्व करते, किंवा दुसऱ्या शब्दात चलन हे समाजातील निर्माण झालेल्या मालावर एक दावा आहे, आणि त्यामुळेच **भांडवलदार वर्ग त्याच्याकडील चलन रुपी भांडवलाला उत्पादन साधनांमध्ये (कारखाने, हत्यारं, यंत्र, कच्चा माल, वगैरे) आणि श्रमशक्ती मध्ये बदलवतो आणि कारखान्यामध्ये उत्पादन करवतो, आणि मालकीमुळे त्यातून निर्माण झालेल्या उत्पादनावरही त्याचाच अधिकार असतो**. मूळ चर्चेकडे परत जाऊयात.

म्हणजे सर्वात पहिल्या बापाकडे म्हणजे पहिल्या भांडवलदाराकडे जे चलन-भांडवल आहे, ते खरेतर समाजात निर्माण होणाऱ्या मालाचेच प्रतिनिधित्व करते आणि त्या मालाचे अस्तित्व नसेल तर या भांडवलदाराकडे असलेल्या चलन-भांडवलाला काही अर्थ नाही. हेच चलन भांडवल त्या समाजात अस्तित्वात असलेल्या सर्व मालांवर एक निश्चित दावा नक्कीच आहे. हे चलन-भांडवल त्याच्याकडे कुठून आले असेल? **ऐतिहासिक रुपाने आणि वस्तुस्थिती पाहिली तर मालकांनी शेतकरी आणि आदिवासींना जमिनींपासून बेदखल करून, वेगवेगळ्या देशांवर कब्जा करून आणि लुटून, स्वत:च्या मेहनतीने आणि हत्यारांनी उत्पादन करणाऱ्या कारागिरांकडून त्यांची उत्पादनाची साधनं, हत्यारं हिसकावून घेऊन आणि विविध प्रकारची जोर जबरदस्ती आणि लुटीच्या माध्यमातून आपले सुरूवातीचे भांडवल एकत्र केले**. जाहीर आहे की तेव्हाची राज्यसत्ता आणि सरकारांनी सुद्धा त्यांची मदत केली. सुरुवातीच्या भांडवलदारांकडे साधारणपणे याच खुनी प्रक्रियेतून भांडवल संचय झाला, मग तुम्ही कोणत्याही देशाचा इतिहास घेऊन वाचा. यापैकी काही भांडवलदार व्यापारी होते, तर काही असे कारागिर पण होते ज्यांनी इतर कारागिरांची माल उत्पादकाच्या रुपामध्ये स्वतंत्रता समाप्त करून त्यांना आपले मजूर बनवले. म्हणजे सुरुवातीच्या भांडवलदारांकडे जे भांडवल होते, ते त्यांच्याकडे बापाच्या मेहनतीतून नाही, तर दुसऱ्याच्या मेहनतीची कमाई लुटून आले होते. **भांडवलाचे मूळ हेच आहे, ज्याला आदिम भांडवल संचय म्हणू शकतो. हेच ते 'मूळ पाप' आहे ज्याने भांडवलाला जन्म दिला.** म्हणजे भांडवलदार वर्गाच्या भांडवलाच्या मुळामध्ये आपल्या मेहनतीतून निर्माण केलेली संपदा होती, जिला जबरदस्तीने हडप केले गेले. आता त्या भांडवलदारांबद्दल बोलूयात, जे फक्त "आपल्या बापाकडून मिळालेल्या" भांडवलाच्या आधारावर गुंतवणूक करत नाहीत.

आजच्या काळात अनेक, खरेतर बहुतांश, भांडवलदार असे आहेत जे आपल्या खाजगी भांडवलाच्या आधारावर उत्पादन करत नाहीत, तर ते **सरकारी बँकांकडून कर्ज घेऊन किंवा शेअर बाजारामध्ये आपले शेअर सामान्य लोकांना विकून भांडवल गोळा करतात. इथे तर स्पष्टच आहे की हा देशातील सामान्य कष्टकरी लोकांचा पैसा आहे,** मग ते बँकांमध्ये जमा भांडवल असो किंवा ते भांडवल जे सामान्य लोकांद्वारे शेअर विकत घेऊन जमा केले जाते. साधारणपणे आजच्या भांडवलदारांकडे याच तीन मार्गांनी भांडवल येते कारण उत्पादनाचा स्तर एवढा वाढला आहे की कोणताही भांडवलदार फक्त आपल्या खाजगी भांडवलाच्या आधारावर (जे त्यांच्या पूर्वजांनी कष्टकऱ्यांना लुटून एकत्र केले होते) बाजारात स्पर्धा करण्यासाठी उतरू शकत नाही. मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यासाठी त्याला कर्जाची आवश्यकता असते आणि कोणत्या ना कोणत्या रुपाने तो सामान्य लोकांचाच पैसा गोळा करतो, मग तो बँकांद्वारे असो वा शेअर बाजाराच्या माध्यमातून. **म्हणजे आपल्या लाडक्या भांडवलदारांकडे जे भांडवल आहे, ते समाजातील कष्टकरी लोकांद्वारे पिढ्यानपिढ्या केलेल्या उत्पादनाचा संचय आहे.** आता फक्त एवढ्याशा गोष्टीमुळे जर तुम्ही कामगार बंधु-भगिनी असा विचार तर नाही करू लागला ना, की जर समाजातील सगळे भांडवल, सगळी धन-संपदा आणि वस्तू आम्ही आणि आमच्या कष्टकरी पूर्वजांनी निर्माण केली आहे, तर यावर आमचा सामुदायिक अधिकार असला पाहिजे? असे थोडीच होते. तुम्ही तर डोक्यावर चढायला लागलात. डोकं थंड ठेवा आणि पुढे वाचा !

आमच्या भांडवलदाराने ज्या मशिनी विकत घेतल्या, त्या सुद्धा कोणत्यातरी दुसऱ्या भांडवलदाराने आपल्या कारखान्यात बनवल्या होत्या. या मशिनी सुद्धा आमच्या सारख्याच इतर कामगार-कष्टकऱ्यांनी बनवल्या होत्या आणि बाजारात इतर भांडवलदारांना विकल्या होत्या. या मशिनी बनवणाऱ्या भांडवलदाराकडे भांडवल कसे आले, याची चर्चा आपण वर केलीच आहे: त्याच्या बापाकडून (आणि सर्वात पहिल्या बापाने इतर कष्टकऱ्यांना लुटून हे भांडवल एकत्र केले होते!), किंवा बँकेकडून कर्जरुपात किंवा शेअर बाजारातून . त्यामुळे **समाजामध्ये जे काही उत्पादित होत आहे, जी काही उत्पादनाची साधनं आहेत, ती खरेतर श्रमातून निर्माण झालेली आहेत आणि त्यांना श्रमाचेच उत्पादन म्हटले गेले पाहिजे**. पण या उत्पादनाच्या साधनांवर आणि भांडवलावर तर भांडवलदारांची मालकी असते. **जे कामगार आहेत, त्यांच्याकडे उत्पादनाची साधनं नसतात, आणि त्यांना जिवंत राहण्यासाठी आपली श्रमशक्ती विकावीच लागते**. पण याचा अर्थ तुम्ही असा तर नाही लावू लागलात ना की उत्पादनाच्या साधनांचं समाजीकरण झालं पाहिजे? बघा, तुम्ही परत जरा जास्तच करायला लागलात! असा विचार करायची हिंमत करू नका!

सर्व मालांचे, मग ती उत्पादनाची साधनं असोत किंवा उपभोग्य वस्तू, एक मूल्य असते. या मुल्यामध्ये काय सामील आहे? दोन गोष्टी: पहिली म्हणजे या मालांच्या उत्पादनामध्ये खर्च झालेली उत्पादनाची साधनं म्हणजे कच्चा माल आणि मशिन, कारखान्याची वास्तू इत्यादीचा घसारा. या सर्व वस्तू पूर्वी केलेल्या श्रमाचाच परिणाम आहेत. दुसरी म्हणजे कामगारांनी श्रमातून निर्माण केलेले नवीन मूल्य. म्हणजे पहिले आहे ते भूतकाळातील श्रम, ज्याला आपण 'मृत श्रम' म्हणू शकतो कारण ते बनलेल्या वस्तूच्या रुपात समोर आहे आणि त्याची विक्री झालेली आहे आणि दुसरे आहे ते जिवंत श्रम जे उत्पादन साधनांवर काम करून नवीन मूल्य निर्माण करत आहे आणि उत्पादन साधनांच्या मूल्याला संरक्षित करून नवीन मालामध्ये स्थानांतरित सुद्धा करत आहे. जर मशिनं नुसतीच पडून राहिली, तर झिजतील आणि त्यांचे मूल्य संपून जाईल. कामगारांची मेहनतच मशिनींना कामात लावते आणि या प्रक्रियेत त्यांचे मूल्य सुध्दा संरक्षित करते आणि तुकड्या-तुकड्यांमध्ये (जसे मशिन) किंवा एकसाथ (जसे कच्चा माल) नवीन मालामध्ये स्थानांतरित करते. याप्रकारे नवीन मालामध्ये उत्पादन साधनांचे मूल्य आणि कामगाराद्वारे निर्माण झालेले नवीन मूल्य सामील असते.

**आम्ही कामगारांनी निर्माण केलेल्या नवीन मुल्यामध्ये काय सामील आहे? मजुरीएवढे मूल्य आणि मालकाचा नफा!** कामगार सुरुवातीचे काही तास तर त्याला मिळणाऱ्या मजुरीइतके मूल्य निर्माण करतो आणि नंतर तो त्याच्या वर अतिरिक्त मूल्य निर्माण करतो. या अतिरिक्त मुल्याच्या बदल्यामध्ये त्याला काही मिळत नाही. त्याला तर फक्त मजुरी मिळते जी त्याला आणि त्याच्या परिवाराला जगण्यासाठी आवश्यक वस्तूंच्या किमतीवर आधारित असते. हेच अतिरिक्त मूल्य मालकाचा नफा असतो. पण आम्हाला जी मजुरी मिळते, तिच्या इतके मूल्य सुद्धा आम्हीच मालकाला निर्माण करून दिले आहे, म्हणजे आमची मजुरी सुद्धा आम्हीच निर्माण करतो आणि मालकाचा नफा सुद्धा ! **म्हणजे मालक आम्हाला पोसत नाहीये, तर आम्ही मालकाला पोसायला बाध्य आहोत. का? कारण उत्पादनाच्या साधनांवर मालकाची मालकी आहे, जरी ती साधनं सुद्धा आमच्याच वर्गाने निर्माण केली आहेत.** ही गोष्ट लपून का जाते आणि सरळ पद्धतीने समजत का नाही की आम्हीच नफा निर्माण करतो आणि आम्हीच सगळ्या मुल्याचे सर्जक आहोत, जे संपदेचा मोठा हिस्सा आहे? कारण भांडवलशाही येण्यासोबतच मेहनतीची लूट म्हणजे श्रमाच्या शोषणाने एक नवीन रुप धारण केले. अगोदरच्या सामंती काळामध्ये भूदास-शेतकरी आठवड्यातले तीन दिवस स्वत:च्या जमिनीवर काम करायचा ज्यातून त्याला जगण्याइतकं मिळायचं आणि बाकी चार दिवस तो जमिनदाराच्या जमिनीवर बेगार करायचा. पहिले तीन दिवस स्वत:च्या शेतावर केलेले श्रम हे आवश्यक श्रम होते कारण त्यातूनच तो जगायचा, आणि जमिनदाराकडे केलेले चार दिवसाची बेगारी हे अतिरिक्त श्रम होते ज्यातून जमिनदार जगायचा (आणि ऐश करायचा!). **भांडवलशाहीच्या अगोदरच्या सर्व व्यवस्थांमध्ये आवश्यक श्रम आणि अतिरिक्त श्रमामध्ये वेळ आणि जागेचा फरक दिसून येत होता, ज्यामुळे दिसून येत होते की शोषक वर्ग कष्टकऱ्यांच्या श्रमावर जगत होता.** जसे वरच्या उदाहरणात स्पष्ट दिसून येते की भूदास किंवा अवलंबून असलेला शेतकरी हे किती दिवस आणि कुठे स्वत:साठी काम करायचे आणि किती दिवस आणि कुठे सामंती जमिनदारासाठी काम करायचे. पण **भांडवलशाही मध्ये असे होत नाही. सगळे काम एकाच जागी आणि एकाच कालावधीमध्ये केले जाते. कामगार आता एकाच जागी 8 ते 12 तास मजुरी करतो. त्याची श्रम शक्ती (म्हणजे कष्ट करण्याची त्याची क्षमता) स्वत: एक माल बनते आणि त्याची किंमत यावरून ठरते की**

पान 11 वर

# हो प्रधानमंत्री महोदय! आम्ही संपदा निर्माण करणाऱ्यांचा सन्मान करतो! पण तुमचे भांडवलदार मित्र संपदा निर्माण करत नाहीत!

पान 10 वरून

**या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाची गुंतवणूक** किती असेल, म्हणजे कामगार आणि त्याच्या परिवाराच्या उपजीविकेवर होणारा सरासरी खर्चच मजुरी ठरवतो. अशामध्ये होऊ शकते की कामगार 8 तासांपैकी 3 तासामध्येच इतके मूल्य निर्माण करतो जे त्याच्या जिविकोपार्जनासाठी आवश्यक आहे, आणि बाकी श्रमकाळामध्ये तो भांडवलदारसाठी काम करतो. म्हणजे **आवश्यक श्रमकाळ आणि अतिरिक्त श्रमकाळ आता एकाच अखंड श्रमकाळाचा हिस्सा बनले आहेत आणि श्रमशक्ती सुद्धा एक माल बनली आहे. श्रमशक्ती माल यामुळे बनते कारण की प्रत्यक्ष उत्पादकाला त्याच्या उत्पादन साधनांपासून वंचित केले जाते, आणि त्याच्या सर्व उत्पादन साधनाचा एकाधिकार भांडवलदार वर्गाच्या हातात येतो.** म्हणजे कामगार आता जिवंत राहण्यासाठी आपली श्रमशक्ती विकायला बाध्य असतो. एकदा कामगाराने आपली श्रमशक्ती भांडवलदाराला विकली की त्याच्या पूर्ण कार्यदिवसावर भांडवलदाराचा अधिकार असतो, कारण भांडवलदार उत्पादन साधनांचा स्वामी असतो. अशामध्ये कामगार जे मूल्य निर्माण करतो, त्याला तो श्रमाचे उत्पादन म्हणून न दाखवता, भांडवलाचे उत्पादन म्हणून दाखवतो. त्यामुळे असे वाटते की संपदेचे निर्माण भांडवल करत आहे, कारण उत्पादन साधनांवर आणि श्रम शक्तीवर भांडवलाचा अधिकार आहे. **पण सत्य हे आहे की सगळ्या मुल्याचे उत्पादन आणि यामुळेच संपदे च्या मोठ्या हिश्श्याचे उत्पादन आपण कामगार—कष्टकरी करत असतो.**

असो. **मजुरी, वेतन काय आहे, याला थोडं खोलात समजावं लागेल. भांडवलदारांच्या दृष्टीने मजुरी म्हणजे 'एका दिवसाच्या कामाचे मोल' असते. पण जर आम्ही जितके मूल्य निर्माण करतो, ते जर आम्हाला पूर्ण मिळत असते, तर मग मालकांचा नफा कुठून येतो?** मालक म्हणतात की बाजारामध्ये ते मालाला त्याच्या मूल्यापेक्षा जास्त भावाने विकून नफा कमावतात. तर मग, विकणाऱ्याचा लाभ म्हणजे विकत घेणाऱ्याचे नुकसान असले पाहिजे, आणि जर पूर्ण समाजात भांडवलदार वर्ग अशाप्रकारे जास्त मूल्यावर नफा कमावेल, तर जेवढा लाभ विकणाऱ्यांना होईल, तेवढेच नुकसान घेणाऱ्यांना होईल, म्हणजे एकूण लाभ = एकूण हानी ! पण मग समाजातील संपदा तर नाही वाढली ना ! फक्त एकाचा लाभ हे दुसऱ्याचे नुकसान झाले. पण आम्हाला माहित आहे की प्रधानमंत्री मोदींची ही गोष्ट तर खरी आहे की समाजामध्ये सतत संपदा निर्माण होत आहे आणि वाढत आहे. म्हणजे जर संपूर्ण समाजाच्या स्तरावर संपदा वाढत आहे, तर मग मालकांचा नफा ते म्हणतात तसा वाढत नाहीये, म्हणजे मालाला मूल्यापेक्षा जास्त किमतीला विकून वाढत नाहिये, तर या नफ्याचा स्त्रोत काही वेगळाच आहे. माल तर त्याच्या किमतीलाच विकला जात आहे. खरेतर, संपूर्ण भांडवलदार वर्ग आपल्या सगळ्या मालाला त्याच्या मूल्यावरच विकतो, परंतु अनेक कारणांमुळे (उदा. मागणी-पुरवठा, परंतु ज्याची सविस्तर चर्चा इथे करणे शक्य नाही) वेगवेगळ्या मालांचे मूल्य त्यांच्या बाजारातील किमतीच्या खाली किंवा वर असू शकते. सध्या इतके समजणे पुरेसे राहिल की सामाजिक स्तरावर सर्व मालांचे एकूण मूल्य नेहमीच सर्व मालांच्या एकूण किमतीएवढे असते. पण इतके स्पष्ट आहे की **नफा बाजारामध्ये मालाला जास्त किमतीला विकून येत नाही. उलट कामगार आपल्या मेहनतीतून आपली मजुरी सुद्धा निर्माण करतो आणि भांडवलदाराचा नफा सुद्धा.** नाहीतर संपूर्ण भांडवलदार वर्गाला मिळून ना काही नफा झाला असता आणि ना समाजामध्ये भांडवल आणि संपदे मध्ये काही वाढ झाली असती. कामगार जे नवीन मूल्य निर्माण करतो, ते त्याची मजुरी आणि भांडवलदाराच्या नफ्याएवढे असते.

**मग मजुरी कशी ठरते? जसे की आम्ही वर सांगितले, आपली मजुरी खरेतर सरासरी आपल्या आणि आपल्या परिवाराच्या निर्वाहासाठी आवश्यक असलेल्या वस्तुंच्या किमतीएवढी असते;** म्हणजे आपण जिवंत राहू शकू, कामगारांचा अंश वाढवू शकू आणि पिढ्यानपिढ्या भांडवलदारांसाठी नफा निर्माण करु शकू, यासाठी आम्हाला आणि आमच्या परिवाराला फक्त जगण्याचा खुराक! हीच असते आमची मजुरी ! ती अनेकदा या किमान पातळीच्या खाली आणि वर जाऊ शकते, कारण सामाजिक स्तरावर बेरोजगारी मुळे आम्हा मजुरांमध्ये सुद्धा भांडवलदार वर्ग स्पर्धा लावत असतो. ज्यामुळे उत्पादनाच्या एखाद्या क्षेत्रात कधी मजुरी सरासरीच्या वर असते तर दुसऱ्या क्षेत्रात सरासरीच्या खाली असू शकते. पण हे चढ-उतार झाले तरी मजुरी या सरासरीच्याच खालीवर फिरते. **थोडक्यात सांगायचे तर, भांडवलदार/मालक/ठेकेदार आम्हाला पोसत नाहियेत तर आम्ही त्यांना पोसत आहोत,** त्यांना खाऊ घालत आहोत आणि त्यांच्या आणि त्यांच्या औलादींच्या ऐयाशीची किंमत चुकवत आहोत. तर काय झाले? याच अर्थ असा थोडीच आहे की आम्ही प्रधानमंत्री मोदींचं न ऐकावं आणि या भांडवलदार, धनदांडग्यांना संशयाच्या नजरेने पहावे, त्यांच्या नफ्यावर प्रश्न उपस्थित करावेत, त्यांच्या ऐयाशीवर बोटं ठेवावीत? आणि असा विचार तर आम्ही बिलकुलच केला नाही पाहिजे की जर सगळं काही आम्हीच मिळून निर्माण करतो, जर आम्हीच भांडवलदार वर्गाला पोसत आहोत, जे स्वत: काहीच करत नाहीत, तर मग आम्हीच सर्व कारखाने, खाणी, शेतांवर कब्जा केला पाहिजे! हे तर अतीच होईल ! त्यामुळे असा अजिबात विचार करू नका!


**आता या प्रश्नावर येऊयात की संपदा कशाला म्हणतात? मूल्य हीच संपदा आहे का, जी मानवाद्वारे निर्माण होते? नाही! हे तर खरे आहे की सर्व संपदेचे दोन स्त्रोत आहेत: निसर्ग आणि मेहनत.** निसर्गावर तर सर्वांचा समान अधिकार आहे. तो कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी निर्माण केला नाही, उलट सर्व मनुष्यांना समानतेमध्ये मिळाला होता. पण मुल्याचा एकच स्त्रोत आहे: मेहनत! कारण मूल्य म्हणजे काही नाही तर वस्तूमध्ये समाविष्ट आणि एकरूप झालेले श्रम आहे, अजून काहीच नाही. पण संपदेमध्ये सर्व उत्पादित वस्तूंसोबतच नैसर्गिक वस्तू सुद्धा येतात. संपदेच्या नैसर्गिक रुपांवर तर भांडवलदारांच्या तर्कानुसार कोणतीच खाजगी संपत्ती नसली पाहिजे. उदाहरणासाठी, जमिनीवरच्या कोणत्याही प्रकारच्या खाजगी संपत्तीला लगेच समाप्त केले पाहिजे, कारण **हा तर सर्वात अश्लिल प्रकारचा अन्याय आहे की जमिनीवर काही जमिनमालकांचा कब्जा असेल.** निसर्गाच्या सर्व निर्मितीवर सर्वांचा समाईक अधिकार असला पाहिजे. पण फक्त निसर्गाने दिलेल्याच नाही तर **सर्व मेहनतीतून निर्माण गोष्टींवरही सर्वांचा समाईक अधिकार असला पाहिजे कारण आज प्रत्येक वस्तू च्या उत्पादनामध्ये सामाजिक आणि सामुहिक श्रम लागलेलं आहे.** एका कामगार सुद्धा कोणत्याही वस्तू किंवा मालाबद्दल बोलू शकत नाही की "हे माझे आहे." ते युगच गेले जेव्हा कोणताही उत्पादक असे म्हणू शकला असता. आणि ज्या काळात एखादा उत्पादक हे म्हणू शकत होता की ते त्याचे आहे, तेव्हा सुद्धा त्याला जिवंत राहण्यासाठी इतर अनेक वस्तूंची गरज पडत होती, जिच्यासाठी तो दुसऱ्या उत्पादकांवर अवलंबून होता; म्हणजे तेव्हा सुद्धा त्याचे सामाजिक आणि भौतिक अस्तित्व सामाजिक श्रमावर अवलंबून होते. पण भांडवलाच्या मोठ्या प्रमाणातील उत्पादनामुळे तर सर्व **उत्पादनाने सरळ-सरळ सामाजिक चरित्र धारण केले आहे आणि कोणत्याही एका माल किंवा वस्तूबद्दल कोणी म्हणू शकत नाही की ती त्याच्या एकट्याच्या श्रमाचे उत्पादन आहे.**

**आता खऱ्या अर्थाने पाहिले तर आपल्या प्रधानमंत्री महोदयांचे बिचारे गुजराती भांडवलदार मित्र वास्तवामध्ये संपदेचे उत्पादन करत नाहीत, उलट तिला हडप करतात,** तिचे खाजगीकरण करतात. श्रमाच्या उत्पादनावर भांडवलदार वर्गाचे नियंत्रण असते कारण उत्पादनाच्या साधनांवर त्यांचा एकाधिकार आहे आणि यामुळेच कामगाराची श्रमशक्ती सुद्धा एका मालामध्ये रुपांतरित होते ज्याचे भांडवलदार वर्ग शोषण करतो. पण श्रमशक्ती हा एक वेगळ्या प्रकारचा माल आहे जो स्वत:च्या मुल्यापेक्षाही अधिक मूल्याचे उत्पादन करू शकतो कारण श्रमशक्तीची सक्रियता हेच श्रम आहे आणि श्रम हेच मूल्याचे सारतत्व आहे. भांडवलदार वर्ग आपल्या भांडवलाच्या जोरावर नैसर्गिक संपदेचे खाजगीकरण तर करतो आणि जरी जमीन आणि इतर नैसर्गिक संसाधनांचे कोणतेही मूल्य नसते, पण खाजगी संपत्ती बनवले गेल्यामुळे त्यांचीही बाजारात किंमत नक्कीच असते. म्हणजे संपदेच्या या दोन्ही स्त्रोतांवर भांडवलदार वर्गाचा अधिकार असतो, जरी त्यांना निर्माण करण्यात त्याचे काहीही योगदान नाही.

म्हणजे थोडक्यात हे की निसर्गाशिवाय देशातील धन-दौलत आणि संपदेचे उत्पादक भारतातील आपण कोट्यवधी कामगार आहोत, पण तरीही आम्हाला उपासमार, गरिबी आणि अनिश्चिततेमध्ये जगावे लागते, जेव्हा की भांडवलदार वर्ग, म्हणजे प्रधानमंत्र्यांचे मित्रगण, या सर्व संपदेच्या सृजनात आणि देश चालवण्यात तितकेच अनुपयोगी आणि बेकार आहेत जितके की स्वत: प्रधानमंत्री मोदी ! **सामाजिक रुपाने फालतू झालेल्या या भांडवलदार वर्गाला, सामाजिक रुपाने फालतू झालेला त्यांचा प्रमुख पुढारी संशयाने न पहावे म्हणून भावनिक आवाहन करत आहे. हा तर सगळाच मामला संशयास्पद दिसत आहे!**

पण तुम्ही या सगळ्या गोष्टींमधून असा अर्थ तर नाही काढत ना की संपदेचे खरे उत्पादक, निसर्गासहित, आपण कष्टकरी लोक आहोत तर यावर आपला सामुहिक अधिकार असला पाहिजे? तुम्ही हा तर विचार करत नाही आहात ना की परजीवी मालक/ठेकेदारांपासून उत्पादनाची साधनं हिसकावून घेतली पाहिजेत? तुम्ही असा तर विचार नाही करत आहात ना की खाजगी संपत्तीची व्यवस्थाच अन्यायपूर्ण आहे आणि सर्व संपदेला सामाजिक संपत्ती बनवले पाहिजे? **तुम्ही या पर्यायावर तर विचार करत नाही ना की उत्पादन, राज्यकारभार आणि समाजाच्या संरचनेवर उत्पादन करणाऱ्या वर्गांचा अधिकार असला पाहिजे आणि निर्णय घेण्याची शक्ती त्यांच्या हातामध्ये असली पाहिजे?** काय भयंकर विचार करत आहात तुम्ही? तुम्हाला आपल्या "लाडक्या" मालकांची सेवा करणाऱ्या पोलिस आणि फौजेची भिती वाटत नाही का, की तुम्ही सक्ती करण्याबद्दल विचार करू लागलात? काय म्हणालात, की पोलिस आणि सेनेमध्ये सुद्धा सामान्य जवान तर कामगार आणि गरिब शेतकऱ्यांच्याच घरातून भरती झाले आहेत आणि ते सुद्धा अधिकाऱ्यांद्वारे शोषित-उत्पीडीत आहेत? आता तर तुमच्या बोलण्यातून एकदम देशद्रोहाची दुर्गंध येऊ लागली आहे! काय म्हणालात! **देश कागदावर बनलेला नकाशा नसतो, तर त्यामध्ये राहणाऱ्या कष्टकरी आणि कामगारांनी बनतो?** आता तर तुम्ही एकदम देशद्रोहीच झालात! प्रधानमंत्री मोदींच्या मते तर अंबानी-अडानींचा नफाच खरी "भारत माता" आहे आणि त्यांच्या नफ्याची भक्तीच खरी "देशभक्ती" आहे! ते काहीच निर्माण करत नाहीत आणि तुमच्या मेहनतीवर ऐशोआराम आणि ऐयाशीचे जीवन जगतात म्हणून काय झाले? तुम्ही कामगार आणि कष्टकरी सुई पासून ते विमानापर्यंत सर्व बनवता आणि तरीही गरिबी आणि उपासमारीत राहता म्हणून काय झाले? सर्व संपदेचे निर्माण तुमचे श्रम आणि निसर्ग करतो म्हणून काय झाले? कायदा म्हणतो की भांडवलदारच सर्व उत्पादन साधनांचे मालक आहेत, त्यामुळे तुम्ही बेकायदेशीर बोलू शकत नाही! **काय म्हटले? कायदा माणसाला बनवत नाही, माणूस कायदा बनवतो?** की स्वातंत्र्याचा लढा सुद्धा इंग्रजांसाठी बेकायदेशीर होता, अश्वेत लोकांचे आंदोलन सुद्धा अमेरिकन भांडवलदार वर्गासाठी बेकायदेशीर होते, फ्रेंच राज्यक्रांती सुद्धा सामंतांच्या कायद्यासाठी बेकायदेशीर होती, रशियन क्रांती सुद्धा झार आणि भांडवलदार वर्गासाठी बेकायदेशीर होती? तर तुम्ही यातून काय निष्कर्ष काढत आहात? की आपल्या देशामध्ये सुद्धा राजकीय, आर्थिक, सामाजिक क्रांती घडवावी लागेल ? **आता तर तुम्ही एकदम कम्युनिस्टांसारखे बोलू लागलात! चुकून हीच गोष्ट तर योग्य नाही ना?**

**अनुवाद, संपादन:** अभिजित



**हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचे सदस्य, देशाचे खरे क्रांतिकारी युवक ! आजही खऱ्या स्वातंत्र्यासाठी आणि न्यायासाठी लढणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीचे प्रेरणास्त्रोत !**

## शिवराम राजगुरू

**यांच्या जन्मदिवसानिमित्त (24 ऑगस्ट) देशाला नफेखोरांच्या आणि त्यांच्या फॅसिस्ट चाकरांपासून मुक्त करण्यासाठी संघर्षाचा संकल्प करा.**

# एखाद्या समुदायाला गुलाम करण्याचे समर्थन करून आपण स्वतंत्र राहू शकतो का?

पान 16 वरून

जनतेची समाईक संस्कृती, भाषा, खाणं-पिणं, पेहराव, इतिहास आणि अर्थव्यवस्था आहे. कोणत्याही राष्ट्रीयतेचा आधार धर्म नसतो, तर एक समाईक आर्थिक तंत्र, समाईक भाषा आणि संस्कृती आणि समाईक इतिहास असतो. या प्रश्नावर सुद्धा अनेक लोक चुकीची मतं बाळगतात, जसे की डॉ. भीमराव आंबेडकर. त्यांनी सुद्धा काश्मिरचे विभाजन आणि काश्मिर खोऱ्यातील मुस्लिम बहुसंख्येच्या कारणामुळे त्यांना पाकिस्तानला देण्यास किंवा विभाजन करवून सार्वमत करवण्याचे समर्थन केले होते. **धर्माला आधार बनवून भारताची फाळणी चूक होती आणि या आधारावर काश्मिर खोऱ्याला पाकिस्तानला देण्याचे समर्थन करणे सुद्धा चूक होते, विशेषत: तेव्हा जेव्हा की खुद्द काश्मिर खोऱ्यातील सामान्य जनता पाकिस्तानच्या इस्लामी राज्यामध्ये सामील होऊ इच्छित नव्हती.** काश्मिरच्या राष्ट्रीयतेचा आधार कोणताही धर्म नाही तर समाईक अर्थव्यवस्था, इतिहास, भाषा, संस्कृती आणि क्षेत्र आहे. या काश्मिरी राष्ट्रीयतेमध्ये काश्मिरी मुस्लिम आणि काश्मिरी पंडित हिंदू दोन्ही सामील आहेत. हे सत्य आहे की धार्मिक कट्टरतावादी फुटीरतावाद आणि दहशतवादाच्या काळात काश्मिरी पंडितांसोबत ऐतिहासिक अन्याय झाला आणि जेकेएलएफ (जम्मू-काश्मिर लिबरेशन फ्रंट) आणि इतर फुटीरतावादी इस्लामी कट्टरतावादी संघटनांच्या नेतृत्वामध्ये त्यांना तेथून पळवून लावण्यात आले, त्यांच्या हत्या झाल्या, त्यांची घरं आणि संपत्तीवर कब्जा करण्यात आला. **काश्मिरी पंडितांसोबत हा व्यवहार खरेतर काश्मिरी राष्ट्रीयतेच्या संपूर्ण संघर्षासाठी आत्मघाती सिद्ध झाला. याने भारतीय राज्यसत्तेला ही संधी दिली की या राष्ट्रीयतेच्या प्रश्नाला धर्म आणि पंथाचा मामला बनवता यावे.** कदाचित ही गोष्ट नंतर काश्मिरी राष्ट्रीयतेच्या संघर्षाचे नेतृत्व करणाऱ्या जेकेएलएफला सुद्धा लक्षात आली आणि त्यांच्या नेतृत्वामध्ये आधिकारिक रित्या काश्मिरी पंडितांवर झालेल्या अन्यायाबद्दल माफी मागितली गेली आणि सोडून गेलेल्या काश्मिरी पंडितांनांच्या परिवारांना परत काश्मिर मध्ये बोलावले. परंतु तोपर्यंत बरेच नुकसान झालेले होते. नंतर अनेक काश्मिरी पंडित परिवार परत आले, पण जास्त काश्मिरी पंडित नाही परतले. याचे एक कारण त्यांचा वाईट अनुभव तर होताच, पण सोबतच हे सुद्धा होते की काश्मिरी पंडितांना भारतीय राज्यसत्तेने विविध भागांमध्ये वसवले, नोकऱ्या आणि आरक्षण दिले आणि त्यांना अनेक प्रकारांनी लाभार्थी बनवले आणि यामुळे परत जाण्याचे त्यांच्याकडे कोणतेही कारण नव्हते. आता काश्मिरला परत जाण्यासाठी त्यांच्याकडे आपल्या वेगळ्या राष्ट्रीयतेच्या भावनेशिवाय आणि स्मृतींशिवाय कोणतेची भौतिक कारण नव्हते. पण **जे काश्मिरी पंडित आजही काश्मिर मध्ये आहेत आणि जे काश्मिरी पंडित नंतर काश्मिरमध्ये परत गेले, ते आजही तेथील काश्मिरी मुस्लिमांसोबत मिळून मिसळून राहतात.** ते काश्मिरी पंडित सुद्धा मोदी सरकारद्वारे कलम 370 हटवण्याचा त्याच प्रकारे विरोध करत आहेत ज्याप्रकारे इतर काश्मिरी.

नेहरू सरकार आणि त्यानंतरच्या काँग्रेसी सरकारांनी काश्मिरी जनतेसोबत जी धोकेबाजी सुरू केली, तिला मोदी-शाहच्या जोडीने फक्त तार्किक निष्कर्षाला पोहोचवले आहे. पण हे काश्मिरी जनतेच्या अभूतपूर्व दमन आणि उत्पीडनावर आधारित आहे आणि भविष्यामध्ये हे भारतीय राज्यसत्तेसाठी अशा अडचणी निर्माण करेल ज्याचा उपाय या व्यवस्थेच्या चौकटीत अशक्य असेल.

काश्मिर म्हणजे फक्त जमिनीचा तुकडा नाही, तर तो त्या लोकांनी मिळून बनला आहे जे त्या जमिनीवर राहतात; जे शतकांपासून तिथे रहात आले आहेत, ज्यांचा आपला एक समाईक इतिहास, संस्कृती, भाषा, अर्थव्यवस्था राहिली आहे. पण भारतात राष्ट्रवादाच्या नावावर आपल्या मध्ये अशी भावना निर्माण केली जाते की काश्मिरला फक्त एका जमिनीच्या तुकड्याच्या रुपात पहावे. भारताचा नकाशा पाहून आपल्याला सांगितले जाते की काश्मिर भारत मातेचा मुकूट आहे! पण जे लोक त्या जागी शतकांपासून रहात आलेत, ज्यांनी तिथे पिकं उगवली, त्या जमिनीला फुलवले, तिथे इमारती उभ्या केल्या, प्रत्येक गोष्ट निर्माण केली, त्यांचे काय? त्या जमिनीवर त्यांचा काही अधिकार नाही का? जर विचार करा मित्रांनो! **उद्या आपण ज्या जमिनीवर आपल्या पूर्वजांच्या काळापासून जगत आलोय, उत्पादन करत आलोय, घर बनवून राहिलो आहे, जर आज कोणी अमेरिका, ब्रिटन किंवा चीन येऊन हिसकावून घेऊ लागले किंवा दावा करू लागले की या जमिनीवर त्यांचा अधिकार आहे, भारतातील महिलांवर त्यांचा अधिकार आहे (जणू काही महिला म्हणजे कोणी माणूस नसून जमिनीचा तुकडा आहेत), तर आपण हे स्विकार करू का? आपण याला सहन करू का? जाहीर आहे की नक्कीच नाही आणि ना केले पाहिजे. बस असेच काही काश्मिरी समुदायासोबत होत आहे.** ज्या स्वायतत्तेच्या शर्तीवर ते भारतात सामील झाले होते त्या शर्तींना अन्यायपूर्ण पद्धतीने रद्द करून भारताचा शासक वर्ग काश्मिरी जनतेला एक मोठा धोका देत आहे. याला काश्मिरी जनता कधीच स्विकार करणार नाही. जो पर्यंत हा अन्याय चालू राहिल, तो पर्यंत आपण काश्मिर मध्ये शांततेची आशा ठेवू शकत नाही. नुकत्याच आलेल्या रिपोर्ट्सवरून हे साफ आहे की काश्मिर मध्ये हजारोंच्या संख्येने जनता सडकेवर उतरू लागली आहे. ती दमन आणि अत्याचारापासून स्वातंत्र्य मागत आहे. ती सैनिकी बंदुका आणि बुटांच्या सावलीत राहून थकली आहे. ती आपल्या मुलांना आणि युवकांना पॅलेट गनमुळे आंधळे होताना पाहून थकली आहे. ती आपल्याच जमिनीवर बंदुका आणि चेकपोस्ट पाहून आपली ओळख दाखवताना थकली आहे. काय भारतीय शासक वर्ग बंदुकीच्या टोकावर काश्मिरी जनतेला नेहमीच दाबून ठेवू शकतो? दीड कोटी लोकांची हत्या करून या प्रश्नाला सोडवू शकतो? नाही ! हे ना फक्त अशक्य आहे, उलट या प्रश्नाला अजून गुंतागुंतीचे बनवणारे आहे. काही काळानंतर सैन्य थकून जाते, पण लढणारे समुदाय कायम स्वरूपी कधी थकत नाहीत. जोपर्यंत दमन आणि उत्पीडन चालू आहे, तोपर्यंत ते मध्येमध्ये काही काळ सुस्तावून पुन्हा लढू लागतात. त्यामुळे **सैनिकी मार्गाने काश्मिर प्रश्नाचे उत्तर शक्य नाही**. जर होणार असते तर आत्तापर्यंत होऊन जायला पाहिजे होते. जगाच्या इतिहासात असे कधीच झालेले नाही. सत्तर वर्षांच्या सांगता न येऊ शकणाऱ्या दमना नंतरही पॅलेस्तिनी जनतेच्या विरोधाला इस्त्रायल थांबवू शकले नाही. आणि काश्मिर ना पॅलेस्ताईन आहे आणि ना भारत इस्त्रायल. इथे तर ते अजूनच अशक्य आहे.

### कामगार वर्ग आणि 'राष्ट्रवादा' चा विचार

कामगार वर्गाचे कोणतेही राष्ट्र नसते. राष्ट्रवादाच्या विचारधारेचा आधार असतो इतर राष्ट्रांचा द्वेष आणि घृणा. हा भांडवलदार वर्गाचा विचार असतो. कारण त्यांच्यासाठी जनतेमध्ये वर्ग चेतनेला थांबवणे आवश्यक असते, त्यांच्यासाठी इतर राष्ट्रांच्या भांडवलदार वर्गासोबत स्पर्धा गरजेची असते, त्यांच्यासाठी इतर राष्ट्रांच्या कामगार वर्गापासून आपल्या देशातील कामगार वर्गाला वेगळे ठेवणे आणि त्यांच्यामध्ये परकेपणाची भावना ठेवणे आवश्यक असते. पण **राष्ट्रवादामुळे कामगार वर्गाला काय मिळते? काहीच नाही! जेव्हाही राष्ट्रवादाच्या नावावर भारत आणि पाकिस्तान मध्ये युद्ध झाले तेव्हा कोणी नेता, अधिकारी किंवा त्यांची मुलं मेली का? सेनेचे उच्च अधिकारी अशा युद्धांमध्ये सहसा मरतात का? दहशतवादी हल्ल्यांमध्ये धनदांडग्यांची मुलं सहसा मरतात का? जर अंबानी-अडानी-टाटा-बिर्ला इतकेच राष्ट्रवादी आहेत तर आपल्या मुलांना सैन्यामध्ये का पाठवत नाहीत? युद्धामध्ये हे सगळे जबरदस्त नफा कमावतात, कारण युद्धाच्या वेळी हत्यारांची खरेदी-विक्री आणि दलालीमध्ये यांनाच पैसा मिळतो; भाजपवाले तर या सगळ्यांमध्ये सर्वात पोहोचलेले आहेत ज्यांनी कारगिल युद्धामध्ये मारल्या गेलेल्या सैनिकांच्या ताबूताच्या खरेदीमध्ये सुद्धा घोटाळा केला होता; युद्धादरम्यान किमती वाढतात, सट्टेबाजी आणि दलालीचा बाजार गरम होतो. ज्या भागावर कब्जासाठी युद्ध केले जाते, तिथे सुद्धा लूटीसाठी बाजार आणि गुंतवणूक करून स्वस्त श्रमाला लुटण्याची आणि नफा कमावण्याचे स्वातंत्र्य याच धनपशूंना मिळते!** जरा विचार करा की आजपर्यंत अशा युद्धांमधून कामगार-कष्टकऱ्यांना काय मिळाले? राष्ट्रवादाचा बाजार गरम होण्यामुळे तुम्हाला काय मिळाले, कामगार बंधू आणि भगिनींनो? जेव्हाही असे युद्ध होते, तेव्हा देशामध्ये आणीबाणी लागू केली जाते; कामगारांना 14-14 तास काम करणे बाध्य केले जाते. तर कामगारांसाठी राष्ट्रवादाचा अर्थ काय आहे? याचा अर्थ आहे भांडवलदारांसाठी तोंडावर कुलूप लावून हाडतोड मेहनत करणे आणि घाण्याच्या बैलाप्रमाणे खटणे !

आम्ही आपल्या देशावर प्रेम करतो का? नक्कीच करतो, कारण देश काही एखादा नकाशा नाही, तर त्याला मेहनत करणारे लोकच बनवतात. **कोणत्याही देशाचा आधार त्याचा निसर्ग आणि त्याच्या कष्टकरी लोकांची मेहनत असते. पण देशावर असलेले आमचे प्रेम इतर देशांच्या द्वेषावर आधारित नाही, उलट त्यांच्यासोबत बंधुभावावर आधारित आहे. आमच्यासाठी देशाच्या एकतेचा अर्थ सैनिकी बंदुका आणि बुटांच्या आधारावर कोणत्याही समुदायाला जबरदस्ती दाबून ठेवणे नाही. आमच्यासाठी देशाच्या एकतेचा अर्थ आहे सर्व कामगार-कष्टकऱ्यांची समतामूलक एकता, मग ते कोणत्याही समुदायाचे असोत; आमच्यासाठी देशाच्या एकतेचा अर्थ आहे प्रत्येक प्रकारचे राष्ट्रीय दमन समाप्त करणे आणि देशातील सर्व राष्ट्रीयतांना बरोबरीचे स्थान.** फक्त एका अशाच देशाची एकता शांती आणि न्यायासोबत टिकू शकते. काश्मिरचा गेल्या सहा दशकांचा इतिहास हे दाखवत नाही का की काश्मिरी जनतेच्या दमनाच्या आधारावर कोणतीच एकता स्थायी राहू शकत नाही? सहा दशकांचा इतिहास हे दाखवत नाही का, की न्याय नसेल तर शांती आणि एकता कायम राहू शकत नाही? यामुळे कामगार बंधूंनो आणि भगिनींनो! आपल्या मालकांद्वारे चालवल्या जात असलेल्या अंधराष्ट्रवादाच्या वादळात वाहवत जाण्याअगोदर विचार करा की यामुळे तुम्हाला काय मिळेल? 'बेगानी शादी मे अब्दुल्ला दिवाना' बनू नका. आमचा देशप्रेमाचा अर्थ वेगळा आहे. आमचे देशप्रेम समुदायांची बरोबरी आणि प्रत्येक समुदायाच्या कामगार-कष्टकऱ्यांच्या बरोबरीवर आधारित आहे; ते भांडवलदार वर्गाच्या बाजाराच्या आणि नफ्याच्या नाही तर कष्टकरी जनतेची मेहनत आणि देशाच्या निसर्गावर आधारित आहे.

हे पण समजण्याची गरज आहे साथींनो की भाजपच्या फॅसिस्ट राष्ट्रवादाचा आधार धार्मिक कट्टरतावाद आणि धर्मवाद आहे. हे पण स्पष्ट आहे की धार्मिक कट्टरतावादाचा आणि धर्मवादाचा फायदा तुमच्या मालकांनाच मिळतो. **कोणत्याही धार्मिक दंगलीमध्ये कोणता मालक कधी मेला आहे? कोणत्याही दंगलीमध्ये कधी मालकांचे घर जळाले आहे? नाही ! यामध्ये नेहमीच आपण मरतो आणि आपले घर जळते!** याचा फायदा नेहमीच भांडवलदारांना होतो. जेव्हा पण आपण धर्माच्या नावाने लढतो तेव्हा फायदा मालक आणि ठेकेदारांनाच मिळतो. यामुळेच कामगार साथींनो, मालक-ठेकेदारांच्या या षडयंत्रापासून सावध रहा. लोकांनी काय खावे, काय घालावे, कोणता धर्म मानावा अथवा कोणताही धर्म न मानावा, हा पूर्णपणे त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. आपण त्याला सामाजिक किंवा राजकीय प्रश्न नाही बनवले पाहिजे. कामगार वर्गाला या मुलभूत लोकशाही विचाराला स्विकारावेच लागेल, नाहीतर तो मालक-ठेकेदारांच्या आणि त्यांच्या तुकड्यांवर पोसल्या जाणाऱ्या राजकीय पक्षांच्या षडयंत्राचा निशाणा बनत राहिल आणि मूर्ख बनवून आपल्याच भावा-बहिणींचा जीव घेत राहिल. इतके लक्षात ठेवा की तुमचा समाईक शत्रू भांडवलदार वर्ग आहे, मग तुमचा जात धर्म काहीही असो. त्यामुळेच अंधराष्ट्रवाद आणि धर्मवादाच्या लहरीमध्ये फरफटत जाण्यापेक्षा थंड डोक्याने विचार करा, की यामध्ये तुमचे काय आहे? यामुळे तुम्हाला काय मिळेल?

### काश्मिर प्रश्नाचा कायमस्वरूपी उपाय काय असू शकतो?

साथींनो, आपण कामगार आणि कष्टकरी आहोत आणि आपला कोणताही एकच देश नाही. आम्ही कोणत्याही दडपलेल्या आणि अत्याचारित राष्ट्रीयतेच्या दडपशाहीच्या विरोधात आहोत आणि त्याचा विरोध करतो. कारणे हेच आहे की जो कामगार वर्ग आपल्या भांडवलदार वर्गाकडून कोणत्याही दमित राष्ट्रीयतेच्या दडपशाहीचे समर्थन करेल, तो स्वत: सुद्धा आपल्या भांडवलदार वर्गाकडून शोषण, दडपशाही आणि अत्याचाराचा शिकार होण्यासाठी शापित असेल. जो कामगार वर्ग कोणत्याही अन्य राष्ट्रीयतेला गुलाम बनवले जाण्याचे समर्थन करतो किंवा त्यावर चुप्प राहतो, तो स्वत: सुद्धा आपल्या मालक आणि ठेकेदारांची गुलामी करण्यास बाध्य बनतो. कारण हे की जेव्हा भांडवलदार वर्ग राष्ट्रवादाच्या नावावर कोणत्याही दडपलेल्या राष्ट्रीयतेच्या दडपशाहीला आणि अत्याचाराला न्याय्य ठरवण्यात यशस्वी होतो, तेव्हा तो आपल्या कामगार वर्गाची दडपशाही आणि अत्याचाराला सुद्धा राष्ट्रवाद आणि "देशभक्ती"च्या नावाने योग्य ठरवण्यात यशस्वी होतो. यामुळे आपल्या देशाच्या भांडवलदार वर्गाद्वारे कोणत्याही समुदायाची दडपशाही आणि अत्याचाराचे समर्थन करणे वास्तवामध्ये कामगार वर्गासाठी आत्मघाती सिद्ध होते.

कामगारांची आणि कष्टकऱ्यांची लढाई न्याय आणि समानतेसाठी आहे. फक्त आपल्या न्याय आणि समानतेची नाही तर संपूर्ण मानवतेसाठी न्याय आणि समानता. खरेतर, इतर कोणत्याही प्रकारच्या न्याय आणि समानतेचे अस्तित्व संभव नाही. यामुळेच कामगार वर्ग कधी सुद्धा कोणत्याही सामाजिक हिश्श्याच्या, किंवा राष्ट्रीयतेच्या, किंवा जातीच्या शोषण, दमन आणि अत्याचाराचे समर्थन करू शकत नाही. भांडवलदार वर्गाचा राष्ट्रवाद बाजारात निर्माण होतो आणि याच राष्ट्रवादाच्या लहरीला तो सांस्कृतिक स्तरावर पसरवून आपल्या दडपशाही आणि शोषणाला न्याय्य ठरवण्याचा आधार निर्माण करतो. तो इतर राष्ट्रांची दडपशाही आणि अत्याचारासाठी कामगार वर्गामध्ये सुद्धा सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. आपण भांडवलदार वर्ग, मालक आणि ठेकेदारांच्या या षडयंत्राप्रती सावध राहिले पाहिजे. आपण कोणतीही किंमत देऊन प्रत्येक प्रकारचे शोषण, दमन आणि अत्याचाराचा विरोध केला पाहिजे, नाहीतर जाणते-अजाणतेपणी आपण आपल्याच दमन आणि शोषणाला योग्य ठरवण्याचा आधार तयार करु.

**या गोष्टींच्या प्रकाशात आपण सर्वात अगोदर तर काश्मिरी जनतेच्या राष्ट्रीय दमनाला विरोध करत जम्मू-काश्मिर मधून सैन्याच्या जोरावरचे हुकूमशाही शासन समाप्त करणे, सशस्त्र सेना विशेष अधिकार अधिनियम (आफ्स्पा) कायदा रद्द करणे, काश्मिर मधून सैन्य हटवण्याचे समर्थन केले पाहिजे; याशिवाय, आपण जम्मू-काश्मिर मध्ये तत्काळ स्वतंत्र आणि निष्पक्ष लोकशाही निवडणुकांची मागणी केली**

पान 13 वर

# एखाद्या समुदायाला गुलाम करण्याचे समर्थन करून आपण स्वतंत्र राहू शकतो का?

पान 12 वरून

**पाहिजे जेणेकरून तेथील जनतेला आपली विधानसभा निवडण्याचा भांडवली लोकशाही अधिकार मिळेल; सोबतच आपण सर्व जम्मू-काश्मिर (पाकिस्तान शासित काश्मिर सह) मध्ये सार्वमताच्या मागणीला आंतरराष्ट्रीय स्तरावर उचलले पाहिजे; याशिवाय, आपण जम्मू काश्मिरच्या जनतेच्या आत्मनिर्णयाच्या अधिकाराचे विनाशर्त समर्थन केले पाहिजे. या सर्व मुलभूत लोकशाही मागण्या आहेत, ज्या आपण कामगार आणि कष्टकरी लोकांच्या वतीने उचलल्याच पाहिजेत.**

पण इतर काही गोष्टी आहेत ज्यांना समजणे अत्यंत आवश्यक आहे. साम्राज्यवादाच्या काळात भांडवलदार वर्ग दमित राष्ट्रीयतांना आत्मनिर्णयाचा अधिकार देण्याची क्षमता गमावून बसला आहे. खरेतर, आज भांडवलदार वर्ग राष्ट्रीय प्रश्नाला सोडवूच शकत नाही. एक समाजवादी राज्यच खरेतर राष्ट्रांना आत्मनिर्णयाचा अधिकार देऊ शकते आणि राष्ट्रीय दमन मुळापासून संपवू शकते. साम्राज्यवादाच्या युगातील मरणासन्न आणि परजीवी भांडलवशाही दमित राष्ट्रीयतांना आत्मनिर्णयाचा अधिकार देऊच शकत नाही. कारण हे आहे की साम्राज्यवादाच्या युगामध्ये नफ्याच्या घसरत्या दराचे संकट सर्वाधिक गंभीर रूपात आणि आपल्या अंतकारी रुपात प्रकट होते. लाभप्रद गुंतवणुकीच्या संधी कमी होत जातात आणि बाजारांसाठी भांडवली देशांमधील स्पर्धा गळाकापू रुप धारण करते. अशामध्ये, क्षेत्रीय विस्तारवाद सुद्धा वाढतो आणि भांडवलदार वर्गाचे कट्टरतावादी आणि प्रतिक्रियावादी चरित्र सुद्धा अत्याधिक वाढते. याच काळामध्ये सर्व दमित अस्मितांवरील अत्याचार पाशविकतेची नवीन उंची गाठू लागतात. मग ते प्रवासी कामगार असोत, दलित असोत, स्त्रिया असोत, आदिवासी असोत किंवा दमित राष्ट्रीयता. आजच्या काळामध्ये भांडवलदार वर्गाकडून ही आशा ठेवणे हास्यास्पद असेल की ते कोणत्याही दमित राष्ट्रीयतेला स्वनिर्णयाचा अधिकार देतील. राष्ट्रीय दमन तेव्हाच समाप्त होऊ शकते, जेव्हा समाजवादी क्रांतीद्वारे कामगार वर्ग सर्वहारा सत्ता प्रस्थापित करेल आणि समाजवादी राज्य आणि अर्थव्यवस्था निर्माण करेल. इतिहासामध्ये राष्ट्रांना खऱ्या अर्थाने स्वनिर्णयाचा अधिकार देऊन राष्ट्रीय दमन समाप्त करण्याचे काम तेव्हाच झाले आहे, जेव्हा कामगार वर्ग सत्तेमध्ये होता. उदाहरणार्थ, हे काम सर्वात विस्मयकारक पद्धतीने सोवियत रशियाने करून दाखवले. ऑक्टोबर 1917 मध्ये समाजवादी क्रांतीनंतर रशियाच्या कामगार वर्गाने आपली सत्ता स्थापित केली आणि रशियन साम्राज्यातील सर्व राष्ट्रीयतांना स्वनिर्णयाचा अधिकार दिला.

यातून हे सुद्धा सिद्ध झाले की जर राष्ट्रीयतांना स्वनिर्णयाचा अधिकार दिला, त्यांची दडपशाही संपवली आणि त्यांना खऱ्या अर्थाने समानतेचा अधिकार मिळाला, तर ते स्वेच्छेने एका समाजवादी राज्यामध्ये सामील होतात. "देश तुटण्याचे" भय भांडवलदार वर्ग आपल्या राष्ट्रवादी प्रचाराद्वारे जनतेच्या मनामध्ये वसवतो कारण तो करत असलेल्या राष्ट्रीय दमनाद्वारे देश वास्तवामध्ये आतून तुटलेलाच असतो आणि दडपलेल्या राष्ट्रीयतांना जबरदस्ती जोडून ठेवलेले असते. ही एकता दिखाव्याची असते कारण दडपलेल्या राष्ट्रीयता स्वत:ला कधीच मनापासून देशाचे अंग म्हणून स्विकारत नाहीत. सोवियत संघाने दाखवले की जर राष्ट्रीयतांचे दमन आणि त्यांच्याप्रती असलेला असमानतेचा व्यवहार समाप्त करून खऱ्या अर्थाने एका अशा समाजवादी गणराज्याची स्थापना केली जावे ज्यामध्ये सर्व राष्ट्रीयतांना बरोबरीचा दर्जा मिळेल, तर देश तुटणार नाही उलट सर्व राष्ट्रीयतांची जनता मिळून स्वेच्छेने सर्वाधिक मोठे राज्य निर्माण करेल. यामुळेच "देश तुटण्याची" भिती पूर्णत: निराधार असते.

कामगार वर्ग तर नेहमीच स्वेच्छेने बनलेल्या एकतेच्या आधारावर मोठ्यात मोठे राज्य निर्माण करण्याच्या बाजूने असतो. आज काश्मिरचीच गोष्ट का करावी, क्रांतिकारी कामगार पक्षाच्या नात्याने आपण तर संपूर्ण भारतीय उपखंडाच्या सर्व राष्ट्रीयतांना सामील करणाऱ्या एका समाजवादी गणराज्याच्या निर्माणाच्या बाजूने आहोत. पण हे जबरदस्तीच्या आधाराने केले जाऊ शकते का? जबरदस्तीने जोडी बनवून निर्माण केलेले राज्य न्याय आणि शांतीने राहू शकते का? त्या देशामध्ये सर्वांना बरोबरीसह शोषण आणि अत्याचारापासून मुक्त होऊन रहाण्याचा अधिकार मिळू शकतो का? नाही ! आमचे मानणे आहे की असे समाईक राज्य तेव्हाच बनू शकते, जेव्हा त्याच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये रहाणाऱ्या सर्व राष्ट्रीयता स्वेच्छेने आणि समानतेच्या आधारावर एक होतील. अशी एकता स्थापित होऊ शकते. पण ती भांडवलशाही असेपर्यंत संभव नाही. ती समाजवादी राज्यामध्येच शक्य आहे.

त्यामुळे आज एकीकडे आपण काश्मिरी जनतेच्या दडपशाहीचा विरोध केला पाहिजे आणि तिथे तत्काळ सैन्य हटवणे आणि लोकशाही निवडणुकांची मागणी केली पाहिजे, आणि आपण हे सुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की कोणत्याही दमित राष्ट्रीयतेला प्रत्येक प्रकारच्या राष्ट्रीय दमनापासून खऱ्या अर्थाने मुक्ती समाजवादी क्रांती सोबतच मिळू शकते. त्यामुळेच प्रत्येक दमित राष्ट्रीयतेच्या संघर्षाच्या दोरीला इतिहासाने क्रांतिकारी कामगार आंदोलन आणि कम्युनिस्ट आंदोलनसोबत अभिन्न प्रकारे जोडले आहे. क्रांतिकारी कामगार आंदोलन आणि कम्युनिस्ट आंदोलनाची ही नैतिक आणि ऐतिहासिक जबाबदारी आहे की त्यांनी प्रत्येक किंमत देऊन दमित राष्ट्रीयतांच्या संघर्षांचे समर्थन केले पाहिजे, तिथेच दमित राष्ट्रीयतांच्या आंदोलनासमोर हे पण स्पष्ट असले पाहिजे की क्रांतिकारी कामगार आंदोलन आणि कम्युनिस्ट आंदोलनसोबत मोर्चा बनवल्याशिवाय लक्ष्य प्राप्तीची शक्यता धूसरच आहे. नक्कीच ते हारणार नाहीत आणि संपणारही नाही; पण त्यांचे जगणे अवघड होईल. विसाव्या शतकाच्या समाजवादी क्रांत्यांसाठी हे अनिवार्य होते की त्यांनी राष्ट्रीय मुक्ती आणि शेतकऱ्यांच्या लोकशाही आंदोलनाचे समर्थन करावे; एकविसाव्या शतकाच्या राष्ट्रीय मुक्ती संघर्षांसाठी हे अनिवार्य आहे की त्यांनी क्रांतिकारी कामगार आंदोलन आणि समाजवादासोबत नाते कायम करावे. हे आजचे ठोस वास्तव आहे, ज्याला समजणे कामगार क्रांतिकारी आणि सोबतच राष्ट्रीय दमना विरोधात लढणाऱ्या लोकशाही शक्तींना समजणे गरजेचे आहे.

शेवटी, हे पुन्हा म्हटले गेले पाहिजे की **खऱ्या कामगार क्रांतिकारकांनी कोणतीही किमंत देऊन प्रत्येक प्रकारच्या राष्ट्रीय दमनाला विरोध केला पाहिजे आणि दमित राष्ट्रीयतांच्या संघर्षाला विनाशर्त समर्थन दिले पाहिजे. जर कामगार वर्गीय शक्ती असे करण्यात अयशस्वी ठरल्या आणि जाणते-अजाणतेपणी त्यांनी आपल्या देशाच्या भांडवलदार वर्गाला बोलून किंवा मौन समर्थनाची राष्ट्रीय आणि सामाजिक कट्टरतावादी भुमिका घेतली, तर त्या आपल्या देशातील भांडवलदार वर्गाला खुद्द आपलेच दमन करण्याचा परवाना आणि आणि मान्यता देतील.** अशा काही शक्ती भारतामध्येही आहेत ज्यांनी 5 ऑगस्ट रोजी कलम 370 रद्द झाल्यावर आपल्या तोंडाला कुलूप लावले आहे आणि काश्मिरच्या प्रश्नावर काहीही बोलण्यास घाबरत आहेत. अशा गट आणि संघटनांना उद्या इतिहासाच्या कठड्यात उभे होऊन एक अशक्य स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करावा लागेल. आज आपल्याला प्रवाहाविरोधात पोहत काश्मिरी जनतेच्या राष्ट्रीय दमनाला विरोध करावा लागेल आणि त्यांच्या लोकशाही अधिकारांच्या संघर्षाचे समर्थन करावे लागेल. तेव्हाच आपण फॅसिस्ट मोदी सरकार आणि भांडवली राज्यसत्तेकडून, अंधराष्ट्रवाद आणि धर्मवादाच्या वादळाद्वारे, प्रत्येक विरोध आणि आंदोलन दडपण्याला योग्य ठरवणे थांबवू शकतो, त्यासमोर एक क्रांतिकारी आह्वान प्रस्तुत करू शकतो. अन्यथा आपण संघर्ष सुरू होण्या अगोदरच हार मानू. हे आपले कर्तव्य आणि दायित्व आहे की आपण क्रांतिकारी कामगार पक्षाच्या रुपामध्ये प्रत्येक प्रकारच्या दडपशाहीचा आणि शोषणाचा विरोध करावा आणि त्याविरोधात लढावे. राष्ट्रीय दमन यापैकीच एक आहे. आज ती वेळ आली आहे जेव्हा आपण या बांधीलकीवर अंमल करावा आणि इतिहासाने उपस्थित केलेल्या आवाहनांचा सामना करावा.

**अनुवाद: राहूल**

# रेल्वे खाजगीकरणाच्या रुळावर बुलेट ट्रेनच्या वेगाने पळणारे मोदी सरकार

पान 5 वरून

रेल्वेला देशी-विदेशी भांडवलदारांच्या स्वाधीन करण्याच्या षडयंत्राची सुरुवात तर आजपासून जवळजवळ पंचवीस वर्ष अगोदरच सुरू झाली होती. जागतिक बँकेच्या दबावाखाली रेल्वे बोर्डाने हा निर्णय अगोदरच घेतला होता कि १८ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संख्येला हळूहळू कमी करत ९ लाखावर आणले जावे. व्यापक विरोधाच्या भीतीने याला एकदम करणे शक्य नव्हते, परंतु हळूहळू करून याला १४ लाखापर्यंत आणले गेले आहे. हेसुद्धा तेव्हा, जेव्हा रेल्वेचं दळणवळण या काळामध्ये अतिशय जास्त वाढले आहे. रेल्वेमध्ये जवळपास 2.6 लाख पदं रिकामी पडलेली आहेत. नवीन भरत्या बंद आहेत.

या काळात रेल्वेच्या सर्वच पारंपरिक युनियन्स विरोधाच्या नावावर केवळ पारंपारिक कवायती करत होत्या आणि यांचे नेते तोंड वाजवण्यापलीकडे काही करत नव्हते. एकेकाळच्या रेल्वेच्या लढाऊ कर्मचाऱ्यांना सरकारच्या कुटील डावांसमोर लाचार आणि शस्त्रहीन बनवले गेले आहे. आज सुद्धा जेव्हा रेल्वेचे संपूर्ण अस्तित्वच दावणीवर लावले गेले आहे आणि लाखो कर्मचाऱ्यांच्या भविष्यावर दरोडा टाकला जात आहे, तेव्हासुद्धा या युनियन आणि नेते मंडळी कोणत्याही झुंजार आंदोलनाची तयारी करण्याऐवजी फक्त पोकळ घोषणाबाजी करण्यात व्यस्त आहेत. वर्तमानपत्रांमधील वक्तव्यांमधून सरकारला दिल्या जाणाऱ्या यांच्या इशाऱ्याला सरकार विनोदापेक्षा जास्त गांभीर्याने घेत नाही. जेव्हा रायबरेली पासून कपूरथला, चित्तरंजन पासून बंगळूर आणि चेन्नई पासून विशाखापट्टनम पर्यंत हजारो रेल्वे कर्मचारी कंपनीकरणाच्या नावावर खाजगीकरणाच्या धोकादायक योजनेच्या विरोधात रस्त्यावर उतरत आहेत, तेव्हा सुद्धा युनियन्स गायब आहेत, जेव्हाकी त्यांनी पुढे येऊन या आंदोलनकर्त्यांचे नेतृत्व करायला पाहिजे होते आणि त्यांना एकताबद्ध करून झुंजार आंदोलनाचं स्वरूप द्यायला पाहिजे होते.

## ही अस्तित्वाची लढाई आहे

काही काळाआधी रेल्वे कर्मचारी खुप कालांतराने मोठ्या प्रमाणावर नव्या पेन्शन योजनेच्या विरुद्ध रस्त्यावर उतरले होते. पण आता तर त्यांना अस्तित्वाच्या लढाईसाठी स्वतःला तयार करावे लागेल. या लढाईची पहिली अट आहे की कामगारांपासून तुटलेल्या, वेळोवेळी त्यांना दगा देणाऱ्या आणि कामगारांवरच रुबाब झाडणाऱ्या दलाल, संधीसाधू नेत्यांची जहागिरी संपवून ट्रेड युनियन्स मध्ये अंतर्गत लोकशाही आणावी लागेल. ट्रेड युनियन चळवळींना आता परत एकदा क्रांतिकारी धार आणावी लागेल. कामगार-कर्मचाऱ्यांना अनेक युनियन्स मध्ये विभागून आपले राजकारण चमकविणाऱ्यांना बाजूला सारावे लागेल.

जर रेल्वेचे खाजगीकरण करण्यास उतरलेल्या मोदी सरकारच्या बुलडोझरला थांबवायचे असेल, तर रेल्वेच्या सर्वच कामगार-कर्मचाऱ्यांना आपापल्या युनियन्स मध्ये आवाज उठवावा लागेल, त्यांच्यामध्ये लोकशाही नियम कायद्यांचे पालन करण्यासाठी दबाव बनवून नेत्यांची नोकरशाही संपवावी लागेल आणि त्यांच्याकडून संपूर्ण जबाबदारीची मागणी करावी लागेल. तेव्हाच येणाऱ्या कठीण काळातील मोठ्या लढाया एकजूट होऊन लढल्या जाऊ शकतील. जर ते असं करू शकले तरच रेल्वे सोबतच पब्लिक सेक्टर च्या दुसऱ्या क्षेत्रातील कामगार-कर्मचाऱ्यांसाठी सुद्धा ते आशावाद आणि हिंमतीची एक मशाल बनू शकतील.

देशातील सर्वात मोठ्या सार्वजनिक क्षेत्राला उध्वस्त करून नफेखोरांच्या हवाली करण्याच्या विरोधातला लढा एकट्या रेल्वे कर्मचाऱ्यांचा प्रश्न नाही. हा सामान्य जनता आणि सर्व कष्टकऱ्यांचा सुद्धा प्रश्न आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांना आपल्या संघर्षाला केवळ सार्वजनिक क्षेत्रातील इतर कष्टकऱ्यांच्या आंदोलनाशीच न जोडता, देशातील सामान्य जनतेला सुद्धा आपल्या आंदोलनांमध्ये जोडून घ्यावे लागेल. सर्व कष्टकरी जनतेला सुद्धा रेल्वे कर्मचार्‍यांच्या संघर्षाला समजून घेत त्यांच्या समर्थनासाठी पुढे यावे लागेल.

**अनुवाद: प्रविण सोनवणे**

# महान अय्यंकाली यांच्या वारशाला विसरू नका!

## क्रांतिकारी जातिअंताच्या आंदोलनाला पुढे न्या!

आपल्यापैकी कदाचित काही जणांनीच महान जाती-विरोधी योद्धे अय्यंकाली यांचे नाव ऐकले असेल. याचे कारण समजून घेता येऊ शकते. **अय्यंकाली त्या जाती-विरोधी योद्ध्यांपैकी होते, ज्यांनी ब्राह्मणवादी आणि त्यांच्या सत्तेपासून समानतेचा अधिकार मिळवण्यासाठी एक झुंझार लढाई लढली आणि यशस्वी झाले.** त्यांनी त्या सरकारची वाट पाहिली नाही, जे सरकार क्वचितच ब्राह्मणवादी आणि उच्चजातीयांच्या सामंतांच्या विरोधात जात होते; कारण सुरूपासून अंतापर्यंत सामंती ब्राह्मणवादी शक्ती या ब्रिटीश सत्तेचे पाय चाटणाऱ्या आणि समर्थक होत्या. **अय्यंकाली यांनी सुधारणांसाठी अर्ज विनंत्यांचे काम नाही केले, उलट सडकेवर उतरून ब्राह्मणवाद्यांना खुले आवाहन दिले आणि त्यांना हरवले सुद्धा. अय्यंकालींनी सिद्ध केले की दडपलेली आणि अत्याचार झालेली लोकं ना फक्त लढू शकतात, तर जिंकू सुद्धा शकतात.** अय्यंकालींचा संघर्ष आज जातीअंताच्या लढ्यासाठी अत्यंत प्रासंगिक आहे. आज अय्यंकालींच्या संघर्षाची आठवण काढणे जातीअंताच्या आंदोलनाला सुधारवाद आणि व्यवहारवादाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी जरूरी आहे.


### कोन होते अय्यंकाली?

अय्यंकालींचा जन्म 28 ऑगस्ट 1863 ला ब्रिटीश भारतातील दक्षिणेकडील त्रावणकोरच्या संस्थानातील तिरुवनंतपुरम जिल्ह्याच्या वेंगनूर मध्ये झाला. त्यांचा जन्म केरळमधील सर्वाधिक दमित आणि अत्याचारित दलित जातींमधील एक असलेल्या पुलयार जातीमध्ये झाला. त्रावणकोर मध्ये पुलयार लोकांना ब्राह्मणवादी उतरंडी मध्ये सर्वात खालचे स्थान देण्यात आले होते. **त्यांना नायर जातीच्या जमिनदारांपासून ते ब्राह्मणांपर्यंत सर्वांचे अपमान आणि पाशवी पद्धतीचे दमन आणि अत्याचाराचा सामना करावा लागत होता. या स्थिती मध्ये अय्यंकालींच्या मनात बंडाची आग लावली.** सुरुवातीला तर ते आपल्या इतर पुलयार मित्रांसोबत मिळून काम केल्यावर अशा गीतांची आणि नृत्याची निर्मिती करू लागले जे या स्थितीच्या विरोधात आवाज उचलत होते. यामुळे अनेक युवक दलित त्यांना येऊन मिळू लागले. **अय्यंकाली सुरुवातीपासूनच समजत होते की उच्च जातींद्वारे दलितांचे दमन आणि त्यांच्या विरोधात केल्या जाणाऱ्या हिंसेच्या प्रश्नावर इंग्रज सरकार काहीच करणार नाही. त्यामुळे या दमन आणि हिंसेचे उत्तर त्यांनी स्वत: रस्त्यावर देण्याचा मार्ग निवडला.** त्यांच्या आजूबाजूला युवकांचा एक समूह अस्तित्वात येऊ लागला आणी हा समूह प्रत्येक हल्ल्याचे उत्तर ब्राह्मणवाद्यांना रस्त्यांवर देऊ लागला. ही हिंसा खरेतर आत्मरक्षणा साठी केली जाणारी हिंसा होती. पण या प्रकारच्या पलटवाराने ब्राह्मणवादी शक्ती धाकात आल्या. अय्यंकालींच्या या मार्गावर चालण्यामुळे दलित सामान्य कष्टकरी जनता त्यांच्यावर प्रेम करू लागली आणि त्यांना अनेक उपाधी दिल्या. जसे की उर्पिल्लई आणि मूथपिल्ला (मोठा भाऊ)।

अय्यंकाली अनेक प्रकारच्या धार्मिक सुधारकांनी प्रभावित झाले ज्यामध्ये अय्यावू स्वामिकल आणि नारायण गुरू हे प्रमुख होते. हे दोघेही हिंदू धर्मामधील जातीय भेदभावा विरुद्ध संघर्ष करत होते. मानवतावाद त्यांच्या धार्मिक तत्वज्ञानाचा आधार होता. हेच कारण होते की नारायण गुरूंनी आपल्या एक रचनेत हिंदू देवतांसोबतच येशू ख्रिस्त आणि पैगंबर मोहंमद यांना सुद्धा ईश्वराच्या रूपात स्विकारले होते आणि म्हटले होते की हे सगळे एकाच मानवतावादी विचाराचे समर्थन करतात आणि हे विचार जाती व्यवस्थेच्या विरोधात आहेत. अय्यंकाली तत्वज्ञानाच्या स्तरावर धार्मिक सुधार आंदोलनाच्या पुढे गेले नाहीत. या रुपाने ते एक सामाजिक आणि राजकीय क्रांतिकारक तर होते, पण वैज्ञानिक भौतिकवादी दृष्टीकोनापर्यंत पोहोचू शकले नव्हते. याचे एक कारण हे पण होते की अय्यंकाली निरक्षर होते आणि त्यांच्याकडे कोणतेही विज्ञानाचे शिक्षण नव्हते. सोबतच, त्यांच्या वेळी केरळच्या समाजामध्ये तर्कवाद आणि भौतिकतावादाला प्रस्थापित करण्याची लढाई अजूनही भ्रुणरूपातच होती. पण **कोणत्याही लोकनेत्याचे किंवा संघटनेचे प्रगतीशील असल्याचे परिमाण हे असू शकत नाही की ते भौतिकतावादी होते की नाही, उलट हे असते की ते आपल्या काळातील दमन आणि शोषणाविरोधात क्रांतिकारी पद्धतीने लढले की नाही.** म्हणजे ते दमनकारी सत्तेच्या विरोधात दृष्टीकोण स्विकारतात की नाही. जर कोणी भौतिकतावाद मानूनही राजकीय स्वरूपात सुधारवाद आणि व्यवहारवादावर चालेल, तर ऐतिहासिक रित्या त्यांना क्रांतिकारी प्रगतीशील मानता येणार नाही. जर ही गोष्ट मानली नाही तर संपूर्ण इतिहासामध्ये वैज्ञानिक भौतिकतावाद्यांशिवाय कोणीच प्रगतीशील राहणार नाही: ना स्पार्टाकस, ना मौर्य काळात झालेले पहिले क्षुद्रांचे आणि दलितांच्या विद्रोहांचे नेते, ना बिरसा मुंडा, ना चिनी तायपिंग शेतकरी विद्रोहाचे नेते, आणि ना भारतातील इंग्रजांविरोधातील सुरुवातीच्या काळातील हत्यार उचलणाऱ्या क्रांतिकारक धारा जसे 'युगांतर'आणि 'अनुशीलन'.

परंतु असे असूनही सर्वात महत्वाची गोष्ट ही आहे की अय्यंकाली आपल्या काळातील संघर्षांच्या पद्धतीमध्ये एक वैज्ञानिक आणि भौतिकवादी होते. ते कोणत्याही दलित आणि अत्याचारित जनतेच्या संघर्षांमध्ये बळाच्या वापराच्या भुमिकेला समजत होते. **ते समजत होते की लुटखोर आणि दमनकारी शासकांना सल्ला आणि प्रस्ताव देऊन त्यांचे मन बदलणे शक्य नाही कारण त्यांचे शासनच कष्टकरी आणि दलित जनतेच्या लुटीवर आणि दडपशाहीवर टिकलेले आहे. त्यांना संघटीत होऊन आपल्या शक्तीच्या आधारावरच झुकवले जाऊ शकते. त्यामुळे ते कोणत्याही ईश्वरीय शक्तीच्या आधारावर बसून राहिले नाहीत, उलट त्यांनी दमन आणि अत्याचारा विरोधात स्वत: सडकेवर उतरून संघर्ष केला.** ते ब्रिटीश सरकार विरोधातही बसून राहिले नाहीत, उलट संघटीत जनतेच्या बळप्रयोगातून त्यांनी ब्राह्मणवादी शक्तींना झुकण्यासाठी बाध्य केले.

अय्यंकालींचे महत्व आज सर्वात जास्त याच गोष्टी साठी आहे. आज सुद्धा सुधारवाद आणि व्यवहारवादाचा विचार जातीअंताच्या आंदोलनात प्रभावी आहे. हाच विचार या आंदोलनाला अनेक दशकांपासून सरकारला अर्ज देणे, विनंत्या करणे, या नाही तर त्या भांडवली पक्षाचे शेपूट पकडून चालणे आणि अस्मितावादाच्या पोकळ विचारांच्या पुढे जाऊ देत नाहीये. **अशामध्ये जातीअंताच्या आंदोलनाला योग्य रुपात पुढे नेण्यासाठी अय्यंकालींच्या आंदोलनाचा वारसा अत्यंत महत्वाचा आहे. खेदाची बाब अशी की अधिकांश कष्टकरी दलित भाऊ आणि बहिण त्यांच्याबद्दल जाणतच नाहीत,** कारण ज्या प्रकारे भारतातील भांडवली सत्तेने दलित आंदोलनामध्ये सुधारवादी आणि व्यवहारवादी प्रवृत्तींना प्रोत्साहन दिले आहे, त्याच प्रकारे तिने अशा सर्व जाती विरोधी योद्ध्यांच्या वारशाला लपवले आहे आणि दूर केले आहे, जे जाती अंताच्या लढ्यामध्ये क्रांतिकारी मार्गाने सत्ता विरोधी रस्ता अवलंबणे जाणत होते.



### अय्यंकालींनी काय केले?

अय्यंकालींनी खुल्या पद्धतीने ब्राह्मणवादी वर्चस्वाला आह्वान देत 1893 मध्ये एक असे आंदोलन सुरू केले, ज्याने केरळच्या समाजाचा चेहरा बदलला. अय्यंकालींनी एक बैलगाडी विकत घेतली (ज्याची परवानगी दलितांना नव्हती), असे कपडे घातले ज्याचा अधिकार फक्त उच्चजातीयांना होता, आणि एका सार्वजनिक रस्त्यावर मधोमध हातात हत्यार घेऊन निघाले. **त्यावेळी पुलयारांना आणि इतर दलितांना हा अधिकार नव्हता की त्यांनी सार्वजनिक रस्त्यांवर चालावे. त्यांना रस्त्याच्या किनाऱ्यावरील माती आणि चिखलात चालावे लागत होते. जेव्हा अय्यंकालींनी ही विद्रोहाची कारवाई केली, तेव्हा ब्राह्मण आणि इतर उच्च जातीच्या लोकांचा रागाने तीळपापड झाला. पण अय्यंकालींच्या हातामध्ये हत्यार पाहून कोणालाही त्यांना थांबवण्याची हिंमत झाली नाही.** अय्यंकालींच्या या कारवाईने पूर्ण त्रावणकोर संस्थानातील दलितांमध्ये एक लहर पसरली. जागोजागी दलितांनी या प्रकारच्या बंडखोर कारवाया चालू केल्या. यामुळे अनेक जागी दलित आणि उच्च जातीय सामंती शक्तींमध्ये रस्त्यांवर हिंस्र संघर्ष झाले. यांना चेलियार दंगली म्हणून ओळखले जाते. दोन्ही बाजूचे लोक दगावले. पण **या विद्रोहामुळे सन 1900 पर्यंत ही स्थिती निर्माण झाली होती की केरळमध्ये बहुतांश सार्वजनिक रस्त्यांवर चालण्याचा अधिकार दलितांना मिळाला होता. हा अय्यंकालींचा पहिला मोठा क्रांतिकारी संघर्ष आणि विजय होता.**

काही पुलयारांना ख्रिश्चन मिशनरी शाळांमध्ये शिक्षणाचा मर्यादित अधिकार मिळाला होता. पण शिक्षण घेण्यासाठी त्यांना ख्रिश्चन धर्म स्विकारावा लागत होता. पण अय्यंकालींचे मानणे होते की सर्व सार्वजनिक शाळांमध्ये दलितांना बरोबरीने शिक्षणाचा अधिकार असला पाहिजे. ब्रिटीश सरकारने म्हणायला 1907 साली दलित मुलांना सरकारी शाळांमध्ये प्रवेशाचा अधिकार दिला, पण स्थानिक अधिकारी सहजपणे हा अधिकार काढून घेत. असे नव्हते की ब्रिटीश सरकारला हे माहित नव्हते. पण त्यांनी कधी अशा ब्राह्मणवाद्यांविरोधात कोणतीच कारवाई केली नाही कारण भारतातील ब्रिटीश सत्तेचा सर्वात प्रमुख आधार ब्राह्मणवादी सामंती शक्तीच होत्या. अय्यंकालींनी 1907 मध्येच साधु जन प्रपालना परिषद (गरिबांच्या रक्षणासाठी संघटन) बनवले होते. पहिले तर अय्यंकालींनी पुलयारांद्वारे संचालित शाळांना स्थापित करण्यासाठी आंदोलन केले. पण यानंतर त्यांनी त्यांचे आंदोलन सरकार आणि ब्राह्मणवादी सामंतविरुद्ध वळवले. याचे कारण हे होते की त्यांनी एका दलित मुलीचा दाखला एका सरकारी शाळेमध्ये करण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या उत्तरामध्ये ब्राह्मणवाद्यांनी दलितांवर हिंस्र हल्ले केले आणि ऊरुट्टमबलम मध्ये एका शाळेला जाळून टाकले. **याच्या उत्तरामध्ये अय्यंकालींनी सर्व भूमीहीन मजुरांचा एक संप घडवून आणला. यामध्ये अधिकांश दलित होते. हा आधुनिक भारतातील दलितांचा पहिला संप होता. या संपाला अय्यंकालींनी तोपर्यंत चालू ठेवले जोपर्यंत सर्व दलित मुलांना सरकारी शाळांमध्ये बिना अडथळा दाखल्याचा अधिकार मिळाला नाही.** या काळात जेव्हाही दलितांवर उच्च जातीय सामंतांनी हल्ले केले तेव्हा अय्यंकालींच्या संघटनेच्या नेतृत्वामध्ये दलितांनी सुद्धा परतवार केले. याच कारणामुळे उच्च जातीय सामंतांना आता हल्ला करण्या अगोदर शंभर वेळा विचार करावा लागत होता आणि त्यांचे हल्ले नगण्य होत गेले. याच आंदोलनाने जनतेच्या क्रांतिकारी पुढाकाराला चालना दिली आणि त्यांनी स्वत: संघटीत होऊन सत्तेविरुद्ध आंदोलनाचा रस्ता दाखवला. ही त्या वेळी फार मोठी गोष्ट होती.

अय्यंकालींनी पुलयार जातीतील स्त्रियांच्या शरीराचा वरचा भाग झाकण्याच्या अधिकारासाठी आंदोलनामध्ये केंद्रिय भुमिका निभावली. नादर लोकांना हा अधिकार त्यांच्या आंदोलनामुळे अगोदरच मिळाला होता, पण पुलयारांना हा अधिकार 1915 मध्ये जाऊन मिळाला. या आंदोलनामध्ये सुद्धा अय्यंकालींनी कोणत्याही प्रबुद्ध प्रशासकाला अर्ज देणे वा बुद्धिजीवींद्वारे सरकारला अर्ज विनंत्या करण्यावर नाही तर जनतेच्या संघटीत पुढाकारावर भरवसा केला. **या सर्व आंदोलनांद्वारे अय्यंकालींनी दाखवले की समाजामध्ये दलितांना वास्तविक अधिकार मुलगामी जनसंघर्षांच्या माध्यमातून मिळावा. त्यांचा पहिला जोर नेहमीच सरकारच्या विरोधातील जनतेच्या मुलगामी संघर्षांना संघटीत करण्यावर होता. ते सरकारला अर्ज विनंत्या देण्यावर कमी विश्वास ठेवत होते आणि मानत होते की गोष्टी सरकारला दिलेल्या निवेदनांनी बदलत नाहीत कारण सरकार गरिब आणि दलितांच्या बाजूने नसते तर उलट ते शासक वर्गाची बाजू घेते. ते जाणत होते की सरकारच्या विरोधातील झुंझार जनसंघर्षांतूनच गोष्टींना बदलणे शक्य आहे.**

### अय्यंकालींपासून आजच्या जातीअंताच्या आंदोलनाने काय शिकले पाहिजे?

अय्यंकालीं पासून आजचे जातीअंताचे आंदोलन तीन गोष्टी शिकू शकते आणि शिकल्याच पाहिजेत. ***पहिले, जनतेची शक्ती व पुढाकारावर भरवसा, आणि दुसरे निवेदन, अर्ज, विनंत्यांच्या ऐवजी मुलगामी सत्ता-विरोधी जनसंघर्षांमधून दलित मुक्तीचा संघर्ष.*** खेदाची बाब अशी की दलित मुक्ती संघर्षाचा मोठा हिस्सा आज सुधारवाद, व्यवहारवाद आणि अस्मितावादाच्या दलदलीमध्ये फसत चालला आहे. या व्यवहारवादाच्याच तार्किक परिणामामुळे आज आठवले, मायावती, उदित राज, पासवान आणि थिरुमावलन सारखे लोक निर्माण होत आहेत जे सर्वणवादी प्रतिक्रियावादी आणि भांडवली शक्तींच्या कडेवर जाऊन बसतात आणि दलित अस्मितेच्या नावावर दलित कष्टकरी जनतेला छळतात. जोपर्यंत जाती अंताचे आंदोलन या व्यवहारवाद, सुधारवाद आणि अस्मितावादाच्या दलदलीतून बाहेर पडणार नाही तो पर्यंत आपल्या स्थितीमध्ये पायाभूत बदल होणार नाहीत.

**तिसरी गोष्ट ही की अय्यंकालींनी जाती अंताच्या आंदोलनाला वर्ग संघर्षाची जोड दिली** जेव्हा त्यांनी भूमीहीन कामगारांच्या संपाला संघटीत केले आणि ते सुद्धा यासाठी की सर्व दलित मुलांना सरकारी शाळांमध्ये बिना भेदभाव शिक्षण

पान 2 वर

# उदारमतवादा विरोधात लढा

✍ **माओ त्से-तुंग (7 सप्टेंबर 1937)**

**(कामगार कष्टकरी वर्गाच्या राजकीय पक्षाने विविध भांडवली जीवनमूल्यांच्या विरोधात निरंतर अंतर्गत संघर्ष चालवणे ही त्याच्या अस्तित्वाची गरज आहे. उदारमतवादी प्रवृत्ती ही एक निम्न भांडवली प्रवृत्ती आहे आणि पक्षामध्ये तिच्या विरोधात निरंतर संघर्ष कसा चालवला गेला पाहिजे, यावर कामगार वर्गाचे महान शिक्षक माओ यांचा हा लेख इथे देत आहोत.- संपादक मंडळ)**

आम्ही सक्रीय वैचारिक संघर्षाच्या बाजूने आहोत, कारण पक्षामध्ये एकता आणि आपल्या लढ्याच्या हितामध्ये क्रांतिकारी संघटना टिकवण्याचे ते हत्यार आहे. प्रत्येक कम्युनिस्टाने आणि क्रांतिकारकाने हे हत्यार उचलले पाहिजे.

पण उदारमतवाद वैचारिक संघर्षाला नाकारतो आणि तत्वहीन शांततेची बाजू घेतो, व यातून तो एका बेपर्वा, लयास जाणाऱ्या प्रवृत्तीला जन्म देतो व पक्ष आणि क्रांतिकारक संघटनांमधील काही युनिट्स आणि व्यक्तींमध्ये राजकीय अध:पतनाची सुरुवात करतो.

उदारमतवाद अनेक प्रकारांनी अभिव्यक्त होत असतो.

एखाद्या व्यक्तीकडून स्पष्टपणे चूक झालेली असल्यास, शांतता आणि मैत्रीसाठी गोष्टी सोडून देणे, जुनी ओळख, गावाकडचा माणुस, शाळकरी मित्र, जवळचा मित्र, प्रिय व्यक्ती, जुना कर्मचारी साथी, किंवा जुना हाताखालचा अधिकारी आहे म्हणून तत्वाला धरून वाद करायचे टाळणे. किंवा संबंध बिघडू नयेत म्हणून एखाद्या मुद्यामध्ये खोलात न जाता फक्त वरवर त्याची चर्चा करणे. परिणाम हा आहे की व्यक्ती आणि संघटना दोघांचेही नुकसान होते. हा एक प्रकारचा उदारमतवाद आहे.

स्वत:ची मते सक्रीयपणे संघटनेपुढे न ठेवता, खाजगीमध्ये बेजबाबदार टीकेचा सहारा घेणे. लोकांच्या तोंडावर काही न बोलता त्यांच्या पाठीमागे टवाळी करणे, किंवा एखाद्या मिटींग मध्ये काही न बोलता नंतर चकाट्या पिटणे. सामुहिक जीवनाच्या तत्वांची पर्वा न करता, स्वत:च्या कलानेच वागणे. हा दुसरा प्रकार आहे.

जर स्वत:ला फरक पडत नसेल, तर गोष्टींना वाहवत जाऊ देणे; एखादी गोष्ट एकदम चुकीची आहे हे माहित असतानाही शक्य तितके कमी बोलणे, 'शहाणपणाने' आणि सुरक्षितपणे वागणे आणि दोषारोप टाळणे. हा तिसरा प्रकार आहे.

स्वत:च्या मतांबद्दल गर्व बाळगत आदेश न पाळणे. संघटनेची शिस्त न पाळता तिच्याकडून विशेष वागणुकीची अपेक्षा ठेवणे. हा चौथा प्रकार आहे.



एकतेसाठी, प्रगतीसाठी, किंवा काम नीट व्हावे म्हणून वाद घालणे किंवा चुकीच्या दृष्टीकोणाविरुद्ध लढणे हे न करता वैयक्तिक आरोप करणे, भांडणं काढणे, व्यक्तिगत छीथू करणे वा बदला घेणे. हा पाचवा प्रकार आहे.

चुकीच्या मतांचा प्रतिवाद न करता ते ऐकून घेणे आणि अगदी प्रति-क्रांतिवादी मतसुद्धा ऐकून न कळवणे, आणि काहीच झालेले नाही असे भासवत शांत रहाणे. हा सहावा प्रकार आहे.

जनतेमध्ये राहून प्रचार आणि आंदोलन न करणे किंवा मिटिंग मध्ये न बोलणे, चौकशी व माहिती मिळवण्याचे काम न करता लोकांप्रती उदासीन असणे आणि त्यांच्या हिताबद्दल कोणतीही चिंता नसणे, हे विसरणे की आपण एक कम्युनिस्ट आहोत आणि एका सामान्य अ-कम्युनिस्टासारखे वागणे. हा सातवा प्रकार आहे.

एखादा व्यक्ती जनतेच्या हिताविरोधात बोलत आहे हे जाणूनही संताप न येणे, त्या माणसाला परावृत्त न करणे वा न थांबवणे किंवा त्याच्यासोबत वाद न घालणे, उलट त्याला बोलू देणे. हा आठवा प्रकार आहे.

निश्चित योजना किंवा दिशेशिवाय अर्ध्या-दिलाने काम करणे, वरवर काम करणे आणि लचांड लावणे की - "जोपर्यंत एखादा व्यक्ती साधू आहे, त्याला तर घंटा वाजवतच रहावी लागेल." हा नववा प्रकार आहे.

असे मानणे की आपण क्रांतीसाठी काहीतरी महान कार्य केले आहे, स्वत: निवृत्त सैनिक असल्याबद्दल अभिमान बाळगणे, मोठ्या कामांची क्षमता नसताना छोट्या कामांबद्दल तुच्छता बाळगणे, कामांमध्ये गचाळ आणि अभ्यासामध्ये ढिले असणे. हा दहावा प्रकार आहे.

आपल्या चुकांची जाणीव असूनही त्यांना सुधारण्याचा प्रयत्न ना करणे, स्वत:बद्दल उदारमतवादी दृष्टीकोण बाळगणे. हा अकरावा प्रकार आहे.

आम्ही अजूनही यादी देऊ शकलो असतो. पण हे अकरा मुख्य प्रकार आहेत. या सर्व उदारमतवादाच्या अभिव्यक्ती आहेत.

एका क्रांतिकारक समुदायामध्ये उदारमतवाद अतिशय धोकादायक आहे. ही अशी क्षरणकारी शक्ती आहे जी एकतेला खाऊन टाकते, संलग्नतेला क्षीण करते, अनुत्साह निर्माण करते आणि तंटा निर्माण करते. क्रांतिकारी फळीला ती तिच्या आटोपशीर संघटनेपासून, कडक शिस्तीपासून दूर करते, धोरणांच्या अंमलबजावणीला अटकाव करते, आणि ज्या जनतेचे पार्टी नेतृत्व करत आहे, त्या जनतेपासून पार्टी संघटनेला दूर करते.

उदारमतवाद हा निम्न-भांडवली स्वार्थातून निर्माण होतो, तो वैयक्तिक हित अगोदर आणि क्रांतीचे हित नंतर बघतो, आणि यातूनच विचारधारात्मक, राजकीय आणि सांघटनिक उदारमतवादाचा जन्म होतो.

जे लोक उदारमतवादी आहेत ते मार्क्सवादी तत्वांना एक अमूर्त श्रद्धा म्हणून बघतात. ते मार्क्सवादाला मान्यता देतात, पण त्याच्यावर व्यवहार करायला किंवा त्यांना पूर्णत: व्यवहारात उतरवायला तयार नसतात; ते स्वत:च्या उदारमतवादाऐवजी मार्क्सवाद स्विकारायला तयार नसतात. या लोकांकडे त्यांचा मार्क्सवाद तर असतो, आणि स्वत:चा उदारमतवाद पण असतो -- ते मार्क्सवादाबद्दल बोलतात, पण व्यवहार उदारमतवादी करतात; ते इतरांना मार्क्सवाद लागू करतात आणि स्वत:ला उदारमतवाद. ते दोन्ही प्रकारचा माल साठ्यामध्ये ठेवतात आणि प्रत्येकाचा वापर शोधतात. काही लोकांचा मेंदू असं काम करतो.

उदारमतवाद हा संधीसाधूपणाची अभिव्यक्ती आहे आणि त्याचा मार्क्सवादासोबत मुलभूत अंतर्विरोध आहे. हा नकारार्थी आहे आणि वस्तुगतरित्या शत्रूला मदत करणारा आहे, यामुळेच शत्रू आपल्यामधील उदारमतवादाचे स्वागत करतो. याचे असे स्वरूप असल्यामुळे, क्रांतिकारी फळ्यांमध्ये याला कुठलीच जागा नसली पाहिजे.

नकारात्मक उदारमतवादा विरोधात आपण मार्क्सवाद स्विकारला पाहिजे, जो चेतनेने सकारात्मक आहे. एका कम्युनिस्टाचे मन विशाल असले पाहिजे आणि त्याने खंदा व सक्रीय असले पाहिजे, क्रांतीच्या हितांना स्वत:चे जीवन मानून आणि क्रांतीच्या हितांसमोर वैयक्तिक हितांना अधीन केले पाहिजे; त्याने सतत आणि सगळीकडे तत्वांचे पालन केले पाहिजे आणि चुकीच्या कल्पना व कृतींविरोधात अथक संघर्ष चालवला पाहिजे, जेणेकरून पार्टीमध्ये सामुदायिक जीवन बळकट होईल आणि पार्टी व जनतेमधील बंध मजबूत होतील; पार्टी आणि जनतेबद्दल कोणत्याही खाजगी व्यक्तीपेक्षा त्याने जास्त चिंतीत असले पाहिजे, आणि स्वत:पेक्षा इतरांबद्दल जास्त चिंतीत असले पाहिजे. फक्त अशाप्रकारे तो स्वत:ला कम्युनिस्ट समजू शकतो.

सर्व एकनिष्ठ, प्रामाणिक, सक्रीय आणि सचोटीच्या कम्युनिस्टांनी आपल्यातील काही लोकांमध्ये असलेल्या उदारमतवादी प्रवृत्तींविरोधात एकत्र आले पाहिजे आणि त्यांना योग्य मार्गावर आणले पाहिजे. हे आपल्या विचारधारात्मक आघाडीवरचे एक कार्य आहे.

## एक शीर्षकविहीन कविता

✍ **मुक्ता**

आजची आणखी एक पहाट
पुन्हा तोच सूर्य
तळपणारा
माझ्या, तुझ्या नि कित्येकांच्या
आयुष्यातील अघोरी दु:खाची
साक्ष देणारा
सतत आठवण करून
देत राहणारा

माझ्या दिवसभर काम करून
अंगावरच जिरलेल्या ' घामाचा'
चिकटपणा!
विटा भरलेल्या पाट्या उचलताना
पाठीत आलेली कळ
भाताची ओळ लावतांना
पायाला दगडाची ठेच
लागून पडलेली खोच
भट्टीत हात घालतांना
हाताला बसलेला चटक्याचा व्रण
शौचखड्डा साफ करतांना
नसानसांत भिनलेला मलाचा दर्प
खाणीत काम करतांना
सोलली गेलेली तळहाताची कातडी
बांधकामावर हजारो वेळेस चढ उतार
करून झालेली गुढघ्याची झीज
आणि कारख्यानात
ठेकेदाराने जबरदस्ती केलेल्या
घृणास्पद स्पर्शाने
बोथट झालेलं माझं मन!!!

ह्याच कष्टांवर जगणारा
सुखवस्तू समाज
आपल्यापासून खूप जवळ आणि
आपल्या आयुष्यांपासून मैलो दूर
आपल्या श्रमांची रात्रंदिवस
लूट करणारा
करतोय अपेक्षा कि
विसरावं हे सगळं
नि असंच जगावं,
त्या शोषकांसाठी स्वर्ग बनवत
स्वत: नरकात!!
पण...

हा चिकटपणा, हि कळ, हि खोच,
हा व्रण, हा दर्प, हि सोललेली कातडी,
हि गुढघ्याची झीज आणि हे बोथट मन...
हे सगळं सगळं जिवंत ठेवायला लागेल ...
एक ठिणगी बनून...

ठिणगी करावी लागेल सुपूर्त
आणखी माझ्या सारख्याच
बोथट झालेल्या करोडो मनांत...

तोपर्यंत ...
जोपर्यंत हि ठिणगी
आग बनत नाही
आणि आग बनून
ह्या निर्दयी, फसव्या, शोषक,
अन्यायी, अमानवी, भ्रष्ट,
माणसाला किड्या-मुंग्यांप्रमाणे चिरडणाऱ्या
भांडवली व्यवस्थेला
जाळून राख करत नाही!!!

मी तोपर्यंत लढणार
आणि लढायला प्रेरित करणार
जोपर्यंत उगवणारा सूर्य
कामगारांच्या सत्तेची पहाट
घेऊन उजाडत नाही!
तोपर्यंत अशीच राहू देत
हि खोच,हा व्रण,
हा दर्प आणि हे बोथट मन!!!!

# कामगार साथींनो! एखाद्या समुदायाला गुलाम करण्याचे समर्थन करून आपण स्वतंत्र राहू शकतो का?

✍ अभिनव

मोदी सरकारने 5 ऑगस्ट रोजी कलम 370 आणि 35ए हटवले आणि जम्मू-काश्मिर राज्याला दोन हिश्श्यांमध्ये विभागण्याची घोषणा केली. जम्मू-काश्मिर च्या विशेष राज्याच्या दर्जाला संपवले आणि जम्मू-काश्मिरला दिल्ली आणि पाँडेचरी सारखे अर्ध्या-कच्च्या अधिकारांच्या विधानसभेसहीत, आणि लडाखला चंडीगढ सारख्या विधानसभा रहित केंद्र शासित प्रदेशामध्ये बदलवून टाकले.

संपूर्ण देशामध्ये कामगार वर्गा सहित सर्व लोक या निर्णयावर दोन हिश्श्यांमध्ये वाटले गेले आहेत. **मोदी सरकारचा दावा आहे की या पावलामुळे काश्मिर खऱ्या अर्थाने भारताचा हिस्सा बनेल, तेथे दहशतवाद संपेल, बेरोजगारी संपेल, "विकास" होईल, वगैरे. मोदी सरकार असाही दावा करत आहे की काश्मिरी जनता त्यांचे समर्थन करत आहे. मोदींच्या या दाव्यावर तर खुद्द मोदी समर्थक सुद्धा विश्वास करत नाहीत.** निष्पक्ष पत्रकार आणि प्रेक्षक तसेच आंतरराष्ट्रीय टीव्ही चॅनेलांनी या दाव्याची पोलखोल केली आहे. संपूर्ण जम्मू-काश्मिर मध्ये सामान्य काश्मिरी लोक या निर्णयाच्या विरोधात रस्त्यावर उतरु लागले आहेत आणि त्यांना पॅलेट गन आणि गोळ्यांचा सामना करावा लागत आहे. वरताण म्हणून, काश्मिरच्या बाहेर जर कोणी या एकतर्फी आणि निरंकुश निर्णयाच्या विरोधात आवाज उठवत असेल, तर त्यांना अटक केली जात आहे. जर काश्मिरी जनता या निर्णयाच्या समर्थनामध्ये असती तर संपूर्ण जम्मू-काश्मिरला फौजी छावणीमध्ये रुपांतरीत करण्याची आवश्यकता नव्हती. पण मोदी सरकारच्या बाकी दाव्यांचे काय? या निर्णयामुळे खरंच जम्मू-काश्मिरचा विकास होईल का, तेथे रोजगार निर्माण होईल का, दहशतवाद समाप्त होईल का? **मोदी सरकारच्या या निर्णयावर कामगार वर्गाचा दृष्टीकोण काय असला पाहिजे? हा प्रश्न आजच्या काळाचा ज्वलंत प्रश्न आहे ज्यावर चुप्प बसणाऱ्यांना किंवा चुकीची दिशा घेणाऱ्यांना इतिहास कधीच माफ करणार नाही.**

जोवर कलम 370 हटवून विकास करण्याचा आणि रोजगार निर्मितीचा प्रश्न आहे, त्याला आपण सहज समजू शकतो की हे सगळे दावे बकवास आहेत. जर असे होणार असते तर अगोदर **बाकीच्या भारतात मोदी सरकारने विकास करायला पाहिजे होता आणि रोजगार निर्माण करायला हवा होते. पण गेल्या पाच वर्षांमध्ये आणि गेल्या 2 महिन्यांमध्ये काय झाले आहे?** सर्व कामगार आणि कष्टकरी जाणतात की नवीन रोजगार निर्माण होणे दूरच, जो रोजगार होता तो सुद्धा हिरावून घेतला जात आहे. नफेखोर भांडवली व्यवस्थेच्या नफ्याच्या संकटाने गेल्या चार महिन्यांमध्ये अशी मंदी निर्माण केली आहे की चार लाखांपेक्षा जास्त कामगार नोकऱ्या गमावून बसले आहेत. **विकासाच्या नावावर खाजगीकरण आणि उदारीकरणाचे जे वादळ आणले आहे, त्यामुळे अंबानी-अडानी सारख्या धनदांडग्यांच्या तिजोऱ्या भरत आहेत, पण सामान्य कष्टकरी जनतेला महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराचा सामना करावा लागत आहे.** मोदी सरकारच्या खोट्या दाव्यांचा इतिहास एवढा मोठा झाला आहे की आता मोदींच्या तोंडून "विकास" आणि "अच्छे दिन" सारखे शब्द ऐकताच देशामध्ये भय आणि शंकेची लहर धावू लागते. काश्मिर बद्दल सुद्धा मोदी सरकारचे दावे तितकेच खोटे आणि धोकेबाजीचे आहेत. त्यामुळे त्यांचे खंडन करण्याची आवश्यकता नाही.

त्यामुळे आम्ही सरळ या प्रश्नावर येतो की या निर्णयाला लागू करण्यामागे मोदी सरकारचा इरादा काय आहे आणि या प्रश्नावर आपण कामगार-कष्टकऱ्यांनी काय दृष्टीकोण ठेवला पाहिजे? पण यासाठी सर्वात अगोदर जम्मू-काश्मिर बद्दल काही मुलभूत गोष्टी आपल्याला माहित हव्यात.

### जम्मू-काश्मीरच्या समस्येचा संक्षिप्त इतिहास

सर्वात अगोदर तर आपण कामगारांना हे माहित पाहिजे की 15 ऑगस्ट 1947 रोजी जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा जम्मू-काश्मिर त्यात सामील नव्हते. तेथे राजा हरि सिंह याचे संस्थान होते. काश्मिरची जनता बहुसंख्यांक मुस्लिम होती आणि त्यांचा राजा हरि सिंह हिंदू होता. काश्मिरचे गरिब शेतकरी (ज्यांच्यामध्ये बहुतांश मुस्लिम होते, पण हिंदू सुद्धा होते) जम्मू-काश्मिरची सर्वात मोठी आणि लोकप्रिय पार्टी नॅशनल कॉन्फरन्स च्या नेतृत्वामध्ये हरि सिंहाच्या राज्यामध्ये असलेल्या सामंती अत्याचारा विरोधात आणि जमिनदारी विरोधात संघर्ष करत होते. या पार्टीचे नेते होते शेख अब्दुल्ला. त्यांच्या नेतृत्वामध्ये जम्मू-काश्मिरचे शेतकरी जमिनदारी आणि गुलामी विरोधात लढत होते. स्वातंत्र्याच्या वेळी राजा हरि सिंह भारतामध्ये विलिनीकरणावरून आढेवेढे घेत होता, जेव्हा की **शेख अब्दुलांच्या नेतृत्वाखालील नॅशनल कॉन्फरन्स चा कल काही अटींसहीत भारतामध्ये विलीनीकरणाकडे होता.**

हरि सिंह लगेच तयार न झाल्यामुळे स्वातंत्र्याच्या लगेच नंतर काश्मिरचे भारतात विलिनीकरण होऊ शकले नाही. याच दरम्यान पाकिस्तानने धार्मिक आधारावर काश्मिरला आपल्यामध्ये सामील करण्याच्या इराद्याने काश्मिरवर आपल्या सैन्याच्या समर्थनाने कबालींद्वारे हल्ला चढवला. **याच हल्ल्याच्या विरोधात काश्मिरी लोक हिंमतीने लढले. या हल्ल्यानंतरच हरि सिंहाने भारतामध्ये सशर्त विलिनीकरण मान्य केले. भारतीय सेना जेव्हा 1948 साली श्रीनगर येथे पोहोचली तेव्हा काश्मिरी जनतेने त्यांचे मनापासून स्वागत केले, त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला आणि त्यांच्या समर्थनामध्ये घोषणा दिल्या. काश्मिरची सामान्य जनता कधीच पाकिस्तानच्या इस्लामी राज्यात सामील होऊ इच्छित नव्हती कारण ऐतिहासिक स्तरावर काश्मिरी जनता कधीच धर्मवादी चरित्राची नव्हती.** भारतामध्ये विलीनीकरणाच्या करारात ही अट होती की काश्मिरला भारतीय संघराज्यामध्ये स्वायतत्तेचा दर्जा मिळेल. या शर्तीला सामील करून घेण्याचे कारणे हे होते की काश्मिरी जनता, जिच्यामध्ये काश्मिरी मुसलमान आणि काश्मिरी हिंदू पंडित दोन्ही सामील होते, आपल्या राष्ट्रीय ओळखीला कायम ठेवत भारतामध्ये सामील होऊ पहात होते आणि त्यामुळेच ते विदेश धोरण आणि इतर काही मामल्यांसहित इतर अन्य मामल्यांमध्ये आपली स्वायतत्ता टिकवू पहात होते, आणि हा त्यांचा न्याय्य अधिकार होता. तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू आणि गृहमंत्री सरदार वल्लभ भाई पटेल यावर सहमत होते. संघ परिवार आणि मोदी सरकार धादांत खोटं बोलत आहे की कलम 370 रद्द करून त्यांनी सरदार पटेलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. जम्मू-काश्मिरच्या या स्वायतत्तेच्या दर्जालाच कायदेशीर रूप देत कलम 370 बनवले गेले. दुसऱ्या शब्दांमध्ये **काश्मिर याच शर्तीसह भारतात आपल्या इच्छेने सामील झाले की त्याला भारतीय संघराज्या अंतर्गत स्वायतत्ता असेल. भारतात विलिनीकरणाच्या कायदेशीर कराराचा हा भाग होता. या कलमामध्ये कोणताही बदल तेव्हाच करणे शक्य होते जेव्हा काश्मिरच्या घटना सभेची आणि नंतर त्याच्या विधानसभेची त्याला सहमती असती.**

***काश्मिरी जनतेची बहुसंख्यांक लोकसंख्या मुस्लिम आहे. तरीही त्यांनी धार्मिक आधारावर पाकिस्तानच्या इस्लामिक राज्यामध्ये सामील होण्याला नकार दिला आणि भारताच्या औपचारिक रित्या धर्मनिरपेक्ष राज्यामध्ये सामील होणे स्विकारले. काश्मिरी राष्ट्रीयतेचा हा निर्णय स्वत:च सांगतो की काश्मिर मध्ये इस्लामी कट्टरतावादाचा ऐतिहासिक रुपाने कोणताच खोलवर आधार नव्हता. मग काश्मिरी जनतेचे भारतापासून दुरावणे कसे चालू झाले?***

याची सुरूवात नेहरू सरकारने केली. नेहरू सरकारने काश्मिर मध्ये मुलगामी भुमी सुधार लागू करून जमिनदारांच्या मुळावर घाव घालणाऱ्या आणि अनेक लोकशाही अधिकार देणाऱ्या शेख अब्दुल्ला सरकारला घटनाबाह्य पद्धतीने 1953 मध्ये बरखास्त केले आणि मग शेख अब्दुल्लांना जेल मध्ये टाकले जिथे ते 11 वर्षांपर्यंत कैद राहिले. याचे कारण हे होते की भारतामध्ये भांडवली लोकशाहीच्या नेहरू मॉडेलमध्ये या प्रकारची लोकाभिमुख आणि प्रगतीशील पावलं सामील नव्हती आणि नेहरूंसाठी सर्व देशामध्ये अडचणी निर्माण करू शकली असती. **ही काश्मिरी जनतेसोबत देशातील शासक वर्गाच्या गद्दारीची सुरूवात होती ज्यामुळे काश्मिरी जनतेमध्ये परकेपणाच्या भावनेची बीजं रोवली गेली.** काश्मिरला वेगळी घटना, वेगळा झेंडा आणि आपला वजीरे-आझम ठेवण्याचे घटनात्मक स्वातंत्र्य होते, पण त्याला एक-एक करून हिरावून घेतले गेले. नंतर वजीरे-आझमच्या पदाला सामान्य मुख्यमंत्र्यामध्ये बदलवण्यात आले. यानंतर, तिथे काँग्रेसने दिखावी निवडणुका करवल्या आणि जबरदस्तीने जनतेच्या लोकशाही अधिकारांना पायदळी तुडवले. याच सगळ्या पावलांमुळे काश्मिरी जनतेला मिळालेली स्वायतत्ता नावापुरतीच राहिली. खरेतर स्वायतत्तेला हळूहळू काढून घेतले गेले. **याच कारणामुळे काश्मिरी जनतेचा, जी या स्वायतत्तेच्या शर्तीवर भारतात सामील झाली होती, विश्वास कमी होत गेला.** तिच्यामध्ये भारतापासून परकेपणाची भावना वाढत गेली. 1960 च्या दशकापासूनच काश्मिरी जनतेच्या विरोधाला भारताच्या शासक वर्गाने सैन्याच्या बंदुका आणि बुटांच्या आधाराने दाबून टाकले. याच्या विरोधात जनतेमध्ये भयंकर आक्रोश निर्माण झाला.

याच आक्रोशाचा फायदा उचलला इस्लामी कट्टरतावाद्यांनी आणि पाकिस्तानने 1980 च्या दशकापासून पाकिस्तानच्या फूस लावण्याने इस्लामी कट्टरतावादी काश्मिर मध्ये पाय रोवू लागले. या काळात इथे निर्माण झालेला दहशतवाद याचाच परिणाम होता. शेख अब्दुल्लांना नेहरू सरकारने दोनदा तुरुंगात टाकले होते. दुसरीकडे जेल यात्रेवरून परत आल्यावर शेख अब्दुल्लांचा स्वर सुद्धा नरम पडला होता. काश्मिरी राष्ट्रीयतेचा आवाज उचलणारी धर्मनिरपेक्ष नॅशनल कॉन्फरन्स सुद्धा तडजोडपंथी झाली होती. अशामध्ये काश्मिरी जनतेच्या एका हिश्श्याने इस्लामी कट्टरतावादी शक्तींचे समर्थन केले कारण फक्त याच शक्ती भारतीय राज्यसत्तेच्या दडपशाही विरोधात लढताना दिसत होत्या. **जो कोणी एकदाही काश्मिरला गेला आहे तो जाणतो की धर्मवाद आणि धार्मिक कट्टरतावाद काश्मिरी जनतेच्या स्वभावामध्येच नाहीत. भारतीय भांडवलदार शासक वर्गाने आणि त्याच्या राज्यसत्तेने केलेला विश्वासघात आणि दमन ते कारण होते ज्यामुळे काश्मिरी जनतेमध्ये परकेपणाची भावना निर्माण झाली, आणि त्यांच्यामध्ये धार्मिक कट्टरतावाद्यांनी जम बसवला आणि पाकिस्तानच्या मदतीने दहशतवाद पसरवला.** जो काश्मिरी समुदाय कधीच इस्लामी कट्टरतावादाच्या बाजूने नव्हता, त्याच्या एका हिश्श्यामध्ये या कट्टरतावाद्यांनी पाय पसरले. याला जबाबदार कोण होते? भारताचा भांडवलदार वर्ग, त्याची विस्तारवादी वृत्ती आणि त्याची दमनकारी राज्यसत्ता. **जरा विचार करा कामगार साथींनो, काय कारण आहे की ज्या काश्मिरी जनतेने 1948 साली श्रीनगरच्या लाल चौकात भारतीय सेनेचे फूल उधळत स्वागत केले होते, तीच आज भारतीय सेनेचा द्वेष करते आणि तिला दगड मारते?**

1980च्या उत्तरार्धात आणि 1990च्या दशकामध्ये जम्मू-काश्मिर मध्ये इस्लामी कट्टरतावादी दहशतवाद पाकिस्तानच्या पाठिंब्याने जोरात फोफावला आणि भारतीय राज्यसत्तेने त्याचे दमन सुरू केले. या दमन तंत्राचे शिकार दहशतवादी कमी झाले आणि काश्मिरी जनता जास्त झाली. सामुहिक हत्याकांड, बलात्कार, अपहरण, गायब होणे ही काश्मिरी जनतेसाठी दैनंदिन बाब झाली. भारतीय फौजेद्वारे केल्या जाणाऱ्या या कारवाया इतक्या वाढल्या की आता भारत सरकार सुद्धा अशा सर्व हत्याकांडांना आणि बलात्कारांना नाकारू शकत नाही. कुनान पाशपोरा पासून ते माछील एन्काऊंटर पर्यंत अनेक अशा घटना काश्मिरी जनतेच्या मनात जखमेप्रमाणे कायम आहेत. हेच कारण आहे की या सरकारी दहशतवादाच्या विरोधात तेथील अनेक युवक दहशतवादाच्या रस्त्यावर गेले आणि आता कलम 370 हटवून भाजपने पुन्हा एकदा अशा समस्यांचा रस्ता उघडला आहे. 1990 च्या दशकाच्या दरम्यान भारतीय शासक वर्गाने सैन्य शक्तीच्या आधारावर दहशतवाद तर चिरडला, पण काश्मिरी जनतेचा विरोध नाही. 2009 मध्ये माछील एन्काऊंटर नंतर जे आंदोलन सुरू झाले, ते ना हातात बंदूक घेऊन होते, ना रॉकेट लाँचर. पण हजारो लोक सडकेवर होते. या विरोधाला ना कोणता ठोस आकार होता, ना कोणी चेहरा. सामान्य जनता भारत सरकारच्या दडपशाहीच्या विरोधात रस्त्यांवर उतरली होती, कोणत्याही दहशतवादी किंवा कट्टरतावादी नेतृत्व किंवा शक्ती शिवाय. याच प्रकारे सैन्याद्वारे दमन आणि घेरेबंदीच्या विरोधात काश्मिरी जनतेचा विरोध चालूच राहिला.

फॅसिस्ट मोदी सरकार द्वारे कलम 370 हटवले जाणे याच विरोधाला क्रमिक प्रक्रियेमध्ये अधिक विस्फोटक रूप देईल. 1950 आणि 1960 च्या दशकामध्ये नेहरू सरकारने सुरू केले गेलेल्या धोकेबाजी आणि दमनामुळे काश्मिर मध्ये 1980 च्या दशकात दहशतवाद आणि इस्लामी कट्टरतावाद पसरला. 2019 मध्ये मोदी सरकार द्वारे आपल्या तात्कालिक हितांसाठी खेळल्या गेलेलेल्या या धोकादायक जुगाराच्या परिणामी येणाऱ्या काळात इस्लामी कट्टरतावादी आणि दहशतवादी दानवाला पुन्हा उभे राहण्यात वेळ लागेल, पण याला थांबवणे अवघड असेल. सैनिकी बंदुका आणि बूटांच्या जीवावर कोणतेही सरकार दीड कोटी लोकांना जीवे मारू शकत नाही आणि ना त्यांना दरवर्षी बंदुकीच्या सावलीमध्ये ठेवू शकते. मोठ्यात मोठी आणि सर्वात प्रगत हत्यारांनी सज्ज सैन्य सुद्धा थकते. अकल्पनीय दमन आणि पाशविकता करूनही इस्त्रायल72 वर्षांपासून पॅलेस्तिनी जनतेच्या विरोधाला पायदळी तुडवू शकलेला नाही, त्यामुळे ही गोष्ट समजून घेता येईल की **कोणतीही दमित राष्ट्रीयता लढत राहते, जर ती जिंकली नाही तर हरत सुद्धा नाही. जिथे न्याय नसेल, तिथे शांतता असू शकत नाही.**

### राष्ट्रीयता म्हणजे काय?

हे सुद्धा समजणे गरजेचे आहे की काश्मिरी राष्ट्रीयतेचा आधार इस्लाम धर्म नाही तर काश्मिरी

पान 12 वर

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 9156323976, 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित